वीणा प्रकाशन–३१

# क्रांतिनिष्ठा

लेखक

दादा धर्माधिकारी

सप्टेंबर १९४८

मूल्य दोन रुपये.

प्रकाशकः—

ब. गो. गर्गे एम्. ए.
वीणा प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर.

संपादकः—

ब. गो. गर्गे एम्. ए.
द्वा. वा. घाटे
बी. ए. एल्एल्. बी.

मुद्रक
दि नॅशनल प्रेस आणि पब्लिकेशन्स लि
धरमपेठ, नागपूर.

# वीणा प्रकाशन.

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. |
| (१) | दोन मनें–खांडेकर | ५—०—० |
| (२) | अविष्कार–गीता साने | १–१२—० |
| (३) | हेमलता–घाटे | १—८—० |
| (४) | निष्कलंक–कमल दीक्षित | २—०—० |
| (५) | उषःप्रभा–मांजरेकर | १—८—० |
| (६) | झंझावात–चोकील | ३—०—० |
| (७) | पहिली लाट–खांडेकर | २—०—० |
| (८) | साकी–बी. रघुनाथ | १—०—० |
| (९) | काळी राणी–पी. वाय्. देशपांडे | ४—०—० |
| (१०) | स्वीकार–टोंगो | १—८—० |
| (११) | संक्रमण–वरखेडकर | १–१२—० |
| (१२) | डाक बंगला–माडखोलकर | १–१२—० |
| (१३) | हिरवे गुलाब–बी. रघुनाथ | १—४—० |
| (१४) | अजिंक्य तारा सर–पां. वि. खांडेकर | २—०—० |
| (१५) | बाबू दडके–बी. रघुनाथ | २—०—० |
| (१६) | दर्यासारंग–आपटे | २—०—० |
| (१७) | पाथेय–चोरघडे | २—८—० |
| (१८) | मनमोर–शांताराम | २—८—० |
| (१९) | सुरुंग–वखरे | ४—०—० |
| (२०) | धबधब्याच्या धारेंत–पाठक | १–१२—० |
| (२१) | आंदोलने–प्रधान | १—०—० |

# इतर पुस्तकें

| | |
|---|---|
| ( १ ) स्वैरविचार—ललित निबंध संग्रह—माडखोलकर | १—१२—० |
| ( २ ) आव्हान—साहित्य परिषदेंतील भाषणें-माडखोलकर | १—१२—० |
| ( ३ ) विलापिका—टीका ग्रंथ—माडखोलकर | १—०—० |
| ( ४ ) वीररत्नमंजूषा—सावरकर | २—०—० |
| ( ५ ) तुरुंगांतील अनुभव—वखरे | ०—८—० |
| ( ६ ) बोबडे कवितासंग्रह ( शृंगारिक भावगीतें | १—८—० |
| ( ७ ) वनवासी फूल— रे. टिळक ( विस्तृत प्रस्तावना व टीपांसह नवीन आवृत्ति | १—८—० |
| ( ८ ) वेणूसुधा—वनसुधा—वामन पंडीत ( सटीप आवृत्ति ) | १—०—० |
| ( ९ ) आज्ञापत्र—रामचंद्रपंत अमात्य ( प्रिं. पांढरीपांडे व प्रो. कोलते यांच्या प्रस्तावनांसह ) | १—०—० |
| (१०) कूजन—प्रो. वऱ्हाडपांडे—काव्यसंग्रह | १—४—० |
| (११) सुख दुःख विवेक ( मानसशास्त्रावरील मौलिक ग्रंथ ) | २—१२—० |
| (१२) गांधीवाद—मराठे | ०—६—० |
| (१३) समाज सत्तावाद—जयवंत ( एंजेल्सचा अनुवाद ) | १—०—० |
| (१४) गांधीजी—ओझरतें दर्शन—दादा धर्माधिकारी | ०—४—० |
| (१५) काका कालेलकर—ओझरतें दर्शन—चोरघडे | ०—६—० |
| (१६) छाया—बालगीत संग्रह—टेकाडे | ०—४—० |
| (१७) धूर व इतर एकांकिका—अनंत काणेकर | १—१२—० |
| (१८) चिव चिव ( बालगति संग्रह ) | ०—६—० |
| (१९) मायाविवाह—कोल्हटकर | १—८—० |
| (२०) ध्येयाचा ध्यास—वरखेडकर | १—८—० |
| (२१) आघात—ब्रम्हे | १—८—० |
| (२२) हुतूतू—गंधे | २—०—० |
| (२३) सुखशांतीचें बेट—ठोसर | ०—८—० |

# स्त्रीशिक्षणांत क्रांति ×

## १ माझा अधिकार

स्त्री शिक्षणाचा प्रश्न महत्वाचा तितकाच नाजुकहि आहे. त्यामुळें शिक्षण-विषयक इतर प्रश्नांवर कांही बोलणें अगर लिहणें जितकें सोपें आहे, तितकें या बाबतींत मात्र नाहीं. यासाठी विशेष अधिकाराची गरज आहे. या प्रश्नाचा ज्यानें विचार केला असेल आणि ज्याला याचा अनुभव असेल तोच या बाबतींत कांही सांगू शकतो. मी स्त्री-शिक्षणाच्या क्षेत्रामध्यें कांहीच काम केलें नाहीं. वर्धेच्या महिला-सेवा-मंडळाचा मी सभासद आहे. हा माझा अपराध नसून स्व. पू. जमनालालजींचा आहे. तथापि दुसऱ्या एका दृष्टीने पाहिलें, तर या बाबत माझा थोडा अधिकार आहे. पुष्कळशा मुलामुलींचा एकत्र वावर असलेल्या एका मोठ्या घराण्यांत माझा जन्म झाला आहे. मूलतापीचे धर्माधिकारी पुष्कळच आहेत. ते इतके कीं, त्यांपैकीं कोण, किती, कुठे असतात याचा आम्हांला पत्ताहि लागत नाही. कसलीहि पूर्वयोजना न करतां सरकारनें आम्हांला अटक केली आणि तरीहि येथे आम्ही इतके जमून गेलों. * एकदां मूलतापीच्या स्टेशनावर सहज गेलों असतां प्लॅटफार्मवर तिकीट नसल्यामुळे आम्ही पकडलें गेलों. तेंहि सरसकट वीस पंचवीस जण! बरोबरीचे भाऊ, बहिणी, काका यांच्यामध्ये वाढण्याचें सद्भाग्य मला लहानपणापासून लाभलें. कांही माझ्याच बरोबरीच्या काकू व आत्या मला आहेत. दरवर्षी

---

× नागपूर सेंट्रल जेल मधील एक व्याख्यान, ता. २३-६-४३.

* अगदी जवळच्या गोतावळ्याची व धर्माधिकारी कुटुंबाची मंडळी तुरुंगाच्या एकाच परिसरात नऊ होती.

दोनचार मुलां-मुलींचीं लग्नें निघतात व मग त्यांच्या वधू-वर संशोधनार्थ आम्ही अखिल भारतीय दौरे काढतों. म्हणून माझ्या दृष्टीने स्त्रीशिक्षण हा एक जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला आहे. वास्तविक मी तात्त्विक दृष्टीने विचार करणारा माणूस. पण वरील कारणांमुळे मला या व्यावहारिक प्रश्नाचाहि विचार करणें भाग पडलें आहे. आमचा धर्माधिकारी परिवार फार मोठा व अत्यंत सनातनी आहे. यांपैकी 'एकैकमप्यनर्थाय' आणि येथे तर सर्वच हजर. सनातन धर्माचे 'भयंकरांत भयंकर' रूप मी आपल्या डोळ्यांनी पाहिलें आहे.

## २ अहिंसक समाजरचनेचें एकमेव साधन.

या प्रश्नाचा विचार केल्यानंतर माझें असें ठाम मत झालें आहे की, आम्हांला जर अहिंसक समाजाची वास्तविक स्थापना करावयाची असेल आणि मानव समाजांत शांति नांदावी असें आम्हांला प्रामाणिकपणें वाटत असेल, तर त्यासाठी स्त्रीशिक्षणासारखे दुसरें प्रभावी साधन नाहीं. समाजांत बंधुभाव म्हणजे अहिंसा कायम करण्यासाठी आणि लष्करीसत्तेची प्रतिष्ठा नष्ट करण्यासाठीं स्त्रीशिक्षणावांचून आपल्याला गत्यंतरच नाही.

## ३ नीतीच्या वल्गना.

बाबू काका* एकदा म्हणाले होते की, आम्ही बालकांना कैदी मानतों. आणि स्वतःला त्यांचे जेलर समजतों. हा दाखला खरा स्त्रियांनाच जास्ती लागूं पडतो. आम्ही स्त्रियांचे मालक, जेलर, पहारेदार इत्यादि सर्व आहोंत. म्हणून स्त्रियांशीं संबंध येणाऱ्या सर्वच गोष्टी समाजांत तुच्छ व निकृष्ट मानल्या जातात. एखाद्याला स्त्रीचा भाऊ किंवा बाप म्हणणें हे लौकिकांत शिवी देण्यासारखे गणलें जातें. स्त्रियांच्या जागीं आम्ही स्वतःला कल्पिल्यास यांतील अपमानाच्या तीव्रतेची कल्पना येऊं शकते. एका परकीय लेखकाने या संबंधी आपला एक अनुभव लिहिला आहे. एकतीस वर्षे तो हिंदुस्थानांत राहिला. एकदां तो एका गांवीं गेला असतांना तेथल्या

* श्री. किशोरीलाल घनश्याम मश्रुवाला.

एका खेडुताने त्याला शिवी दिली. त्याला ती शिवी ठाऊक नव्हती. म्हणून त्याने आपल्या प्रवास वर्णनांत नमूद केलें कीः–'मला त्या लोकांनी पत्नीच्या भावाप्रमाणे संबोधिलें व आपला आत्मिय समजून माझ्याशीं जवळचें नातें जोडलें.'

सरळ आकाशांतून खाली आलेल्या एखाद्या इसमाला जर आपण सांगितलें की, 'बाबारे, आमच्या येथे स्त्रीचा भाऊ व बाप काढणें ही शिवी आहे,' तर त्याला कसें वाटेल? आणि इकडे मनु महाराज म्हणतात, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमंते तत्र देवताः' यांतून आमच्या समाजाच्या मनःस्थितीचें दिग्दर्शन होतें.

लहानपणीं आम्ही एक कविता शिकलों होतों. तिच्यांतील एक ओळ मला आठवते. 'मेन मस्ट वर्क ॲण्ड विमेन मस्ट वीप' समाजाच्या कोणत्याहि थरांत शिरलों तरी आमच्या समाज व्यवहाराच्या मुळाशीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत वरीलच सूत्र असलेलें आपल्याला आढळून येईल.

"बालक–मग तें मुलगा किंवा मुलगी कांहीहि असो– मांगल्याची खूण आहे, शिक्षणाचें अधिकारी आहे, असें खरा शिक्षण–शास्त्री म्हणेल. आणि आमचे सनातनी पोथी पंडित म्हणतील कीं, स्त्री ही नरकाचें मूळ आहे. जो समाज स्त्रियांविषयीं अशी समजूत धरून बसेल, किंवा ज्या नीतिमत्तेचा हाच मुळी आधार असेल ती नीतिमत्ता "काउन्टर फीट" आहे, खोटी आहे, बनावटी आहे. म्हणून स्त्री शिक्षणासंबंधी विचार करतांना आम्हांला आमच्या सामाजिक कल्पना बदलाव्या लागतील. आमचे एतत्संबंधी विचार विकृत व कलुषित झालेले आहेत याचें आम्हांला भान सुद्धा नाही. आमच्या भाषेंत व आमच्या व्यवहारांत याचा नेहमीच प्रत्यय येत असतो.

## ४ अभेद दृष्टि

सनातन्यांनी स्त्रीला नरकाचें द्वार बनवून टाकलें आहे असा जेव्हा सनातन्यांवर आम्ही आरोप करतों, तेव्हा ते उत्तर देतात, "आम्ही मातेला किती थोर मानतों. आमचा मातृभक्तीचा आदर्श पहा कीं." आम्ही जेव्हा त्यांना म्हणतों, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मान द्या, तर ते म्हणतात,

"आम्ही स्त्रीला मातेच्या रूपांत आपल्यापेक्षाहि श्रेष्ठ समजतों. भगिनींच्या आणि कन्येच्या रूपांत देखील आम्ही त्यांची पूजा करतों." डॉ. राधाकृष्णन् सारख्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रमुख पंडितांनी देखील असें सांगितलें केलें आहे कीं, "एव्हरी वन् इज फायटिंग फॉर इक्वालिटी बट् नो वन् केअर्स फॉर क्वालिटी." समान हक्कासाठी प्रत्येकजण भांडतो. गुण वाढविण्याची मात्र कुणालाच पर्वा नाही. वस्तुतः गुणविकास हे शिक्षणाचें साध्य असल्या-मुळें समानता हाच गुणविकासाचा आधार होऊं शकतो. शिक्षणाच्या दृष्टीने स्त्री व पुरुष यांच्यांत कसलीहि विषमता असूं नये. ते समान भूमिकेवर असावयाला हवेत. कुणी कुणालाहि लहान व मोठा समजूं नये. वस्तुतः भेद म्हणून असा कांहीं नाहीं. एक लहानसें उदाहरण घेऊन मला माझें म्हणणें स्पष्ट करतां येईल. अब्राहाम लिंकन हे अमेरिकेचें अध्यक्ष असतांना दोन टोप्या- विक्रेत्यांनी त्यांच्याकडे एकेक टोपी तयार करून आणली. आणि विचारलें कीं, 'आपणांस कोणती टोपी अधिक पसंत आहे?' दोन्ही टोप्या उत्तम होत्या. त्यांतून चांगली कोणती व वाईट कोणती हें ठरविणें सुलभ नव्हतें. अब्राहाम लिंकन क्षणभर घुटमळून म्हणाले, "दे म्युचुअली एक्सेल इच अदर." स्त्री आणि पुरुष यांच्या बाबतींत शिक्षणशास्त्र्याची दृष्टि अशीच असली पाहिजे. कोणी उत्कृष्ट नाहीं आणि कोणी निकृष्ट नाही. आजची स्थिति दुर्दैवाने अशी नाही.

## ५ स्त्री शिक्षणाचे तीन सिद्धांत.

स्त्री शिक्षणाला प्रारंभ करतांना जपानने तीन तत्त्वें समोर ठेवलीं होतीं.

१. स्त्रीला स्त्री या नात्याने शिक्षण देणें.

२. स्त्रीला नागरिक या नात्याने शिक्षण देणें.

३. स्त्रीला मनुष्य या नात्याने शिक्षण देणें.

असें म्हणतात कीं, ईश्वराने स्त्रीपुरुषांना वेगवेगळ्या जातींच्या रूपाने उत्पन्न केलें. स्त्री भिन्न आहे. पुरुष भिन्न आहे. दोघांच्या स्वभावांत भेद आहे. गुणांत फरक आहे. मग त्यांचें कार्यक्षेत्रहि वेगवेगळें आहे. वास्तव

शिक्षण देखील वेगवेगळें असायला पाहिजे. श्री. किशोरलाल भाईंनी ' लग्न-प्रपंच ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत वरील मुद्याचें खंडन केलें आहे. त्यांनी टीकाकारांना एक प्रश्न विचारला की, स्त्री पुरुष या भिन्न जाती असत्या तर प्रत्येक पुरुषाची माता स्त्री व प्रत्येक स्त्रीचा बाप पुरुष कसा राहिला असता ? त्यांचा सवाल योग्य आहे. जपानने स्त्रीला मनुष्य या नात्याने शिक्षण देणें याच दृष्टीने आवश्यक मानलें. कारण स्त्री पुरुषांमध्यें वैषम्यापेक्षां साम्यच अधिक आहे. दोघांमध्यें कांही वैशिष्ट्यें असलीं तरी तीं समानतेला बाधक नाहींत.

## ६ सनातन धर्म की फॅशिझम

सनातन धर्माचा मी वर उल्लेख केलेला आहे. याच्या नवीन नवीन आवृत्त्या निघत असतात. फॅशिझम हें सनातन धर्माचेंच नवें व आधुनिक संस्करण आहे. हिटलरने स्त्रियांना सांगितलें, " बॅक टू पॉट्स ॲण्ड पॅन्स " जा चूल नी चक्की सांभाळा. स्वयंपाकगृह व सूतिकागृह हें स्त्रीयांचें कार्य-क्षेत्र असून रणांगण हें पुरुषांचें कार्यक्षेत्र आहे. अशी सर्वसाधारण लोकांची समजूत झालेली आहे. हीं सर्व कार्यक्षेत्रें आलीं कुठून ? केवळ शरीराच्या घडणीमुळे स्त्री ही सतत स्त्रीच राहील आणि पुरुष हा नेहमी पुरुषच राहील काय ? दोघे कधीं मनुष्य होणार नाहीत काय ? एका मराठी लेखकाने असें लिहिलें आहे की, कार्यप्रमाणे स्त्रीलाहि ' मील् मध्ये घोळा, मार्क्स मध्ये तळा. स्त्री ही स्त्रीच राहील. ' मुलांसाठीं खेळणें म्हणून तलवार व मुलीं-साठीं मात्र बाहुली हा याचा पुरावा आहे. स्त्रीची आकांक्षा मातृत्व असून पुरुषाची युद्ध आहे. संघटनेसाठी हीं दोन प्रतिकें जोंपर्यंत आदर्श मान-ण्यांत येतील तोंपर्यंत फॅशिझमची प्रवृत्ति या ना त्या स्वरूपामध्यें सतत टिकून राहील. अहिंसक क्रांति अशक्य होऊन बसेल.

## ७ स्वातंत्र्य विरुद्ध पावित्र्य

शिक्षणाच्या द्वारें क्रांति घडवून आणावयाची असल्यास कोण कोणते सिद्धांत मूलभूत म्हणून आम्हांस स्वीकारावे लागतील ?

पहिला प्रश्न असा की, स्वातंत्र्याचें आणि पावित्र्याचें साम्राज्य समाजांत नांदूं शकतें कां? स्त्री व पुरुषांचें सहशिक्षण नीतीला पोषक होऊं शकेल काय? स्त्रीच्या परवशतेचें समर्थन पावित्र्याच्या नांवावर केलें जातें. मग स्त्री स्वतंत्र झाल्यानंतर पावित्र्य राहूं शकेल की काय?

मला असें सांगायचें आहे की, स्वातंत्र्य नसेल तर पावित्र्य राहूंच शकत नाही. हा मुद्दा विनोबांनी सुंदर रीतीने मांडला आहे. भीति व नीति एकत्र राहूं शकत नाही. स्वातंत्र्याला भिणारी नीति पावित्र्याच्या नांवानें कितीहि द्वाही भिरवीत असली तरी वस्तुतः ती प्रच्छन्न भिरूता आहे. तो दडलेला भेकडपणा आहे. या भीतिच्या मुळाशीं स्त्री आपल्या शरीराच्या घडणीमुळें स्वतःचें रक्षण करूं शकत नसल्यामुळें पुरुषच स्त्रीचा रक्षक होऊं शकतो, ही परंपरागत धारणा आहे.

## ८ रक्षक हाच भक्षक

या मधून एक दुसरा उपसिद्धांत निघतो. तो म्हणजे जो रक्षक आहे तोच भक्षकहि होऊं शकतो. एका स्त्रीचें दुसऱ्या स्त्री पासून रक्षण करावें लागत नाही. ज्या गावांत फक्त स्त्रीयाच राहात असतील तेथे स्त्रीच्या पावित्र्याचे रक्षण करण्याचा प्रश्न उपस्थित होऊं शकेल काय? समाजामध्यें कांही पुरुषांना स्त्रीयांचे रक्षक व्हावे लागते. कां? तर कांही पुरुष स्त्रीयांचे भक्षक असतात म्हणून.

## ९ ब्रह्मचर्य

क्रांतीला ही वस्तुस्थिति बदलून टाकावयाची आहे. जोंपर्यंत स्त्री रक्षणीय असेल तोंवर तिला ब्रह्मचर्य अशक्य आहे. स्त्रीयांचें ब्रह्मचर्य गांधीजी मानतात म्हणून ते स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. ब्रह्मचर्य हा त्यांनी संयुक्त सामाजिक जीवनाचा पाया मानला आहे. आणि फक्त पुरुषांनी ब्रह्मचारी राहावें व स्त्रीयांनीं लग्नें करावीं; हें अशक्य आहे. सनातनी प्रत्येक पुरुषाला शुकाचार्य होण्याचा अधिकार देवतात. परंतु स्त्रीयांसाटीं मात्र त्यांच्या नीतिशास्त्रांमध्यें विवाहच विहित आहे. ब्रह्मचर्य नव्हे. स्त्रीया जोंवर सौभाग्य–कांक्षिणी राहतील व पुरुष सोटी पेट भिरवीत राहतील

तोंवर समाजांत समानतेची प्रस्थापना होऊं शकणार नाही. तात्पर्य काय की, जर समाजांत क्रांति घडवून आणावयाची असेल तर तुम्हांला तुमच्या व्यवहारांत प्रामाणिक राहिलें पाहिजे. स्त्रीशिक्षणाचे जर खरोखरच आपण पुरस्कर्ते अ तूं तर मग सुशिक्षित पुरुषाची प्रतिष्ठा व सुशिक्षित स्त्रीची प्रतिष्ठा या समान असल्या पाहिजे. आज स्थिति अशी आहे की, मुलीच्या बापाला मुलगी तर द्यावीच लागते; पण आणखी वर-दक्षिणाहि द्यावी लागते. आणि वराचे पायहि धुवावे लागतात. मुलें तर अशी ऐट दाखवितात की, त्यापुढे शुक्राचार्यांनी मान खाली घालावी. खुशामत, मनधरणी केल्यानंतर मोठ्या मिनतवारीने ते लग्नाला तयार होतात. आजच्या समाजांत स्त्रीयांसाठी ब्रह्मचर्याचा आदर्श विहित नसल्यामुळेंच स्त्रीयांची किंमत कमी झालेली आहे. आजच्या क्रांतियुगांत हीं जीवनाचीं मूल्यें आपल्याला बदलून टाकावीं लागतील.

## १० नागरिकत्व

दुसरा एक उपसिद्धांत या चर्चेतून निघतो. तो म्हणजे स्त्रीयांसाठीं मातृत्व हा सर्वश्रेष्ठ आदर्श राहूं शकत नाही. आपण स्त्रीला वीर-माता होण्याचा आशीर्वाद देतों, पण स्त्रीला मातृपदाशिवाय स्वतःच्या व्यक्तित्वाचें मूल्यच नाही काय? स्त्रीला वीरमाता होऊन जर मुलेंच केवळ उत्पन्न करायचीं असतील तर तिच्यासाठीं नागरिकत्व ही गौण वस्तु आहे. जर मिस्टर चर्चिल प्रधान मंत्री होऊं शकतात, तर श्रीमती चर्चिल यांनाहि प्रधान मंत्री होण्याचा अधिकार असावा. हा संपूर्ण नागरिकत्वाचा अर्थ आहे. जर विजयालक्ष्मी मंत्री होऊं शकतात, तर सरोजिनी नायडूची व्हाईसरायच्या जागेवर योजना व्हायला काय हरकत आहे? परंतु केवळ मातृत्वाला प्राधान्य दिल्यानें हे सर्व होऊं शकत नाही. ज्या अर्थाने आज स्त्री शरीरधन आहे; त्या अर्थाने तें इतःपर राहतां कामा नये. पुरुष शरीरधन मानला जात नाही, स्त्री समजली जाते. हरिश्चंद्राच्या सुंदर शरीराला काशीच्या बाजारांत कवडीमोलहि कुणी दिलें नाही; पण तारामतीची खरेदी करणारे कितीतरी लोक निघाले होते. तरी बरें की, तारामती भिकारीण बनली होती. पुरुषाच्या हाताला म्हणजे त्याच्या पराक्रमाला आणि श्रमाला किंमत आहे. परंतु स्त्रीच्या

बाबतींत तिचें रूप हीच मोलाची वस्तु आहे. ही स्थिति जोंवर राहील, तोंवर स्त्री कुलुपांत बंद करून ठेवण्याची वस्तु असेंच समजलें जाईल. हिऱ्याच्या अंगठीप्रमाणे तिला मजबूत तिजोरींत बंद करून ठेवावें लागेल. स्त्री ही खरोखरच सांभाळण्याजोगी वस्तु असेल; तर तिला अगदी किल्ल्याच्या तळघरांत जतन करून ठेवा. त्याबद्दल मला कांही म्हणावयाचें नाही. मी जुनाट मताच्या म्हाताऱ्या लोकांचे संस्कार बदलवूं शकत नाही. परंतु जेव्हा कधी तरुण मंडळी आपल्या घरीं नेतात आणि त्यांच्या स्त्रियांना मी पडदानशीन पाहतों तेव्हा माझें मन खचून जातें. कोणत्याहि राष्ट्रासमोर विशेष रूपानें स्त्रीरक्षणाचा सवाल असायलाच नको. या गोष्टीकडे तुम्ही माझ्या दृष्टिकोनां-तून पाहा. माझी साठ वर्षांची म्हातारी आई बाहेर जातांना माझ्या आठ-नऊ वर्षांच्या लहान मुलाला सोबत म्हणून नेते बरें, सोबतहि अशाची की जो संध्याकाळ होतांच अंथरुणाच्या बाहेर निघायला भितो. या वस्तुस्थितीचा जरा विचार तर करून पाहा. तुम्हांला आश्चर्यानें थक्क व्हावें लागेल. तो मुलगा माझ्या आईचें रक्षण काय करणार आहे? परंतु समाजाची रीतच मुळीं अशी पडून गेली आहे. मी स्त्री असतों आणि स्वातंत्र्याची भावना जर माझ्या मध्ये असती तर असल्या पुरुषकृत सामाजिक प्रथांचा आणि संस्थांचा माझे प्राण पणाला लावून देखील मी विरोध केला असता.

## ११ प्रतिष्ठेचा आधार कोणता ?

वरील प्रश्न सोडविण्यांतच क्रांति आहे. गांधींच्या विचारांची प्रक्रिया अशीच आहे. प्रत्येक स्त्रीने स्वतः आपले रक्षण करावें. असें गांधीजी म्हणतात. त्याचा अर्थ काय? अर्थ असा की, शरीरबलावर आमची अब्रु अवलंबून असून आमच्या प्रतिष्ठेला शरीरबलाचा आधार असतो, तौलनिक दृष्टीने पाहिल्यास स्त्रीचें शरीरबल पुरुषापेक्षा कमी असते. रशियामध्ये स्त्रियांना मोठमोठीं मजुरीचीं कामें दिलीं जात नाहीत. कारण ते मातृत्वाची प्रतिष्ठा वाढवूं इच्छितात. प्रॉडक्शन आणि रिप्रॉडक्शन, उत्पादन व प्रजनन यांत ते समन्वय साधूं इच्छितात. शरीरबलाच्या दृष्टीने स्त्री कमी प्रतीची ठरत असली म्हणजे तिचें सामाजिक स्थानहि गौण

असलें पाहिजे असें थोडेंच आहे ! हें समजण्यासाठीं आमच्या भावनांमध्ये क्रांती घडून आली पाहिजे. पुरुषांची प्रतिष्ठा देखील शारीरिक बलावरच जर अवलंबून असती तर सँण्डो व गामा पहिलवानांशिवाय इतर सर्वच अप्रतिष्ठित समजले गेले असते. रक्षणाचा अंतिम आधार तरी काय असावा ? जो आपल्या प्राणाची किंमत अब्रूपेक्षा जास्त मानत नाही त्याची अब्रु सुरक्षित असते. जो आपल्या अब्रूचें मोल प्राणापेक्षा कमी लेखतो त्याची प्रतिष्ठा कशी राहूं शकेल ! एकाची प्रतिष्ठा दुसऱ्यानें राखणें शक्य नाही. वास्तव आम्ही स्त्रीयांना रक्षणीय न समजणें अत्यावश्यक आहे. स्त्रीयांना स्वतःचें रक्षण आमच्यावांचून जर करतां येत नसेल, तर त्या अरक्षितच राहतील. एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीनें साह्य करणं ही गोष्ट वेगळी. स्त्रीयांनाहि असें साह्य आपल्याला करतां येईल. आणि तें करणें आपलें कर्तव्य पण आहे.

## १२ प्रदर्शनाची कल्पना

स्त्री ही खरेदी–विक्रीची किंवा अपहरणाची वस्तु असतां कामा नये. पूर्वीच्या काळीं स्त्री ही बक्षीस देण्याची वस्तु मानली जात असे. त्या काळचे राजे हत्ती घोडयाप्रमाणें आपल्या मुली देखील बक्षीसाच्या रूपानें देत असत. जिच्या पोटीं आम्ही जन्म घेतला तिला जर कुणी अपहरणाची वस्तु मानली, खैरात वाटण्याची वस्तु म्हणून तिचें मोल केलें तर आम्हांला काय वाटेल ? आणि इतकें असूनहि मातृत्वाच्या आदर्शाच्या बाता मारतोंच. स्त्री ही अपहरणाची किंवा बक्षीसाची वस्तु म्हणून तिच्याकडे पाहिलें जाणार नाही, तेव्हां तो प्रदर्शनाचीहि बाब राहणार नाही. विनोबा गांधीप्रमाणेच उघडया शरीराने हिंडतात. परंतु त्यांत शरीराचें प्रदर्शन नाही. पण तेंच एखाद्या सुप्रसिद्ध पहिलवानाचें शरीर पाहण्यासाठीं आपण दूर दूरुन येतों. त्यासाठीं तिकिट असल्यास तेंहि विकत घेतों. त्याचें शरीर सुंदर सुडौल असतें आणि म्हणून तें प्रदर्शनीय असतें. आपण उघडया अंगाने वावरतों म्हणून आगरकरांनी आपल्याला जंगली म्हटलेलें आहे. स्त्रीयांवरहि त्यांनी कडक टीका केली आहे. परंतु या प्रकारच्या उघडया शरीरांत प्रदर्शनाचा उद्देश नसतो. परंतु आजकाल कपडयाच्या योगाने,

शरीर झांकण्याऐवजीं तें उघडेच ठेवण्याची प्रवृत्ति स्त्रीयांमध्ये अधिक दिसून येते. यांत प्रदर्शनाची भावना असते. जोंवर ही भावना कायम राहील तोंवर शरीर म्हणजे रूप ही क्रय- विक्रयाची बाब राहील.

मी स्वातंत्र्यवादी आहे. स्त्रीसाठी पुरुषाचें व पुरुषासाठी स्त्रीचें शरीर जोंवर क्रयविक्रयाची बाब राहील तोंवर पावित्र्य राहूं शकणार नाही असें माझें ठाम मत आहे. वास्तव स्त्रीला आत्मरक्षणक्षम जर बनवावयाचें असेल तर तिचें शरीर ही क्रयविक्रयाची वस्तु असतां कामा नये. असें झाल्यास ती प्रदर्शनाचीहि वस्तु राहणार नाही. व प्रदर्शनाच्या अभावी नजाकत सुकुमारता इ० चें हि अस्तित्व राहणार नाही.

## १३ मूल्य परिवर्तन.

पुराणांत स्त्रीयांचीं वर्णनें आलेलीं आहेत. सीतेविषयीं असें वर्णन केलें आहे की, ती जमिनीवरून चालत असताना तिच्या पायांना फोड येत. तिने कधी दिव्याची वात देखील सरकवण्याचे कष्ट केले नव्हतें. एकूण स्त्री कांचेच्या आलमारींत ठेवण्याची वस्तु आहे तर! नाजुकपणा हा पुरुषांसाठीं जर दोषरूप ठरत असेल तर स्त्रियांसाठीहि तो ठरायला पाहिजे. कोमलता हा गुण असेल तर तो दोघांनाहि लागूं पडायला हवा. त्याचप्रमाणे कठोरता देखील उभयतांसाठी सारखीच दोषरूप ठरायला हवी.

आपणाला शरीरश्रमाचीं मूल्यें देखील बदलवून टाकावीं लागतील. गुलामीची प्रथा रूढ असलेल्या समाजांत मालक लोक जे शरीरश्रम वाटून घेत ते नाजूक साजूक असे. परंतु गुलामाच्या वांट्याला मात्र निव्वळ काबाड कष्ट येत. आणि त्या काबाड कष्टांत हीन मानलीं गेलेलीं कामेंच त्यांच्यावर सोंपविलीं जात. स्त्रीया दुबळया असूनहि त्यांच्या माथीं उखळ मुसळ मारलें जाई; दळण त्यांनी दळावें, पाणी त्यांनी भरावें, पुरुषांचे पाय त्यांनी चेपावे, झाडलोट त्यांनी करावी, असें कां म्हणून? त्या नाजूक आहेत म्हणून आणि आम्ही लोडाशीं टेकून दुसऱ्याचे हक्क, काबाडकष्ट घेण्याचेच श्रम करावे. हें काय आम्ही मजबूत आहोंत म्हणून ? आम्ही आमच्या वाट्याचें काम जें करावयाचें तें कोणते म्हणाल तर, फक्त उठण्याबसण्याचें, दंड

बैठकीचें. कां ? तर त्यावांचून शरीर सुदृढ राहूं शकत नाही म्हणे ! आपणाला हीं सगळीं जुनीं मूल्यें पार बदलवून टाकायला हवींत. मातृत्वाला सेनानीत्वापेक्षा श्रेष्ठ मानलें पाहिजे. याचेंच नांव क्रांति. दळण, कांडण, चूलवूल, घरकामें हीं केवळ स्त्रियांच्याच क्षेत्रांत मोडायला नकोत. महादेव भाई आश्रमांत आले तेव्हां बापूंनी त्यांना स्वयंपाक करायला लावलें. प्यारेलालजींनाहि याच दिव्यांतून जावें लागलें. असल्या प्रकारच्या उपयुक्त शरीरश्रमांना समाजांत आजवर अधिष्ठित मानलें गेलें नाही. या पुढें आम्हांला त्यांची प्रतिष्ठा वाढविली पाहिजे. त्यावांचून आम्हांला स्त्रिया आमच्या बरोबरीला आणतां यावयाच्या नाहीत. आमच्या येथील लोक अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य देशांतून जाऊन आल्यानंतरहि म्हणतात की, स्त्री–स्वातंत्र्याचा अर्थ आमची कुटुंब व्यवस्था छिन्नभिन्न होणें असा असेल तर तशा प्रकारचें स्त्री स्वातंत्र्य आम्हाला नको. यावर माझें उत्तर असें की, कुटुंब–व्यवस्थेचा अर्थ जर स्त्रीचें पारतंत्र्य असेल, तर तशी कुटुंब–व्यवस्था मला नको. खरें पाहूं जातां या दोहोंत कांहीहि आवश्यक असें नाही.

## १४ सहजीवनाचा अग्रदूत–सह–शिक्षण

सहजीवनाचा आदर्श आम्ही निस्संदिग्ध मान्य केल्याबरोबर सह–शिक्षणाचा प्रश्नहि सोडविला जाईल. सहजीवनाचा प्रश्न आम्हांला सोडवावाच लागणार आहे. वीस-वीस वर्षांची शिक्षा झालेले स्त्री पुरुष तुरुंगांत आजन्म ब्रम्हचारी राहूं शकतात, कारण दोघांनाहि त्यांच्या त्यांच्या आवाराच्या बाहेर जाण्याची मनाई असते. असल्या या पावित्र्याचा जन्म स्वातंत्र्याच्या पोटीं झालेला नसल्यामुळें तें पावित्र्यच मानलें जाऊं शकत नाही. बर्नार्ड शॉ हे मोठे विक्षिप्त लेखक आहेत. त्यांची विचार करण्याची तऱ्हाहि मोठी विचित्र आहे. त्यांनी एका ठिकाणीं असें म्हटलें आहे की, आज आमच्या संस्कारांना असेंच वळण लागून गेलें आहे की, स्त्रीपुरुष परस्परांसमोर स्वाभाविक भावनेने जाऊंच शकत नाहीत. स्त्रीयांना पुरुषांसमोर सहज भावाने वागतां येत नाही. यालाच सहजीवन व सह–शिक्षण म्हणावयाचें काय ? जी नीतिमत्ता स्वतंत्र जीवनाला घाबरते; ती नीतिमत्ता

टिकूंच शकत नाहीं. सहजीवनाची व सह-शिक्षणाची ही अत्यावश्यक व अपरिहार्य अशी अट आहे.

गांधीजींकडे ज्या मुली येत त्यांचे केस गांधीजी काढून टाकीत असत. अहो, आम्ही भांडून भांडून विधवांचें केशवपन बंद करविलें आणि इकडे गांधी हे स्त्रीयांचें शिरमुंडन सर्रास प्रचारांत आणूं लागलें. मुलींना चड्ड्या सदरे वापरायला सांगूं लागले. त्यांना लोक पागल म्हणतात. परंतु त्यांचें डोकें चांगलें ठिकाणावर आहे. आमचीच दृष्टि विकृत झालेली आहे. गांधीजी स्त्रीयांना रक्षणाकांक्षी ठेवूं इच्छित नाहीत. त्यांना रूप-जीवी, शरीर-जीवी ठेवूं इच्छित नाहीत. स्त्रीया शरीराने पवित्र ठेवावयाच्या असतील तर स्त्री रक्षणाकांक्षी राहतां कामा नये. असें झाल्यावरच मनुष्य या नात्याने स्त्रीला शिक्षण देण्याचा आमचा दावा खरा मानला जाईल.

अशा रीतीने शिक्षणाचें वातावरण जर बदलवितां आलें तर सह-शिक्षणांतूनच उन्नत व पवित्रतम सह-जीवन परिणत होईल.

---

# “ भार्या रूपवती शत्रुः ”

## १. पुरुषार्थाचा संदेश.

स्त्री जातीकरितां गांधीजींनी काय केलें? त्यांनी स्त्रीला जीवनदान दिलें, असें या प्रश्नाचें उत्तर आहे. कारण गांधीजींनी आपल्या अहिंसा आणि ब्रह्मचर्याच्या द्विविध शिकवणीने स्त्री जातीला अभयदान दिलें आहे. एका अर्थाने गांधींची अहिंसा दुर्बलासाठीच आहे. शरीराने दुर्बल असलेल्या, शस्त्रास्त्रांचा अभाव असलेल्यांनी पुरुषार्थापासून वंचितच राहावें काय? यावर गांधीजींचें म्हणणं असें की, ‘ खचित नाही. शरीर-बलयुक्त माणसापेक्षा आणि हत्यारबंद तरवार बहाद्दरापेक्षा ते पुष्कळच अधिक पुरुषार्थवान् होऊं शकतील. आशा आणि विश्राम देणारा हा संदेश त्यांनी जे दुबळे आहेत त्यांना दिला आहे. अबला म्हणवून घेणाऱ्या स्त्रीला देखील त्यांनी हा पुरुषार्थाचा संदेश दिला. स्त्रीचें जीवन नव्या प्रेरणांनी, नव्या स्फूर्तीने, आशा-आकांक्षांनी सजीव करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## २. अधीनतेचें कारण

हें करतांना नारीजीवनाची प्रचलित मूल्यें बदलण्याच्या प्रयत्ना-पासून त्यांना आपल्या कामाला सुरुवात करावी लागली. आजवर स्त्रीचें शरीर आणि रूपच तिची दौलत मानली जात होती. तिच्या सत्तेचाहि आधार हाच होता. गांधीजी हें बदलून टाकूं इच्छितात. स्त्री ही रूपजीवी व शरीरपरायण असल्यामुळे पुरुषाधीन झाली आहे. कुणातरी गुणवान्, चारित्र्यवान्, पुरुषार्थवान् माणसाच्या स्वाधीन स्त्रीला आपलें सर्वस्व करून द्यावें लागतें. त्याशिवाय ती निश्चिंत होऊं शकत नाही; आज्ञा-पालन आणि पतिसेवा हाच तिचा धर्म होऊन बसतो. परंतु ती स्त्री

पुरुषाकरतां मात्र एक जबाबदारीची सांभाळण्याची वस्तु होऊन बसते. आणि व्यापक समाजापुढे एक समस्या होऊन बसते. या दुहेरी सामाजिक प्रश्नाचा विचार गांधीजींनी आपल्या परीने केलेला आहे.

## ३. एक सुभाषित

मला एक सुपरिचित सुभाषित–त्याला सुभाषित म्हटल्यास–आठवते. 'भार्या रूपवती शत्रुः' सांभाळण्याची वस्तु जितकी अधिक सुंदर तितकीच तिची जोखीमहि अधिक. कारण ती दुसऱ्याच्या अभिलाषेचा विषय होते. सुंदर वस्तु जोखीम समजली जाते. जमीनजुमल्याबरोबरच जोरू म्हणजे स्त्री ही देखील जोखीमच आहे. जोखीम जितकी अधिक असेल, तितकी सांभाळण्याकरतां फार सावधगिरी घ्यावी लागेल. म्हणून महादार्शनिक तत्त्वज्ञशिरोमणी शंकराचार्यांनी म्हटलें आहे, 'अर्थमनर्थम् भावये नित्यम्' अर्थ नेहमी अनर्थ माना. कारण काय? तर 'पुत्रादपि धनभाजां भीतिः' धनवानाला आपल्या पुत्रापासूनहि भीति असते. जर जड संपत्तीची ही स्थिति, तर मग जिचें शरीरच संपत्ति आहे तिची स्थिति काय विचारावी? तिच्या जीवनाचा आरंभ आणि परिपूर्णता आत्मसमर्पणातच आहे. स्वतःला संपूर्णपणें अर्पित करणे आणि स्वत्व विसरून जाणें यांतच तिच्या जीवनाची पूर्णता व धन्यता आहे. म्हणून स्त्री स्वतःकारणें जगतहि नाही व मरतहि नाही. तिचा शृंगार, तिची वेशभूषा, तिचे परिश्रम, तिची विद्या कृष्णार्पण नव्हे, तर 'परार्पण' होत असे.

## ४. विषादमूलक त्याग

या संबंधी मला एका करुण प्रसंगाचा उल्लेख करावासा वाटतो. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर माझ्या मातेनें रंगीत वस्त्रांचा, डागदागिन्यांचा आणि केशभूषेचा परित्याग करण्याचा निश्चय केला. त्यागाला माझा विरोध नाही. परंतु कांही त्याग असे असतात की, ज्यांच्या योगें जीवनाचा विकास होतो. उलट कांहींच्या योगें जीवनाची क्षति होते.

विषादमूलक त्यागाने माणसाचें मन मरून जातें. त्याला जीवनाबद्दल अरुचि वाटूं लागते, आणि मग तो आपल्या स्वतःच्याहि कामाचा राहात नाही, व इतरांनाहि त्याचा कांही उपयोग होत नाही. त्यागी जीवन म्हणजे अर्थहीन जीवन नव्हे; निष्क्रिय जीव नव्हे. दुसऱ्या प्रकारचा त्याग परोपजीवित्वाचा परिणाम असतो. शारीरिकतेमुळें स्त्रीचें जीवन व्यक्तिनिष्ठ बनून जातें. पतीचा देहांत झाल्याबरोबर ती आपल्याहि जीवनाचा अंत झालासें मानतें, व म्हणून अनिच्छन्नपि वैधव्य–'संन्यास' धारण करते. स्मशान–वैराग्य अल्पजीवी असतें. उलट वैधव्य–संन्यास यावज्जीव असतो. तथापि दोहोंत कांही भेद नाही. माझी आई वैधव्यत्याग करूं जात होती. त्या संन्यासांत तिला आनंद नव्हता. तिच्यावर कोसळलेला प्रसंग हा तिच्या जीवनांतील सर्वांत दुःखप्रद व उद्वेगजनक होता. तो प्रसंग आला नसता तर माझ्या आईने स्वतःला धन्य धन्य मानले असते. तो प्रसंग टळावा म्हणून तिने नवस सायास केले होते. तिच्याकरतां तो प्रसंग त्यागाचा नव्हता. आपल्या प्राक्तनाबद्दल शोक करण्याचा, सामाजिक जीवनापासून सदाचें उपरत होण्याचा तो कटु प्रसंग होता. तो संन्यासाचा प्रसंग, तिच्या सौभाग्याचा, कुंकवाचा अंत करण्याचा प्रसंग !! यापुढे ती सुवासिनीच्या प्रतिष्ठेपासून वंचित झालेली एक अभागी विधवा समजली जाणार होती. खेड्यांतील बायका मुलें तिला ग्रामीण भाषेंत अनुच्चारणीय अशा 'रांड' या शद्वाने संबोधूं शकत होतें. ज्या त्यागांत विषाद आहे, अपमान आहे, दास्यत्वाचा दुर्गंध आहे, तो त्याग नव्हे, तो संन्यास नव्हे. स्त्री जीवनाच्या अप्रतिष्ठेचें सूचक असें तें चिन्ह आहे ! म्हणून माझ्या आईला मी प्रेममूलक आग्रहाने विनविलें कीं, तिने स्त्री जीवनाची अप्रतिष्ठा सुचविणारा हा विधी करूं नये; पण ती कसें ऐकेल ? ती ज्या वातावरणांत, ज्या परंपरेंत वाढली होती, त्या परंपरेंतील संस्कारामुळें माझे शद्व तिला शल्यासारखे बोचले.

## ५. विसंगतींत संगती.

स्त्री जीवनाची प्रतिष्ठा वाढवूं इच्छिणाऱ्या सुधारकांनी विधवेच्या केशवपनाचा मोठ्या निकराने विरोध केलेला आहे. गांधीजींनी विधवेला

मांगल्याची व त्यागाची मूर्ति मानली आणि जबरदस्तीच्या केशवपनाला विरोध केला. परंतु तेच गांधी आपल्या आश्रमांतील कुमारिकांना आणि सधवा स्त्रीयांना देखील केशवपनाचा सल्ला देतात. त्यांच्या आश्रमांत कित्येक सुंदर पाश्चिमात्य महिलांनी मोठ्या आवडीने वपन करविलें आहे. गांधींच्या इतर अनेक गोष्टीप्रमाणे ही गोष्टही विसंगत आणि असमंजसपणाची वाटते. एकीकडे विधवेच्या केशवपनाला विरोध आणि दुसरीकडे कुमारिका आणि सधवा यांना वपनाचा सल्ला, एकीकडे विधवा विवाहाचा प्रतिबंध उठविण्याचें समर्थन आणि दुसरीकडे नवपरिणीत वधुवरांनाहि ब्रह्मचर्य पालनाचा आग्रह! गांधींच्या या विसंगत गोष्टींत संगती आणि सामंजस्य आहे. आणि क्रांतीचें बीजहि आहे.

## ६. भारभूत आणि भूषणभूत

"न स्त्री स्वातंत्र्यमर्हति." स्त्री स्वातंत्र्याला योग्य नाही. ही प्राचीन समाजशास्त्राने आणि धर्मशास्त्रांनी विहित केलेली व्यवस्था होय. यास्तव स्त्रीचें रक्षण तिच्या कुमारी अवस्थेंत तिचा पिता करतो; यौवनांत पतीकडे ही जबाबदारी जाते आणि वृद्धापकाळीं पुत्राने ती रक्षणाची जबाबदारी सांभाळावयाची असते. तात्पर्य काय की, प्रत्येक अवस्थेंत या ना त्या स्वरूपांत पुरुषच स्त्रीचें रक्षण करतो. पुरुषासाठी स्त्री पालनीय आणि रक्षणीय आहे. त्यामुळेंच ती त्याच्या काळजीचा आणि जबाबदारीचा विषय आहे. ती अविवाहित असेपर्यंत पिता चिंताक्रांत होऊन म्हणतो, 'दारिका हृदयदारिका पितुः' पुत्री पित्याची हृदय कापणारी असते. परंतु अनुरूप पतीच्या स्वाधीन करून देण्याच्या आशेने तो तिचा सांभाळ करतो. कन्या परक्याचें धन आहे. 'अर्थो हि कन्या परकीय एव' हें धन धन्याला सोडून 'प्रत्यर्पितन्यास इवांतरात्मा' जगूं ज्याची ठेव त्याला सोपवून पिता निश्चिंत होतो आणि चिंताक्रांत होण्याची पाळी पतीवर येते. तो तिचा पति आणि भर्ता असतो. त्यांत कसलीहि शर्त नाही, किंतु, परंतु नाही. अपवाद नाही. स्त्री त्याच्यासाठी भारभूत आणि भूषणभूतहि होते. ती जितकी रूपवती असेल तितका तिचा गौरव वाढतो. शान वाढते. प्रतिष्ठा

वाढते. आणि त्याबरोबरच जबाबदारी पण वाढते. रूपवती स्त्रीयांच्या करतां राष्ट्राराष्ट्रांत युद्धें होत असत. राजामहाराजांमध्ये लढाया होत. ट्रॉयच्या हेलनसाठी जें युद्ध झालें, त्यावरून होमरला 'इलियड' महाकाव्याची प्रेरणा मिळाली. रामरावणाच्या युद्धाचे कारणहि जानकीच होतीना ? आणि गिरधर कविवर्य म्हणतात, 'कौरव पांडव वंशको कियो द्रौपदी नाश' हेंहि अगदीच खोटें नाही.

## ७. केवळ भारभूत

पण स्त्री जेव्हा विधवा होते, तेव्हा ती कुणाची ठेवहि असत नाही आणि संपत्ति तर नाहीच नाही. यानंतर तिला आपलें उरलेलें जिणें कसें बसें कंठावें लागतें. मग ती भूषणभूत उरत नाही. केवळ भार होऊन राहाते. आणि त्यामुळे आपला भार कमीत कमी दुसऱ्यावर पडावा म्हणून तिला नित्य यत्न करावा लागतो.

त्यासाठी तिला वैभवाच्या व आनंदाच्या सर्व चिन्हांचा त्याग करावा लागतो. आपला भार कमी करण्यासाठी स्वतःच्या गरजा कमी कराव्या लागतात. व सर्वप्रकारच्या मंगल आणि पवित्र कार्यांपासून अलिप्त राहावें लागतें. तिचा सांभाळ करणें म्हणजे वेठ देण्यासारखें असते. तिने आपल्या परिवारांतील लोकांची सेवाशुश्रुषा करून आपली उपयुक्तता सिद्ध करावी आणि जगावें. पित्याकरता ती ठेव होती. म्हणून तिचें शरीर सुडौल व आकर्षक करणें हा आपला धर्म आहे असें तो मानत असे. पतीसाठीं ती भोगाचा विषय होती म्हणून ती स्वतःच आपलें शरीर आकर्षक आणि सुशोभित करण्याचा निरंतर प्रयत्न करीत असे. पण विधवा झाल्यावर मात्र तिचें सौंदर्य आणि आकर्षकता तिच्या संरक्षणाच्या दृष्टीने आपत्तिजनक होऊन बसते. पतीकरता रूपवती भार्या शत्रु असली तरी ती गौरव आणि प्रतिष्ठेचा विषयहि असते. परंतु इतरांच्या करता स्त्रीचें रूप म्हणजे संकटाची पताका ! यास्तव प्राचीन व्यवहार विशारद लोकांनी हा मार्ग शोधला. विधवेने पुरुषाच्या अभिलाषेचा विषय राहूं नये म्हणून तिचें रूप कमीत कमी आकर्षित करावें. ती जितकी जास्त कुरूप असेल तितकी ती सुलभ रक्षित किंवा अनायास रक्षित राहील.

स्त्री जोंवर रूपनिष्ठ राहील तोंवर ती परोपजीवीहि राहील. कारण रूप हें नेहमीच इतरांकरिता असतें. आणि पतीच्या नंतर जेव्हा तिच्या रूपाचें प्रयोजन संपुष्टांत येईल तेव्हा तिला आपलें शारीरिक सौंदर्य, कटाक्ष-पूर्वक कमी करणें अवश्य होऊन बसेल. प्राचीन काळचे लोक म्हणजे तत्कालीन स्त्रीपुरुष विधवेला कुरूप करणें हें तिच्या रक्षणाचें साधन मानीत. गांधींनी विधवेच्या या कुरूप करण्याच्या पद्धतीचा विरोध केला. परंतु ते स्त्रीची शरीरपरायणता आणि रूपनिष्ठा नष्ट करूं इच्छितात. तिच्या त्याग वृत्तीचें आणि आत्मसमर्पण शक्तीचें चीज करूं इच्छितात. स्त्रीचें जीवन व्यक्तिनिष्ठ न राहतां जेव्हा समाजनिष्ठ व तत्त्वनिष्ठ बनेल तेव्हाच हें होऊं शकेल. म्हणून ते पुरुषाला जसें सांगतात, तसेंच स्त्रीयांनाहि सांगतात की, शरीर शृंगारण्यांत सर्व दिवस घालवूं नये. शरीर परिश्रमाला योग्य आणि कार्यक्षम व्हावें म्हणून जें काय करणें अगत्य असेल तेवढें केलें पाहिजे. त्याला प्रयत्नपूर्वक दुसऱ्याच्या अभिलाषेचा आणि आकर्षणाचा विषय मात्र बनाविण्याची गरज नाही. माणसाची शृंगारप्रियता जितकी कमी होईल तितकीच त्याची कार्यप्रवणता वाढेल. स्त्रीपुरुषांना एकाच पातळीवर, समान भूमिकेवर आणण्याचा प्रयत्न गांधी करीत आहे. म्हणून त्यांच्या मताने पुरुषांचें केशवपन जितकें प्रशस्त आणि वांछनीय आहे तितकेंच स्त्रीचें केशवपन देखील आहे.

## ८. वेगवेगळ्या कसोट्या.

पुरुष जेव्हां सर्वसंगत्यागपूर्वक संन्यासी होतो, तेव्हा लोक त्याची प्रशंसा करतात. आणि संन्यासाश्रमांत आपल्या जीवनाची कृतार्थता आहे अशी त्याची देखील समजूत असते. नागरिक या नात्याने त्याच्या जीव-नाचा संन्यासानंतर अंत होतो असें मानण्यांत येतें. व्यक्ति या नात्याने देखील त्याचा सामाजिक मृत्यु होतो. कारण त्याचें कायदेशीर असे कांहीच अधिकार उरत नाही. एवढेंच काय, पण त्याला मतदानाचा हक्कहि राहात नाही. तथापि तो बंधनातीत झाला या एकाच कारणाने त्याची सामाजिक प्रतिष्ठा कमी होण्याऐवजीं वाढते. आणि सर्व समाज त्याच्या अनुभवापासून, त्याच्या ज्ञानापासून लाभ करून घेऊं इच्छितो. म्हणून पुरुषाचा संन्यास हा

खराखुरा संन्यास असतो. पण स्त्रीची गोष्ट वेगळी असते. माझ्या वडिलांच्या मरणापूर्वी माझ्या आईला मरण आलें असतें तर लोकांनी तिच्या भाग्याचे पोवाडे गायिले असते. आणि तिने देखील मरतेवेळीं आपल्या जीवनाचें सार्थक झालें असें मानलें असतें.

या विषमतेचें मूळ कारण असें आहे, समाजामध्ये पुरुष आणि स्त्री यांच्यासाठी रूढ आणि मान्य असलेल्या कसोट्या भिन्न भिन्न आहेत. पुरुषासाठी जें प्रशस्त आणि श्रेयस्कर तेंच स्त्रीसाठी अप्रशस्त आणि अनर्थावह मानलें जातें. जी कृति एकासाठी सदाचार ठरते तिनेच दुसरा स्वैराचारी ठरतो. एकासाठी जी स्वतंत्रता आहे; दुसऱ्यासाठी तीच स्वच्छंदता आहे. हीं दोन भिन्न मापें गांधीजींना अनावश्यक आणि भयावह वाटतात. स्त्री आणि पुरुषाची नैतिक भूमिका एकच असावी, यासाठी त्यांचा निरंतर प्रयत्न चालला आहे. केवळ लिंगभेदामुळें सदाचाराच्या कसोट्या वेगवेगळ्या मानल्या जाऊं नयेत असें त्यांचें स्पष्ट मत आहे.

म्हणून त्यांनी स्त्रीलाहि ब्रह्मचर्याचा आणि संन्यासाचा अधिकार विहित आहे, असें प्रतिपादन केलें. पत्नि मेल्यावर पति अलंकाराचा व सुंदर वस्त्राचा त्याग करीत नाही. आपल्या राहणींत आणि नित्याच्या जीवनांत खास बदलहि करीत नाही. ज्या पुरुषाला आपल्या पत्नीबद्दल विशेष अनुराग असतो तो तिच्या मरणानंतर विरक्त होऊन आपल्या वैवाहिक जीवनाची समाप्ति करतो. लोक त्याच्या संयमाची आणि एकनिष्ठपणाची वाखाणणी करतात. बहुपत्निकत्व, कमींत कमी अनेक पत्नित्व तरी पुरुषाकरितां स्वाभाविक मानलें जातें. म्हणून त्यामुळें एकपत्नीव्रताचें पालन करणाऱ्या पुरुषाची जगांत स्तुति होते. स्त्रीसाठी मात्र एकपतित्वच शिष्टसंमत मानल्या गेल्यामुळे पतीच्या निधनानंतर तिच्या वैवाहिक व व्यक्तिगत जीवनाचाहि अंत होतो. ती आपलें उर्वरित आयुष्य मरणोत्तर जीवनाच्या रूपाने एखाद्या अपराधिनीप्रमाणे घालविते. 'जणू ती जगाला म्हणते, काय करूं त्यांच्या नंतरहि मी जगत आहे. पापिणी मी अभागी आहे. अवलक्षणीय आहे, जगण्याच्या या अपराधाबद्दल अखिल जगतांत कृपावंत होऊन मला

क्षमा करावी.' विधुर पुरुष पुनर्विवाह न करता राहिला तर त्याचें कौतुक होतें. विधवा स्त्री मात्र तशी राहिली तर तिचें जीवन जघन्य, निंद्य, तिरस्करणीय मानलें जात नाही इतकेंच. ती प्रतिष्ठा कोण देणार?

## ९. असह्य परिस्थिति.

यांचें कारण स्पष्ट आहे. 'नारी तुनी इक पुरुष बिना' पाण्याशिवाय ज्याप्रमाणें नदीचें अस्तित्व व्यर्थ होतें त्याप्रमाणें पुरुषावांचून स्त्रीचें जीवन व्यर्थ आहे. जिचा पति मेला असेल त्या स्त्रीचें शरीर प्रेतवत आहे. तिला एक तर आपल्या पतीच्या चितेवर आरूढ होऊन सहगमन केलें पाहिजे. सती गेलें पाहिजे. किंवा प्रेतवत् बनून स्मशान यात्रेप्रमाणे शोक आणि निराशेने युक्त अशी जीवयात्रा कंठली पाहिजे. गांधीजींना हें सगळें असह्य होतें. ते म्हणतात, जबरीचा त्याग हा त्याग नव्हे. गुलामी आहे. पुरुषाला प्रसन्न करण्यासाठीं स्त्री जर आपला देह जगवीत असेल तर ती आपल्या आत्म्याचा अपमान करीत आहे. आपलें स्वत्व विकायला मांडून स्वतः दास्यत्व पत्करीत आहे. कुणाला प्रसन्न करण्यासाठी शरीर नटविणें ही अनार्यता आहे. स्वाभिमानशून्यता आहे. यास्तव त्यांनीं आपल्या आश्रमाच्या मुलींमध्ये अशी भावना निर्माण केली कीं, आम्ही आपलें शरीर विलासप्रिय पुरुषाला खेळणें म्हणून वापरूं देणार नाही. आणि केवळ सौंदर्यलोलुप पुरुषासाठी प्रदर्शनीय वस्तु होण्यांत आम्ही आपल्या जीवनाचें सार्थकहि मानणार नाही. मेहनत, मजुरी करायला, धांवण्या कुदण्याला जो पोशाख आपणाला सोयीचा होईल तो पोशाख आम्हांला उपयुक्त आणि वांछनीय आहे. आमचें शरीर आम्हांला कार्यक्षम बनवावयाचें आहे. आमच्या जीवनाच्या उपयोगाला पुरुषाच्या संपर्कापासून आरंभ आणि त्याच्या निधनानंतर त्याचा अंतहि होता कामा नये.

## १०. एक उदाहरण.

या संबंधांत मला दुसरा एक हृदय विदारक प्रसंग आठवतो. पुण्यश्लोक जमनालालजींचें शव एका गादीवर पडलेलें होतें. जानकीदेवी

त्यांच्या जवळ बसलेल्या होत्या. पूज्य बापू त्यांना सांत्वना देत होते. मी पतीसोबत सहगमन करीन असा जानकीदेवींचा हट्ट होता. बापू म्हणाले, तुमची भावना हृदयभेदक आहे. पवित्र आहे, उच्च आहे; पण त्यांत विवेक नाही. जमनालालजी देवस्वरूप झाले. पण शरीरांत प्राण असे तोंवर त्याचा शेवट करण्याचा त्यांनी कधी विचार केला नाही. त्यांनी तसें केलें असतें तर ते कर्तव्यपराङ्मुख झाले असते. शरीरावर मालकी ईश्वराची आहे. कारण तें त्यानें दिलेलें आहे. त्याला वाटेल तोंपर्यंत तो या शरीराकडून काम घेईल. जेव्हा त्याला वाटेल कीं, शरीराचा उपयोग संपला तेव्हा तत्काळ त्याचा नाश करील. आमच्या शरीराचा आम्ही भावनावश होऊन नाश केला तर सूक्ष्म अहंकाराचा दोष पदरीं येतो. जर तुम्हांला जमनालालजींचें कार्य पवित्र आणि हितकारक आहे, असें वाटतें तर तुम्ही आपलें उर्वरित जीवन त्या कार्याला अर्पण करा. तें यथार्थ सहगमन होईल. त्यांची खरी सहयात्रिणी होण्याचें श्रेय तुम्हांला मिळेल. तुमच्या प्रेमाची विवेकयुक्तता आणि कल्याणकारकता सिद्ध होईल. त्यांच्या मृत्यूनें तुमच्या चित्तांत विरक्तता उत्पन्न झाली असेल, तर सुखोपभोगाच्या सर्व साधनांचा संतोषपूर्वक त्याग करून अपरिग्रही व्हा. आणि संन्यासिनीच्या पवित्र आश्रमाचा स्वीकार करून विषादमय वैधव्याचा नव्हे तर प्रसादमय संन्यासाचा नवीन आदर्श कायम करा.' शब्द माझे आहेत. म्हणून त्यांत क्लिष्टता आणि अभ्यासजडता आहे. गांधींच्या स्वाभाविक, सुबोध, सहजसुंदर स्वयंप्रभावी भाषेचें अनुकरण मला कसचें करतां येणार? परंतु भाव गांधींचे आहेत. आणि त्यांत त्यांची क्रांतिकारी भूमिका सामावली आहे.

## ११. स्वावलंबन हाच उपाय.

स्त्री जातीचे प्रशंसक म्हणतात, स्त्री प्रेमरूप आहे. प्रेमजीवी आहे. गांधीजी म्हणतात, खरें आहे तें. पण तिचें प्रेम पुरुषाच्या प्रेमासारखें केवळ व्यक्तिनिष्ठ न राहतां समाजनिष्ठ आणि विश्वनिष्ठ व्हावें. प्रशंसक म्हणतात स्त्री ही त्याग व सहनशीलता यांची मूर्ति आहे. गांधी म्हणतात, मी त्याबद्दल तिचें अभिनंदन करतों. पण तिचा त्याग व सहनशीलता जबरीची न राहता स्वेच्छाप्रसुत

आणि स्वयंप्रेरित व्हावी. प्रशंसक म्हणतात, स्त्री ही सौंदर्याची व कलेची मूर्ति आहे. गांधी म्हणतात, त्या सौंदर्यावर मी मुग्ध आहे, त्या कलेबद्दल मला सद्भाव आहे, पण स्त्रीच्या शरीराचें सौंदर्य तिच्या कोमलतेंत, सुकुमारपणांत आणि शृंगारांत नसून तिच्या परिक्षमतेंत, तिच्या सुदृढपणांत आणि तिच्या अधिकारशक्तींत आहे. तिचें जीवन स्वरक्षित व सुरक्षित बनविण्यांतच तिच्या कलेची कृतार्थता आहे. पुरुषाच्या उदात्त आणि संयमपोषक भावना जागृत करणें आहे. वैषयिकता आणि विलासिता उत्तेजित करण्यांत तिच्याकडून पुरुषाला प्रोत्साहन मिळतां कामा नये.

आणखी एक मुद्दा राहिला. समाजशास्त्रवेत्ते म्हणतात, समाजांतील स्त्रीयांची स्थिति हा त्या समाजाच्या संस्कृतीचा मानदंड आहे. म्हणजे ज्या प्रमाणांत समाजांतील स्त्रीया सुरक्षित आणि स्वतंत्र राहतलि तितका तो समाज संस्कृतीदृष्टीने उन्नत समजला जाईल. आणि त्या समाजांतील पुरुष तेवढ्या प्रमाणांत सज्जन आणि सुसंस्कृत-समजले जातील.

पण याची आणखी दुसरी एक बाजू आहे. स्त्रीच्या उन्नत दशेची कसोटी सामाजिक संकटाच्या आणि अशांततेच्या काळीं होते. समाजांत क्रूरता, असभ्यता, यांचें थैमान चालू असतांना ज्या स्त्रीया आपल्या स्वातंत्र्याचें आणि मर्यादेचें रक्षण करूं शकतात, त्याच स्त्रीया खऱ्या समुन्नत होत. त्यांची सामाजिक जीवनाची पात्रता तेव्हाच सिद्ध होते. स्त्रीजीवनाला त्याच स्त्रीया स्वयंप्रतिष्ठित आणि आत्मावलंबी बनवूं शकतात. गांधीजी पूर्वबंगालमधलि स्त्रीयांच्याठिकाणीं आत्मशक्तीची आणि आत्मप्रत्ययाची ज्योत उजळू पाहतात. यासाठीच ते म्हणतात, 'बंगालच्या स्त्रीयांना मी जितका ओळखतों, तितके बंगाली पुरुषहि ओळखत नाहीत. आज या स्त्रीया स्वतःला असहाय्य व पराभूत मानतात. माझें आणि माझ्या सहकाऱ्यांचें बलीदान त्यांना आणखी कांही शिकविणार नसलें, तरी निदान स्वाभिमानपूर्वक मरणें तरी शिकवील.'

गांधीजींच्या या म्हणण्यांत एक मोठा नैतिक सिद्धांत प्रकट झालेला आहे. तो हा की, जिने आपली अब्रू प्राणापेक्षा मोलाची मानली त्याच स्त्रीची अब्रू सुरक्षित आहे. जी अब्रूपेक्षा जीवाला अधिक मोल देईल ती स्त्री अरक्षित आहे. हा सिद्धान्त जेवढ्या प्रमाणांत स्त्रीजीवनांत उतरेल तेवढ्या अंशी स्त्रीजीवन स्वतंत्र आणि सुप्रतिष्ठित होईल.

गांधीजींच्या स्त्रीजीवन विषयक विचार प्रणालीची आणखी इतर अंगें आहेत; पण त्यांचा विचार पुढें कधी तरी.

—नागपूर ता. १-१-४७.

# " नव्या युगाची स्त्री "

आज जें काम मला करावे लागत आहे; त्याकरितां आपण माझ्यापेक्षा योग्य व्यक्तीची योजना केली होती. दीक्षांत भाषण करण्याकरितां श्रीमती हंसाबेन यांची संमति मिळाली होती. परंतु त्यांना आयत्यावेळीं अमेरिकेला जावें लागत आहे. आज आपल्या देशाची स्थितीच अशी विलक्षण आहे की, कुठल्यावेळीं कोणता प्रश्न उत्पन्न होईल याचा नेम नाही. देशांतील थोर पुरुषांना आपलें नित्यनैमितिक कार्यक्रम ठरलेल्यावेळीं पार पाडतां येतील अशी स्थिति आज राहिलेली नाही. श्रीमती हंसाबेन यांना येथे येतां आले नाही म्हणून त्यांचे काम मला करावे लागत आहे.

श्रीमती हंसाबेनचे काम मला त्यांच्यासारखे साधणार नाही हें उघड आहे. कारण मी पुरुष आहे. स्त्रियांच्या प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव मला असणे शक्य नाही. मी कितीहि विचार केलेला असला तरी शेवटीं माझे ज्ञान परोक्षच असणार. त्याला आत्मप्रत्ययाचा आधार नाही. तें अर्थात्च अनुमान प्रमाणावर आधारलेले असणार. म्हणून साधारणपणे मुलांपुढे मी जशा आत्मप्रत्ययाने बोलूं शकतो; तशा रीतीने मुलींपुढे मला बोलतां येत नाही. मुलींच्या सभेंत बोलतांना मला जरा संकोच वाटतो. पण मुलगे व मुली, स्त्रिया व पुरुष यांची भूमिका बरोबरीची असली पाहिजे, हा या युगाचा मुख्य सिद्धांत आहे. त्याचा विचार मला करतां येईल. आणि स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचीच नव्हे; तर त्याच्यापेक्षा श्रेष्ठ भूमिका प्राप्त करून घ्यायला काय करावे लागेल ? हें मला सांगतां येईल.

आणि मला असे वाटते की, पुरुष या नात्यनो मला स्त्रीपेक्षा तें विशेष चांगल्याप्रकारेंहि सांगतां येईल. कारण ज्या दोषामुळे

स्त्रीला पुरुषाच्या बरोबरचें स्थान अजून मिळवितां आलेलें नाही त्या दोषांचे ज्ञान स्त्रीपेक्षा पुरुषालाच अधिक असणें संभवनीय आहे.

आज तुमच्यापैकी ज्यांना प्रमाणपत्रें मिळालेली आहेत त्यांना 'स्नातिका' म्हणण्यांत येईल. जून्या काळीं 'स्नातक' हा शब्द फक्त मुलांकरितां होता. कारण ब्रह्मचर्यहि फक्त मुलांसाठीच होतें. बारा वर्षेपर्यंत गुरुगृहीं राहून अनेक विद्यांचें व कलांचें अध्ययन करून विद्याविनयसंपन्न झालेला ब्रह्मचारी अवभृत स्नान करून संसारांत प्रवेश करित असे. अवभृत स्नान करणारा तो स्नातक. जगांत प्रवेश करण्याची पात्रता मिळविलेला. पण त्याकाळीं मुलींची मुंज होत नसे किंवा आजच्या प्रमाणे त्यांना कुणी शिक्षणहि देत नसे. त्यामुळे त्यांच्या बाबतींत ब्रह्मचर्य किंवा स्नातक हे शब्द वापरण्यांत येत नसत. मुलगी वयांत आली किंवा शहाणी झाली म्हणजे जणू ती स्नातक झाली. संसारांत प्रवेश करायला आणि मातृपदाला लायक झाली. पतिगृहप्रवेश हाच तिचा गुरुगृह प्रवेश. आणि ऋतुस्नान हेंच तिचें स्नातकत्व.

प्राचीनकाळीं स्त्रियांना उपनयन किंवा व्रतबंध विहित नसल्या-मुळेच त्यांना वेदांचा अधिकारहि नव्हता. त्यांच्या बाबतींत मनूने मंत्रयुक्त विधींचा निषेध केलेला आहे. आजहि आपण असें पाहतों कीं, स्त्रियांना उपाध्येबुवा रुद्राचा अभिषेक न सांगतां महिम्नस्तोत्र सांगून अभिषेक करावितात. म्हणजे वेदाध्ययनाचा अधिकार अजून आपल्या धर्मविधींत त्यांना प्राप्त झालेला नाही. आणि त्यामुळेच वेदारंभाचा संस्कारहि त्यांच्या बाबतींत करण्यांत येत नाही. त्यांना गुरुगृहनिवासहि नाही आणि अवभृतस्नानहि नाही.

म्हणून आज स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतींत निरनिराळ्या विद्या-लयांच्या व विद्यापीठांच्या द्वारें अलिकडे आपण जो उपक्रम करीत आहोंत तो युगप्रवर्तक आहे. आपल्या प्राचीन वाङ्मयांत याचा कोठे संकेत फारसा आढळत नाही. 'शिक्षणाच्या कार्याकरता स्त्री ही माता या नात्याने पुरुषापेक्षा सहस्रपटीने श्रेष्ठ आहे. असें म्हटलें आहे. दहा

उपाध्यायांपेक्षा आचार्य श्रेष्ठ; शंभर आचार्यांहून पिता श्रेष्ठ आणि हजार पित्यांपेक्षा गुरू या नात्याने माता श्रेष्ठ.' असें मनूने एका ठिकाणीं म्हटलें आहे. पण प्रत्यक्ष जीवनांत या गोष्टीचें प्रमाण किंवा त्याची खूण मनूच्या काळांत अथवा त्यानंतरच्या काळांत कुठे आढळत नाही. स्मृतींतहि त्यांचे 'लिंग' कोठे दिसत नाही. लिंग म्हणजे खूण. सूचक संकेत! स्मृतींत एखादें वचन असलें तर त्याची खूण श्रुतींत कोठेतरी आढळते. मनूच्या काळीं एकहि स्त्री आचार्या असल्याचें आढळून येत नाही. आणि त्यापूर्वी श्रुतींतहि गार्गी, मैत्रेयी यांच्यासारख्या विदुषी स्त्रियांची अगदीं मोजकीं आणि तुरळक उदाहरणें असलीं तरी स्त्री आचार्या असल्याचा दाखला कोठेच सांपडत नाही. स्त्रियांच्या करितां गुरुकुलेंच नव्हतीं; तर स्त्री आचार्या कुठून असणार ?

आज आपण या बाबतींत स्त्रियांच्या भूमिकेंत क्रांति करूं इच्छितों. स्त्री ही गुरु या नात्याने पुरुषापेक्षा सहस्रपटीने श्रेष्ठ आहे, हें आधुनिक शिक्षणशास्त्राचें एक महनीय प्रमेय आहे. त्याचा प्रत्यक्ष प्रयोग आपल्याला सुधारलेल्या राष्ट्रांत दिसून येतो. क्रांतिकारक राष्ट्रांत अग्रगण्य म्हणून मानलेल्या रशीयांत शिक्षकापेक्षा शिक्षिकेची योग्यता अधिक मानतात. शिक्षणाच्या क्षेत्रांत या प्रमेयाचा प्रयोग कसोशीने झाल्यावांचून आपल्याला समाजांत मूल्यपरिवर्तन घडवून आणतां येणार नाही. म्हणून यापुढे या अर्थानें मुलांच्या बाबतींत स्नातक शब्द रूढ झालेला आहे; त्याच अर्थाने मुलींच्याहि बाबतींत तो शिक्षणांत व जीवनांतहि वापरतां आला पाहिजे.

उत्क्रांति किंवा विकासाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, एकाचा उद्धार दुसरा करूं शकत नाही. हरिजनांचा उद्धार सवर्ण करूं शकणार नाहींत. म्हणून बापू जेव्हा हरिजनसेवेची चळवळ करतात, तेव्हा ते असें म्हणत असतात की, अस्पृश्यता निवारण हें हरिजनांच्या उद्धाराकरितां नसून सवर्णांच्या उद्धाराकरितां आहे. अस्पर्श भावनेने सवर्णांचा अधःपात झालेला आहे. म्हणून स्वतःच्या शुद्धीकरितां त्यांना हरिजन सेवा करायला पाहिजे. हरिजनांचा उद्धार हरिजनच करूं शकतील, ज्याचा उद्धार तोच करूं शकतो, हा अबाधित सिद्धांत आहे.

हाच न्याय स्त्रियांच्या बाबतहि लागू आहे. पुरुषाने स्त्रीला दडपून टाकलें. तिचा विकास होऊं दिला नाही. या पापाचें प्रायश्चित्त त्याने करायलाच पाहिजे. पण तें स्वतःच्या कल्याणाकरतां, स्वतःच्या उद्धाराकरतां, स्त्रीवर मेहरबानी, कृपा किंवा करुणा म्हणून नव्हे. स्त्रीचा उद्धार पुरुष करूं शकणार नाही. तो तिला स्वतःलाच करावा लागेल. इतरांनी मरून स्वर्ग दिसणार नाही.

आज या तरुणी स्नातिका होऊन जीवनाच्या विशाल क्षेत्रांत, वास्तविक संसारांत प्रवेश करीत आहेत. माझ्या भाषणांत आपल्याला त्यांच्याविषयीं एकप्रकारची चिंता, वेदना, जिव्हाळा व्यक्त झालेला दिसून येईल

आजच वर्तमानपत्रांत सुचेता कृपलानी यांच्याविषयीं एक बातमी प्रसिद्ध झाली आहे. ती बातमी वाचून माझें चित्त अस्वस्थ व व्यग्र झालें. मनांत विचारांचें काहूर माजलें. ती बातमी म्हणजे आपल्या समाजांत स्त्रियांची जी भूमिका आहे तिचें भडक रंगांतलें प्रतिबिंब आहे. नवाखालींतील गुंडांनी म्हणे सूचेताला पळवून नेण्याचा कट केला होता. सुचेता म्हणजे साधारण स्त्री नव्हे. मृदुला साराभाई यांच्याप्रमाणेच त्यादेखील कॉंग्रेसच्या मुख्य चिटणीस होऊं शकतात, सरोजिनीबाईप्रमाणे राष्ट्राध्यक्ष होऊं शकतात, शुक्राजी किंवा बाळासाहेब यांच्याप्रमाणे पंतप्रधान होऊं शकतात, विजयालक्ष्मीप्रमाणे मंत्रीमंडळांत तर खास राहूं शकतात. उद्यां कदाचित् जवाहरलालजीप्रमाणे मध्यवर्ती प्रधानमंडळाच्या प्रधानमंत्रीहि होऊं शकतील. किंवा भारतीय लोकराज्याच्या अध्यक्षहि होऊं शकतील. एखाद्या विद्यापीठाच्या कुलपति होण्याइतकी योग्यता तर त्यांची खात्रीने आहेच. अशा स्त्रीविषयीची ही बातमी आहे. आणि त्या बातमींत आपल्याला संताप येण्याजोगें पुष्कळच असलें तरी अस्वाभाविक किंवा विलक्षण असें कांहीच वाटत नाही. ही बातमी स्त्रीच्या परिस्थितीची द्योतक आहे.

कुणी म्हणतील, 'अहो, त्यांत तितकें विलक्षण तें काय आहे? सरहद्दप्रांतांत स्त्रीयाप्रमाणें पुरुषांनाहि पळवून नेतात. अगदीं मोठमोठ्या

पुरुषासारख्या पुरुषांना पळवितात. मग सुचेताबाईंच्या उदाहरणावरून तुम्ही स्त्रियांच्या बाबतींत तेवढें विपरीत अनुमान कां काढतां? आक्षेप बरोबर आहे. पण त्यांत विचारांची गल्लत आहे. सरहद्दप्रांतांत पुरुषांना पळवितात हें खरें आहे. पण कोणत्या पुरुषांना? धनवान पुरुषांना! स्त्रियांच्या बाबतींत तसें नाहीं. फक्त सत्ताधारी किंवा धनवान स्त्रियांनाच पळविण्यांत येते असें नाहीं. दरेक स्त्रीला पळविण्याची भीति असते. स्त्री ही धनवान नाहीं. ही धनरूप आहे. द्रव्याप्रमाणें, वित्ताप्रमाणें किंवा गोधनाप्रमाणें स्त्री हें धन आहे. ही भयानक परिस्थिति मी तुमच्या लक्षांत आणून देऊं इच्छितों. मला ती असह्य वाटते. तुम्हालाहि ती असह्य वाटायला हवी.

स्त्री आणि श्री यांच्यांत जोंपर्यंत अभेद राहील; तोंपर्यंत स्त्रीची भूमिका श्रीहून निराळी राहणें अशक्य आहे. महाभारतांत भीष्मांनी स्त्रीला 'श्री' म्हटलें आहे. मनूनेंहि त्यांना घरांतील दौलत व घराची-शोभा म्हटलें आहे. श्री व स्त्री या शब्दांच्या उच्चारांत तर साम्य आहेच. महाभारतांत ज्यावेळीं द्रौपदीला दुर्योधनाच्या दरबारचें बोलावणें जातें, त्या प्रसंगाचें वर्णन मोरोपंतांनी केलें आहे. त्या दूताला द्रौपदी म्हणते; "श्री म्हण नच स्त्री म्हण" अरे! त्यांनी श्री मागविली असेल स्त्री नव्हे.' पण समाजांत स्त्री व श्री यांच्या उच्चारांतच नव्हे, तर अर्थांतहि अभेद आहे. आमच्या वऱ्हाडांत तर स्त्रीला लक्ष्मी म्हणण्याची पद्धत आहे. स्त्रियांचा डबा म्हणजे लक्ष्म्यांचा डबा. साहित्यांत व पुराणांत लक्ष्मी ही विष्णुपत्नि असेल, पण प्रत्यक्ष व्यवहारांत ती जडसंपत्ति मानली जाते. लक्ष्मी हा शब्द धन व संपत्ति यांचाच वाचक आहे. महाभारताच्या अनुशासन पर्वांत भीष्माचार्यांनी राजाला ज्यांना चोरांची भीति असते अशा वस्तूंची यादी सांगितली आहे. त्या यादींत स्त्रीहि आहे. मला वाटतें स्त्रियांच्या सगळ्या प्रश्नांपैकीं हा 'यक्षप्रश्न' आहे. हा प्रश्न जर सुटला नाहीं तर त्यांचे इतर सारे प्रश्न सुटले तरी त्यांची सामाजिक भूमिका मुळीच बदलणार नाहीं.

या वस्तुस्थितीचा परिणाम आमच्या भावना, विचार व संस्कार यांच्यावर झालेला आहे. स्त्री ही विश्वासाला पात्र नाहीं. आपण माझ्या

म्हणण्याचा भलता गैरसमज करून घेऊं नये. स्त्री ही लबाड किंवा कपटी असते असें मला म्हणायचें नाहीं. ती अगदी प्रामाणिक व सत्यनिष्ठ असूं शकेल. अगदी पुरुषाइतकीच सत्यवादी, सत्याचरणी आणि तरी देखील ती विश्वासपात्र नाही. माझ्या म्हणण्यांतला अर्थ कदाचित् इंग्रजींतील (अन्‌रिलायेबल) शब्दानें अधिक चांगला व्यक्त होईल. अन्‌रिलायेबल् म्हणजे Dishonest नव्हे. अगदी Honest माणूसहि अन्‌रिलायेबल् असूं शकेल. उदा०— लहान मूल किंवा म्हातारें माणूस अगदीं प्रामाणिक असेल तरी शरीरश्रमाच्या कामाच्या बाबतींत आपल्याला त्याच्यावर विसंबून राहतां येणार नाही. स्त्री ही रक्षणीय असल्यामुळे तिला स्वतःच्या भरंवशावर राहतां येत नाही. या अर्थानें ती अविश्वसनीय नसली तरी विश्वासपात्र नाही. तिच्या बाबतींत आपल्याला निश्चिंत राहतां येत नाही. कारण ती निर्भय नाही.

पण आपण म्हणाल, त्याला इलाज नाही. कारण स्त्रियांचा दुबळेपणा नैसर्गिक आहे. मी फारसा वादांत पडूं इच्छित नाही. पण स्त्रीची ही प्रकृति नव्हे. हा परंपरागत संस्कार आहे. एवढें मात्र निश्चित सांगूं इच्छितों. यांत निसर्गाला बोल लावणें चुकीचें आहे. शिवाय दुबळेपणा हा शरीराचा धर्म असला; तरी मनाचा धर्म होता कामा नये. एवढें मी सांगूं इच्छितों. मन कमकुवत नसलें म्हणजे झालें. या बाबतींत स्त्रीयांना पुरुषांवर सरशी करतां येईल. ज्याचें मन दुबळें असेल त्याची उन्नति होणें शक्य नाही. फार काय दुबळ्या मनांत कोमल भावनाहि राहूं शकत नाही. कमजोर मनांत करुणा मावत नाही. 'क्षिणा नरा निष्करुणा भवंति' हें अगदी त्रिवार सत्य आहे.

स्त्रियांचें मन कोमल असतें, म्हणजे कमकुवत असतें, असा समज आहे. कोवळें म्हणजे दुबळें नव्हे. हळुवार म्हणजे कमजोर नव्हे. पण स्त्रिया या 'भीरु' मानल्या गेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या ठिकाणीं चंचलतेचीहि कल्पना केली आहे. कामिनी ही लक्ष्मी इतकीच चंचल असते असा सार्वत्रिक समज आहे. एवढा मोठा दशरथ राजा. पण तो देखील जेव्हां कैकेयीच्या हट्टवादीपणामुळे जेरीस आला तेव्हा म्हणाला, अनीत्य हृदया

हि ताः' स्त्रिया या अस्थिर वृत्तीच्या असतात. जणूं कांही शेक्सपीयरनें "Frailty, thy name is Woman" चंचलते तुझें नांव स्त्री आहे. या वाक्यांत वाल्मिकीच्या वाक्याचा अनुवादच केला. प्राचीन सुभाषितकारांची तर मजल याच्याहि पलीकडे गेली. 'पुरुषांच्या भाग्याप्रमाणेच स्त्रीचें चरित्र देवालाहि कळण्याजोगें नाही. मग माणसाची, पामराची काय कथा? असे उद्गार त्यांनी काढले.

स्त्रीयांविषयीं अशी समजूत होण्याचें कारण त्यांचा भित्रेपणा. भीति व नीति. भीति व प्रीति ह्यांचें विळ्याभोपळ्याइतकें वांकडें आहे. त्यामुळे खऱ्या नीतीला व खऱ्या प्रीतीला स्त्रीच्या जीवनांत स्थानच उरलेलें नाही. कादंबऱ्यांतील व लघुकथांतलि प्रेम निराळें आणि स्वायत्त व भरदार जीवनाला ज्या प्रेमाची किंवा प्रीतिची गरज असते ती प्रीति किंवा प्रेम निराळें.

लज्जा व भीरुता हे दुर्गुण स्त्रियांचीं भूषणें मानलेलीं आहेत. त्यामुळे त्यांना मोकळेपणानें जगतां देखील येत नाही. त्या जन्मभर लाजत जगतात. भीत भीत जगतात, कचरत कचरत जगतात. त्यांना जगाची भीति वाटते. जीवनाची भीति वाटते. जगण्याचीहि लाज वाटते. त्या आपण जगतों याबद्दल जणूं जगाजवळ क्षमा याचना करीत करीत आयुष्य कंठितात.

स्त्री-जीवनाच्या या मूलभूत प्रश्नाकडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. समाजांत स्त्री फक्त सुराक्षित झाल्याने तिचा प्रश्न सुटणार नाही. तिला पुरुषाच्या बरोबरीची भूमिका प्राप्त होणार नाही. पुरुषांपासून स्त्रियांचें रक्षण करतां येईल. सगळ्या खल पुरुषांचें पारिपत्य केलें म्हणजे स्त्रिया सुराक्षित होतील. पुरुषांपासून त्यांना भय उरणार नाही. पण तेवढ्याने त्या स्वतंत्र मात्र होणार नाहीत. जोपर्यंत स्त्री स्वरक्षित होणार नाही तोपर्यंत ती खऱ्या अर्थाने सुरक्षितहि होणार नाही. दुष्टांचा व गांवगुंडांचा प्रतिकार करण्याची धमक तिच्या अंगी आल्याखेरीज स्त्री-जीवन सुरक्षित व स्वतंत्र होणार नाही. जो स्वरक्षित नाही तो सुरक्षितहि नाही. गेल्या महायुद्धांत अनेक स्त्रियांनी समर-कर्मांत अद्भुत शौर्य गाजविलें, विलक्षण धाडसाचीं व साहसाचीं कृत्यें केलीं, पण इतकें करूनहि त्या त्या राष्ट्रांतील स्त्रियांच्या

संरक्षणाचा प्रश्न शिल्लकच राहिला. शत्रूपासून रक्षण करण्याच्या वस्तूंत स्त्रियांचीहि गणना असून होते. एवढी मोठी झांशीवाली 'लक्ष्मीबाई' जिने समर-कर्माची पराकाष्ठा केली, तिने सुद्धां शेवटी स्वतःच्या शरीराच्या रक्षणाकरितां अग्नीचा आश्रय घेतला. स्त्रीची प्रतिष्ठा, तिची अब्रू, तिचें शील, अशा रीतीने शरीर-निष्ठ होऊन बसलें आहे.

दुसऱ्याहि एका अर्थाने गेल्या महायुद्धांत स्त्रियांच्या शरीर-निष्ठ उपयुक्ततेचा प्रत्यय आला. शत्रुपक्षाकडील गुप्त बातम्या आणण्याकरितां हेरगिरीच्या कामीं स्त्रियांची योजना करण्यांत आली. मोहक स्त्रिया शत्रूकडे पाठविण्यांत येत असत. अशा रीतीने पुरुषाच्या मनांत स्त्री-शरीरा-विषयीं असलेल्या कामनेचा फायदा घेण्यांत आला. कुणी म्हणतात, त्या स्त्रियांनी आपल्या देशाच्या कल्याणाकरितां स्वतःच्या शीलाचें देखील मोल दिलें. मला वाटतें त्या स्त्रियांनी पुरुषांच्या स्त्री-विषयक कामनेचा फायदा घेऊन स्वतःच्या शरीराचा दुरुपयोग केला. तपस्व्यांना अप्सरा तरी आणखी काय करीत असत! यालाच रूपाचा बाजार मांडणें म्हणतात. अशा रीतीने स्वतःच्या शरीराचा उपयोग करणें कुठल्याहि स्त्रीने भूषणावह मानतां कामा नये. यांत स्त्री-शरीराची विटंबना आहे, आणि मानव्याचा उपमर्द आहे.

स्त्रीला प्रेमजीवी म्हटलेलें आहे. तिचें हृदय म्हणजे प्रेमाचा अखंड झरा. पण मला अत्यंत नम्रपणाने असें सुचवायचें आहे की, दुर्बल अंतःकरणांत प्रेम राहाणें शक्य नाही. हल्लीं ज्याला आपण स्त्रीचें प्रेम म्हणतो तें प्रेम नसून निष्ठा आहे. एखाद्या गुलामाच्या मनांत आपल्या मालकाबद्दल अढळनिष्ठा असू शकते. जुन्या काळांत इमानी हुजऱ्यांची स्वामीभक्ति प्रसिद्धच असे. पण ती निष्ठा किंवा भक्ति म्हणजे प्रेम नव्हे. पतिनिष्ठा म्हणजे प्रेम नव्हे. पातिव्रत्य निराळें आणि प्रेम निराळें. गुलामाच्या ठिकाणीं निष्ठा असली तरी प्रेम असेलच असें नाही. प्रेमाला बरोबरीचें नातें पाहिजे. त्यांत भीतीचा अंश असतां कामा नये. लोक म्हणतात भीति-वांचून प्रीति नाही. पण वस्तुस्थिति याच्या अगदी उलट आहे. भीति प्रीति एकत्र नांदूंच शकत नाही. स्त्रीला जोंपर्यंत पुरुषाची भीति वाटेल तोंपर्यंत

ती त्याच्यावर खुल्या दिलानें प्रेम करूं शकणार नाही. म्हणून माझी मुलींना पहिली सूचना अशी आहे की भीति सोडा. अगदी ईश्वराचीसुद्धा भीति सोडा. ज्याची भीति वाटते तो नकोसा होतो. मुलाला मास्तर कधीच हवासा वाटत नाही. करड्या स्वभावाचा पिता मुलांना घरीं असावा असें मुळींच वाटत नाही. ज्या नवऱ्याची भीति वाटते तो नेहमी कामावरच असावा अशी त्याच्या बायकोची इच्छा असते. आपल्याला पोलीसच्या शिपायाची संगति आवडत नाही. इतरांपासून भीति असली म्हणजेच त्याची गरज वाटते. त्याचप्रमाणे स्त्री इतर पुरुषांपासून रक्षण व्हावें म्हणून एका पुरुषाचा आश्रय घेते. त्याला आपलें सर्वस्व अर्पण करते. या सर्वस्वदानाला निष्ठा म्हणतां येईल. पण हे समान भूमिकेवरील बरोबरीच्या नात्याचें प्रेम नव्हे. आपण जोंपर्यंत वाघाला भितों तोंपर्यंत त्याच्याशीं सलगी करूं शकत नाही. वाघ कोंकरांइतका गरीब झाला तरच आपण त्याला कुरवाळूं शकूं. त्याच्याशीं सख्य करूं शकूं. ज्या दिवशीं स्त्री पुरुषाची भीति सोडून देईल त्याच दिवशीं ती त्याच्यावर वास्तविक प्रेम करूं शकेल. बलवान मन आणि बळवान हृदयच प्रेमाचें पात्र होऊं शकतें.

इतकें लांबलचक विवेचन केल्यानंतरहि मी स्त्री-जीवनाच्या मूलभूत समस्येचा फक्त उल्लेखच करूं शकलों आहे. तो उल्लेख थोडासा सविस्तर असेल, कांहीसा पाल्हाळिकहि असेल पण उल्लेखच आहे. स्त्री ही स्वरक्षित झाली पाहिजे. लज्जा व भीति यांचा तिनें त्याग केला पाहिजे. आणि तिच्या मनाला हें वळण शिक्षणांतून मिळालें पाहिजे. हा आधुनिक स्त्रीशिक्षणाचा पायाभूत सिद्धांत आहे. ही मानसिक क्रांति सम्यक शिक्षणानेंच साधणें शक्य आहे.

शिक्षणपद्धतीच्या बाबतींत इतर मुद्दे स्त्री व पुरुष यांच्या शिक्षणाला सामान्य असे आहेत. मी आज त्यांचा फारच ओझरता उल्लेख करूं शकेन. आजचें शिक्षणशास्त्र म्हणतें की, शिक्षणांत सामंजस्य पाहिजे. आणि अनुबंध पाहिजे. शिक्षणांतील निरनिराळ्या विषयांचा परस्पर संबंध म्हणजे सामंजस्य आणि एकंदर शिक्षणाचा जीवनाशीं संबंध म्हणजे अनुबंध.

जुन्याकाळीं पाखंडवादी असत. आजच्या काळांत खंडवादाचें स्तोम माजलेलें आहे. जीवनाचें अनेक खंड किंवा कप्पे पाडून त्याची विल्हे

करण्यांत आली आहे. जीवनांतील एका व्यापाराचा दुसऱ्या व्यापाराशीं संबंध नाहीं. Work while you work, play while you play. खेळशील तोंवर खेळ. काम करशील तोंवर काम कर. खेळांत काम नको. कामांत खेळ नको. श्रमांत आनंद नको. आनदांत श्रम नको. असें असमंजसपणाचें एकांगी तत्त्वज्ञान जीवन कलुषित करूं पाहात आहे. म्हणून कांही शिक्षण घेत्यांनी make education pleasurable शिक्षणांत गोडी आणा' असा नवीन उद्घोष स्वीकारला. पण शिक्षण नुसतें आनंदमय असून चालणार नाहीं. तें जीवनोपयोगीहि असलें पाहिजे. आतांपर्यंत तें लाल-विटांच्या किंवा चिरेबंदी इमारतींत मिळत होतें. आतां क्रीडांगणावर मिळूं लागलें. पण यापुढे त्याचा संबंध जीवनाच्या सर्वच क्षेत्राशीं प्रस्थापित झाला पाहिजे. याला Polytechnisation असा किंचित् अवजड व असुंदर शब्द आहे. सामाजिक परिस्थितीशीं व प्रगतीशीं शिक्षणाचा प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे.

सामंजस्य व अनुबंध याखेरीज शिक्षणाचें तिसरेंहि एक तत्त्व आहे. त्याला आपण विनय असें म्हणूं. इंग्रजींत ज्याला culture म्हणतात. त्याला आपण विनय म्हणूं. विनय म्हणजे सदभिरुचि. ती माणसाच्या आवडीनिवडींत आणि त्याच्या वागणुकींत व्यक्त होते. आपल्या प्राचीन साहित्यांत विद्या व विनय यांची अभेद्य जोड गोळी आहे. माणसाची अभिरुचि त्याच्या उठण्याबसण्यांत, बोलण्याचालण्यांत, पाहाण्याऐकण्यांत म्हणजे जीवनाच्या सर्व व्यवहारांत व्यक्त होत असते. इंग्रजींत आपण ज्यांना Cultural Values किंवा सांस्कृतिक मूल्यें म्हणतों. त्यांत मुख्य दोन गुणांचा समावेश होतो. एक सुसंस्कृत अभिरुचि आणि दुसरा Balance, समतोलपणा किंवा तारतम्य. विनयहीन विद्येंत समतोलपणा राहात नाहीं. माणसाच्या करमणुकींत देखील, नव्हे त्याच्या करमणुकींतच मुख्यत: त्याची अभिरुचि व्यक्त होत असते. इतर जीवांना त्रास देणारी करमणूक सदभिरुचीला सोडून असते. बेडकांचा जीव जात असेल, तर मुलांचा खेळ आसुरी ठरतो. ज्या खेळांत इतरांच्याहि सुखाचा विचार असेल, तो सुसंस्कृत सदभिरुचिपूर्ण. या विनयशीलतेलाच समाजशास्त्राच्या भाषेत

सामाजिकता असें नांव आहे. ही सामाजिकता शिक्षणाच्या योगानें वाढली पाहिजे. जीवनांतल्या प्रत्येक व्यवहारांत आम्हांला इतरांबरोबर वागण्याची कला साधली पाहिजे. आणि स्त्री-पुरुषांना एकमेकांशीं वागण्याचीहि कला साधली पाहिजे. सर्व कालांतील सदभिरुचीचा हा निकष आहे.

स्त्रीला पुरुषांबरोबर मोकळेपणानें राहतां यावें म्हणून आजपर्यंत तिच्या हाडीमाशीं खिळलेल्या अनेक समजुतींना फाटा द्यावा लागेल. अशा समजुतींपैकी एक समजूत अशी आहे कीं, स्त्रीचें शरीर कांचेच्या भांड्या-सारखें आहे. म्हणून तिची अब्रूहि ठिसूळ आहे. तुम्ही जर ही समजूत उराशीं बाळगून बसाल तर तुम्हांला कांचेच्या भांड्याप्रमाणेंच वागावें लागेल. तुमच्या जीवनावर 'glass with care' 'सांभाळा—कांच आहे.' अशी चिठ्ठी लावावी लागेल. कांचेचीं भांडीं इतर भांड्याबरोबर ठेवण्याची सोय नाही. फार काय ती एकमेकांबरोबरहि ठेवतां येत नाहीत. एकमेकां-बरोबर ठेवायचीं असलीं तरी त्यांत मधें मधें कापूस किंवा भुसा भरावा लागतो. स्त्रियांच्या मनांत जोपर्यंत ही खुळी समजूत कायम राहील तोंपर्यंत स्त्रिया—स्त्रियांतहि खरी मैत्री होऊं शकणार नाही त्यांच्यांत परस्पर अविश्वास राहील. मधें मधें भुसा भरावा लागेल. असें आहे म्हणूनच पुरुषाचा मत्सर प्रसिद्ध नाही. स्त्रीचा मत्सर प्रसिद्ध आहे. स्त्रियांची मैत्री प्रसिद्ध नाही. पुरुषानें आपल्या मित्राकरितां बायकोचे दागिनेहि विकल्याच्या गोष्टी आहेत. पण स्त्रीनें मैत्रिणीकरितां आपल्या पतीचें सलकडें किंवा घड्याळ विकल्याच्या गोष्टी नाहीत. असें आहे म्हणूनच स्त्रीचें प्रेम कुटुंबाच्या मर्यादित क्षेत्रांतच आपले चमत्कार दाखवतें. आतां, समाजाच्या व्यापक क्षेत्रांत त्याचें तेज व माधुर्य प्रत्ययास आलें पाहिजे. त्या प्रेमाच्या उत्कटतेनें व निरपेक्षतेनें आमचें सामाजिक जीवन उन्नत व उदात्त झालें पाहिजे. तसें व्हायला भित्रेपणा हें स्त्रीचें भूषण नसून दूषण आहे ही गोष्ट मुलींच्या मनावर बिंबविली पाहिजे.

भीरुतेप्रमाणेंच लज्जा हाहि स्त्रीचा गुण आहे असा एक भ्रम लोकांत प्रचलित आहे. लज्जा हा गुण नसून दोष आहे. भयाप्रमाणें तोहि एक फार मोठा दुर्गुण आहे. मर्यादा व संयम या अर्थानें "भय व लज्जा." येथे भय

शब्दाचा अर्थ मर्यादा व लज्जा शब्दाचा अर्थ तारतम्य असा आहे. शिष्टाचाराच्या व शालीनतेच्या मर्यादा स्त्रीप्रमाणेच पुरुषानेहि पाळल्या पाहिजेत शालीनता किंवा विनय ही दोघांच्याहि जीवनाची शोभा आहे. लज्जा म्हणजे विनय नव्हे. लज्जा म्हणजे कुलीनता नव्हे, शालीनता नव्हे. बुरख्यांत किंवा पडद्यांत जगण्याऐवजीं तुम्हांला मोकळ्या हवेंत जगतां आलें पाहिजे. तुम्ही जर कांचेचें भांडे असाल तर तुम्हांला बंद कपाटांत काळजीपूर्वक ठेवावें लागेल. जपून वापरावें लागेल. तुम्हांला कांचेचें भांडें होण्यांतच भूषण वाटत असेल तर...... तुमच्या जीवनांत कांचेची चमक आणि तिचें पारदर्शकत्व अवश्य असावें. पण तिचा नाजूकपणा नको. ठिसूळपणा नको. विनयशीलतेला अशा मोकळेपणाचें वावडें नाहीं.

थोडक्यांत आज मी तुम्हांला सहा गोष्टी सांगितल्या.

१. स्त्री सुरक्षित नव्हे; तर स्वरक्षित झाली पाहिजे.

२. यापुढे शिक्षणाच्या विकासाकरतां त्यांत सामंजस्य व अनुबंध हीं दोन तत्त्वें दाखल झालीं पाहिजेत.

३. शिक्षणाचा स्वाभाविक परिणाम विनयशीलतेंत झाला पाहिजे.

४. स्त्रियांना स्त्रियांबरोबर व पुरुषांबरोबर समान भूमिकेवर मित्रत्वाच्या नात्याने राहण्याची कला साधली पाहिजे.

५. समानत्व म्हणजे समानरूपत्व नव्हे; स्त्री पुरुषाच्या बरोबरीची होईल, म्हणजे ती त्याच्यासारखी होईल असें नाहीं. विकसित स्त्री म्हणजे नकली पुरुष नव्हे. येथे समानत्वाचा अर्थ तुल्यता असा आहे. स्त्रीची भूमिका पुरुषाच्या भूमिकेशीं तुल्य अमल सरसाह असू शकेल. पुष्कळ बाबतींत सारखीहि असेल. पण कमी प्रतीची कदापि असणार नाहीं. स्त्रीची प्रतिष्ठा फक्त वीरमाता अगर वीरपत्नि होण्यांत नाहीं. वीरांगना होण्यांत आहे. वीर पुरुषाची पत्नि म्हणून मिरविणारी ती वीरांगना नव्हे.! जिचा पराक्रम स्वायत्त असेल ती वीरस्त्री. वीर पुरुषाप्रमाणे वीरस्त्री बनण्यांत तुम्ही भूषण मानलें पाहिजे.

६. नवें युग येणार हें देव बोलून चुकला आहे. जुनीं मूल्यें जाऊन त्यांच्या ठिकाणीं नव्या जगाचीं नवीं मूल्यें येणार आहेत. त्याच नवीन मूल्यांचें आधारभूत परममूल्य म्हणजे स्त्रीपुरुषांचें सामान्य मनुष्यत्व. त्याची प्रतिष्ठा शिक्षणानें वाढविली पाहिजे. जीवनांत रूढ झाली पाहिजे.

हें विद्यापीठ या अर्थानें नवयुगाला जन्म देणारें ठरो. आज येथून स्नातिका म्हणून बाहेर पडणाऱ्या तरुणी नवीन युगाला जन्म देणाऱ्या माता निपजोत या अर्थानें तुमचें जननीत्व तुम्हांला व राष्ट्राला ललामभूत ठरेल.

"दीक्षान्तभाषण" मूळ हिंदीतून.

ता. १२-२-४७ महिलाश्रम, वर्धा.

# 'बा'— एक पुण्य-संकेत !

गांधींचे टीकाकार साधारणपणें दोन प्रकारचे असतात. शंकराचार्यांच्या काळीं त्यांच्याहि बाबतींत हीच स्थिति होती. त्यावेळचे कर्मकांडी मीमांसक त्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हणत असत. तर इतर कांहीं वादी, दुराग्रही, पुराणमतवादी समजत असत. गांधींनाहि जुने लोक प्रच्छन्न नवनीतिवादी म्हणतात आणि नवे लोक प्रच्छन्न सनातनी म्हणतात. यांखेरीज तिसराहि एक वर्ग आहे. जो त्यांना उफराटा सनातनी आणि विक्षिप्त नवनीतिवादी असें आळीपाळीने म्हणत असतो.

उपरोक्त तृतीयपंथी टीकाकारांपैकी एक गृहस्थ अगदी चिडून म्हणाले, "तुमच्या गांधीला म्हणावें की, तूं आर्थिक क्षेत्रामध्ये चरख्याचे व चरकाचे हवे तेवढे प्रयोग कर. राजकारणांत देखील सत्याचे अन् अहिंसेचे प्रयोग करून आपली हौस भागवून घे; पण मेहेरबानीकरून आपल्या आश्रमांत स्त्रीपुरुषांच्या सह-निवासाचे भयंकर प्रयोग करून विस्तवाशीं खेळूं नकोस. आम्ही त्याला उफराटा सनातनी म्हणतों तें कांहीं उगीच नव्हे त्याची तऱ्हाच तशी आहे आणि आता तर त्याला उफराटा नवनीतिवादी म्हणण्याची पाळी आली आहे. नवनीतिवाद्यांना नीतीची चाड नाहीं. त्यांना पुनः पशुवत् व्यवहार करावयाचा आहे. उद्या ते आईशीं लग्न लावावयासहि कमी करणार नाहीं. अगदी त्याच्या उलट गांधींचा थाट आहे. बायकोलाहि तो आई म्हणायला तयार!"

त्या गृहस्थाच्या म्हणण्याचा मला बोध होईना. मी त्यांना म्हणालों, "—आपण अंमळ बाळबोध बोलण्याची कृपा कराल तर कळेल."

ते गृहस्थ चवताळून उद्गारले, "—अहो, तुमच्या त्या आश्रमांत गांधी आपल्या कुटुंबाला 'बा' म्हणतात. आणि त्या बाई त्यांना 'बापू'

म्हणतात. गुजराथीमध्ये ‘ बा ’ म्हणजे आई आणि ‘ बापू ’ म्हणजे वडील हें तुम्हांला माहित नाही वाटते. नवऱ्याने बायकोला आई म्हणायचें आणि तिने त्याला बाप म्हणायचें हा शुद्ध अनाचार आहे. ”

त्या गृहस्थाच्या म्हणण्यांतील अर्थ माझ्या आता ध्यानांत आला. गांधींच्या भूमिकेंतील अपूर्वता व वैशिष्ट्य ज्यांनी कधींच ध्यानांत घेतलें नाही अशा लोकांच्या मनोवृत्तीची निदर्शक अशी वरील टीका आहे.

गांधी हा तुम्हाआम्हाप्रमाणें फक्त गृहस्थाश्रमी अथवा कुटुंबनिष्ठ माणूस नाही. तो विश्वकुटुंबवादी आहे. कम्युनिस्ट देखील विश्वकुटुंबवादी आहेत. त्यांच्या ‘ कम्यून ’ मध्ये कौटुंबिकता असते; पण हल्लीच्या गृहनिष्ठ कुटुंबसंस्थेतील संकुचितपणा नसतो. गांधींनाहि कुटुंबापेक्षा आश्रम आवडतो. आश्रमांतसुद्धा कौटुंबिकता असते; पण कुटुंबसंस्थेंतील नातीं त्यांत नसतात. ‘ कम्यून ’ मध्ये सगळेच बरोबरीचे. कोणी थोरला नाही, कोणी धाकटा नाही. आई कॉमरेड, बापहि कॉमरेड, मुलगा कॉमरेड, भाऊ-बहीणदेखील कॉमरेडच. गांधींच्या आश्रमांत धाकटा व थोरला हीं नातीं कायम असतात. त्यामुळें सर्वत्र आया नी सर्वत्र बाप. सर्वत्र एकमेकांचीं भावंडे. म्हणून तेथे सगळ्यांच्या आया आहेत; पण कोणाच्याहि पित्याची पत्नि नाही.

मातृत्वाची कल्पना व्यापक झाली म्हणजे तिला जगन्मातृत्वाचें स्वरूप प्राप्त होतें. जगन्माता म्हणजे सगळ्या जगाची आई. पण बायको मात्र कोणाच्याच बापाची नाही. अगदी जगत्पित्याची सुद्धा नाही. फार काय देवाधिदेव शंकराचीहि नाही--

“ ब्रह्माऽपि यां नौतिनुता सुरेन्द्रैः यामर्चितोप्यर्चयते गिरीन्दुमौलिः। यां ध्यायति ध्यान गतोऽपि विष्णुः ” असें त्या जगन्मातेचें वर्णन विद्यापति कवीनें केलें आहे. ती ब्रह्माणि नव्हे, लक्ष्मी नव्हे, पार्वतीहि नव्हे. ती या तिघांचीहि माता आहे. स्त्रीच्या ठिकाणीं आणि स्त्रीच्याविषयीं या व्यापक मातृत्वाच्या भावनेचा विकास करणें गांधींच्या आश्रमसंस्थेचा उद्देश आहे. म्हणून ‘ कम्यून ’ व ‘ आश्रम ’ यांच्या भूमिकांत भेद आहे.

गांधी ज्या भूमींत जन्मास आले आणि ज्या परंपरेंत वाढले, तिची छाप त्यांच्या भाषेवर व प्रयोगपद्धतीवर स्पष्टपणें उमटलेली आहे. आपल्या वाङ्मयांत व परंपरेंत आईबद्दल पूज्य बुद्धि आहे. पण 'स्त्री' बद्दल नाही. उलट 'स्त्री' ही वासनेचें प्रतिक मानलें जातें. म्हणून तिची संगत शक्यतो टाळावी. तिच्याशीं वडीलधाऱ्या माणसासमोर बोलूं नये; फार काय तिचा उल्लेखहि फारसा मोकळेपणाने करूं नये, असा शिष्टमान्य संकेत आहे. आपल्या भाषेंतील वाक्प्रचार उदाहरणादाखल घेतां येतील. जुन्या मर्यादेच्या कल्पनेंत वाढलेल्या एखाद्या संभावित गृहस्थास स्वतःच्या पत्नीचा उल्लेख करावयाचा झाल्यास साधारणपणें तो 'माझी बायको' किंवा 'माझी पत्नि' म्हणायला कचरतो. त्याला इंग्रजी येत असल्यास तो 'वाइफ' म्हणून मोकळा होतो. डॉक्टरजवळ बोलतांना "वाइफला बरें नाहीं" म्हणतो; पण शुद्ध बाळबोध वळणाचा असल्यास स्वतःच्या पत्नीचा उल्लेख अनेक पर्यायांनी करतो. उदा० 'इंदूची आई' 'सरूची आई' अशा सांकेतिक शब्दांनी किंवा बरोबरीच्या माणसांशीं बोलत असतांना 'तुमची वहिनी' अथवा वडील माणसाजवळ 'आपली सून' अगर 'आपली मुलगी' अशा सूचक भाषेंत आपल्या पत्नीचा उल्लेख करतो. आपल्या मुलाची आई म्हणून स्वतःच्या स्त्रीकडे पाहण्याची दृष्टि सर्वांत अधिक उदात्त व सुसंस्कृत मानली जाते.

ही दृष्टि गांधींच्या स्त्रीविषयक चळवळींत ओतप्रोत उतरली आहे. कौटुंबिक नात्याचें अधिष्ठान 'मातृत्व' हें आहे. त्यामुळे मातृत्वाची भावना हें व्यापक कौटुंबिक भावनेचें परम उदात्त शिखर आहे. त्या भावनेचा विस्तार व विकास करणें हें स्त्रीपुरुषांच्या सहजीवनाच्या प्रयोगांचें प्राथमिक तत्त्व असलें पाहिजे. अशी गांधींची सुनिश्चित निष्ठा आहे. म्हणून त्यांच्या आश्रमांत 'बा' आहेत, 'बापू' आहेत, 'भाई' आहेत, 'बेन' आहेत, 'काका' आहेत 'मामा' आहेत, 'मावशी' आहेत, 'आत्या' आहेत—थोडक्यांत, रक्तसंबंधाच्या अभावी कौटुंबिकतेच्या भावनेचा विकास करणारीं सगळीं नातीं आहेत.

आपण आपल्या खेड्यापाड्यांतहि असेंच पाहातों. तेथे जातगोत, धर्म, पंथ यांचा विचार न करतां महार ब्राह्मणाचा 'मामा' असतो.

कुणबी मुसलमानाचा 'आजोबा' असतो. पण ही कौटुंबिकतेची भावना तेथे फक्त वातावरणांत असते. तिच्या आधारावर सह-जीवनाचा उत्कट प्रयोग त्या ठिकाणीं करण्यांत येत नाही. पूर्वीच्या परंपरेंतील विद्यमान असलेल्या या शुभकारक भावनांचा सह-जीवनाच्या विकासाच्या कामीं उपयोग करून घेण्याची हातोटी नीतिनिष्ठ क्रांतिकारक गांधींनाच साधली आहे.

आपल्या जुन्या वाङ्मयांत अनेक नरश्रेष्ठांनी स्वतःच्या पत्नीविषयीं गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. त्यांपैकीं उदा० दाखल दोन येथे उद्धृत करतों. रघुवंशांत आपल्या मृत-पत्नीबद्दल शोक करतांना अज म्हणतो, "गृहिणी सचिवः सखीमिथः । प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।" यांत पत्नीला 'गृहिणी', 'मंत्री', 'सखी' आणि 'शिष्या' म्हणून गौरविलें आहे. पण अजाच्या भूमिकेहून दशरथाची भूमिका अगदीच निराळी दिसून येते. स्त्रैलंपट दशरथ कैकेयीच्या अविवेकी वर्तनाने हताश व हतबुद्ध झालेला आहे. श्रीरामचंद्राचा पिता दशरथ अशारीतीने पश्चात्ताप दग्ध झाल्यानंतर त्याला श्रीरामचंद्राच्या मातेची थोरवी आठवते. कैकेयी-कडे स्वतःची पत्नि म्हणून पाहणारा दशरथ कौसल्येकडे श्रीरामाची माता म्हणून पाहातो. त्यामुळे त्याची दृष्टि निवळलेली व पालटलेली दिसून येते. तो म्हणतोः—

"यदा यदा च कौसल्या दासीव च सखीव च भार्यावद् भगिनीवच्च मातृवच्चोपतिष्ठति ।" यांत कौसल्या फक्त सोबतीण, सल्लागार किंवा मैत्रिण च केवळ नसून भगिनी व माताहि आहे. अजाची भूमिका हृदयंगम आहे, शुद्ध आहे; पण ती शेवटी पतीची भूमिका आहे. अत्यंत शुद्ध स्वरूपाच्या का होईना पण कामनेची छटा तिच्यांत आहे. उलट दशरथाची भूमिका ही पित्याची भूमिका आहे. म्हणून त्याला कौसल्येचें दर्शन रामाच्या मातेच्या रूपाने होते आणि त्यामुळे कामनेचा गंधहि उरत नाही. रामाची माता आता दशरथाची भार्या राहिलेली नसून त्याच्या सगळ्या कुलाची माता झालेली आहे. हीच कल्पना अधिक व्यापक करून गांधींनी स्वतःच्या आश्रमांत दाखल केली. त्यामुळें कस्तुरबा या समग्र

आश्रमाच्या 'बा' झाल्या आणि सगळ्या आश्रमाच्या झाल्या म्हणजे बापूंच्याहि झाल्याच. अशा रीतीने पितृत्व व मातृत्व संकुचित कौटुंबिक मर्यादांचें उल्लंघन करून विश्वकुटुंबाच्या व्यापक मर्यादेंत दाखल झालें. याच्या पुढलें पाऊल म्हणजे अशा समान भूमिकेच्या सह-जीवनांतून उदय पावणारी अभेद भावना! संस्थेंत व सार्वजनिक जीवनांत हळूहळू पितृत्व व मातृत्व यांतील लिंगभेदाची जाणीव कमी कमी होऊं लागेल. ती एकमेकांत मिसळूं लागतील आणि शेवटी प्रत्यक्ष व्यवहारांत द्वंद शिल्लक राहिलें तरी तें एक-शेष-द्वंद च राहील. पार्वती व परमेश्वर म्हणजे माता व पिता यांचा उल्लेख कालिदासाने 'पितरौ' या एकाच पदाने केला. तसा तो कधी 'पितरौ' पदाने होईल, तर कधी 'मातरौ' पदानेहि होईल. यांत द्विवचन असलें तरी भावना एकत्वाची आहे. सह-जीवनाच्या प्रयोगांतून सामाजिक ऐक्याच्या या भावनेचा विकास करणें हें गांधींचें जीवित कार्य आहे. 'कम्यून' व 'आश्रम' यांच्या भूमिकांमध्ये हा असा फरक आहे. आश्रम ही विश्वकुटुंबाच्या भावनेचा विकास करण्याची प्रयोग-शाळा आहे. त्या शाळेंत अनेक पुण्यसंकल्पांचे अनेक शुभ संकेत आहेत. 'बा' हा त्या संकेतांपैकी एक उदात्त व मूलभूत असा संकेत आहे.

—नागपूर
२३ मार्च १९४७.

# क्रान्तिप्रवण तरुण

आपण हीं जीं शिबिरें घेतों त्यांत आपला दोन प्रकारचा हेतु असतो. तरुण वर्गांत शिपाईबाणा निर्माण करावा आणि रुजवावा, हा एक हेतु; आणि आपला तरुण हा नुसता शिपाईच नसून तो सेवकहि आहे ही भावना निर्माण करावयाची आणि वाढवावयाची, हा दुसरा हेतु.

## फक्त शिपाई

हा असा दुहेरी हेतु या शिबिरांच्या कल्पनेंत आहे. पूर्वी एकच कल्पना असे. ती म्हणजे शिपाईबाणा बाणविण्याची. जुन्या कल्पनेप्रमाणे शिपाई म्हणजे मारणारा व मरणारा. स्वत: न मरतां दुसऱ्यांना जो शिताफीने मारूं शकेल तो हुशार शिपाई. मारतां मारतां कामास येईल तो शूर शिपाई. लोकांना मारण्याच्या प्रसंगाची वाट पहात रहाणे हें त्याच्या जीवनाचें स्वरूप. तोंपर्यंत बेफामपणाने व भरमसाट जगायचें. शर्यतीच्या घोड्याप्रमाणे किंवा टकरींच्या एडक्याप्रमाणे अथवा पटाच्या बैलाप्रमाणे नुसताच पिंड पुष्ट करावयाचा, हाच त्याचा जीवनातला उद्योग. आपल्या इकडे पटाच्या बैलाला शर्यतीसाठी तयार करण्याकरतां तेल पाजतात, तूप पाजतात, कणकेचा खुराक लावतात— मग हे जिन्नस मालकाच्या मुलाबाळांना न मिळाले तरी हरकत नाही. आणि वर पुन्हा शर्यतीच्या वेळीं त्याला ताडी पाजतात. हेतु हा की, त्याला शरीराची शुद्ध राहूं नये. शिपायाला आपल्या मानवतेचें भान राहूं नये म्हणून याच धर्तीची योजना असते. त्याला भोंवतालच्या परिस्थितीची त्यामुळे मुळींच जाणीव रहात नाही.

## सैनिक सेवक

आपलें सगळेंच निराळें आहे. या शिबिरांत राहणाऱ्या स्वयंसेवकांना शिबिरांतली कामें संभाळून शिस्तीने व आपुलकीने ग्रामसेवाहि करावी लागते. लष्करी छावणीच्या भोंवतालची वस्तीहि साफसूफ ठेवण्याची वहिवाट आहे. लष्करी छावणीजवळचीं गावें फिनाइलने स्वच्छ ठेवण्यांत येतात, तिथल्या विहिरींत औषध घालण्यांत येतें. पण हें सगळें कशाला? तर पटकी किंवा इतर कुठलाहि वाखा लष्करी छावणींत पसरू नये म्हणून. आपण जी ग्राम-सफाई करतो तिचा हेतु अगदीच निराळा असतो. खेड्यांत रोगराई उत्पन्न होऊ नये, हा हेतु तर आहेच. पण याखेरीज स्वयंसेवकाला सेवेच वळण लागावें, हाहि हेतु आहे. याचा अर्थ असा की आपल्याला शिपाईबाणा व सेवावृत्ति यांचा मेळ साधावयाचा आहे. आपला तरुण हा शिपाईहि आणि सेवकहि आहे. आपल्या जगण्याने जो दुसऱ्याचें जीवन स्वच्छ, पवित्र व धन्य बनवील असा तरुण आज आपल्याला हवा आहे. तो निव्वळ युद्ध करणारा शिपाईहि नसावा किंवा केवळ परोपकार करणारा साधूहि नसावा. साधूची परोपकारपटुता आणि शिपायाची वीरवृत्ति यांचा त्याच्या ठिकाणीं सुंदर संयोग असला पाहिजे. अशा तरुणाला क्रांतिकारक म्हणतात. क्रांतिकारकांत साधूचा शांतपणा व शिपायाचा तेजस्वीपणा असावा लागतो. आपल्याला असा तरुणवर्ग उभा करायचा आहे. या तरुण वर्गाच्या जीवनांत संतांचें शुचित्व आणि शिपायाची शिस्त व तेज हे गुण राहतील. या गुणांच्या विकासाकरितां हीं शिबिरें आहेत.

## विवेकयुक्त नवीनता

या तरुण वर्गाचे विचार नेहमी ताजे व तेजस्वी असतील. आमचें जीवन त्यांना जुनाट व जीर्ण वाटेल. कदाचित् आमचे विचारहि शिळे वाटतील. मी जर तुम्हाला कालचा माणूस वाटलों, कालच्या गोष्टी सांगणारा भासलों, तर त्यांत तुमच्या तारुण्याचा गौरवच आहे. ज्याला जुनाट विचारांचा जुनाटपणा दिसत नाही तो कसला तरुण? पण जुन्यांतहि जो

टिकाऊ भाग असतो तो त्याला पाहता आला पाहिजे. त्याला दृष्टीची ही विवेकयुक्त नवीनता लाभली तो तरुण. तरुणाला मृत्यूतहि जिवनाची बीजें दिसतात. निराशेच्या विरविरत बुरख्यामागे दडलेला आशेचा टव-टवीत चेहरा त्याला दिसतो. मृत्यूतून जीवनरस शोषून घेण्याची अपूर्व कला त्याला साधलेली असते. जीवननिष्ठा म्हणजे जीवन–लोलुपता नव्हे. जिवंत राहण्याचा निश्चय म्हणजे जगण्याचा मोह नव्हे. म्हातारा जीवन-लोलुप असतो. मरण जसजसें जवळ येत जातें, तसतशी त्याची जगण्याची हांव वाढते. मरणाला घाबरून तो जीवनाला कवटाळतो. तरुणाला मरणाची तमा वाटत नाही. मरणाच्या तळाशी तळपत असलेलें जिवन त्याला दिसतें.

## मरणांत जीवन

लहान मुलांची जीवननिष्ठा अदम्य असते, अजिंक्य असते. त्याला मरणाची कल्पनाच करतां येत नाही. मरणांत जीवन संपतें हें त्याला कळतच नाही. त्याला आजीबाई गोष्ट सांगते की, गोवऱ्या वेंचणारा भिकाऱ्याचा पोर राजवाड्यासमोर येतो. राजा मेलेला असतो. गांवांतील शिष्टांनीं असें ठरविलेलें असतें कीं, हत्तीण आपल्या सोंडेंतील माळ ज्याच्या गळ्यात घालील त्याला गादीवर बसविण्यात येईल. हत्तीण गोवऱ्या वेंच-णाऱ्या पोराच्या गळ्यात माळ घालते. तो गादीवर बसतो. राजाच्या मुलीशीं त्याचें लग्न लागतें. त्याच रात्रीं त्याला साप चावतो. मुलगा मरतो. त्याचें औट घटकेचें राज्य संपून जातें. आजीबाई आंबट तोंड करून म्हणतात, “ गोष्ट संपली. ” मुलाला हें सहन होत नाही. तो म्हणतो, “ आजी, गोष्ट संपू शकत नाही. अशी गोष्ट आम्हाला नको आहे. गोष्ट पुढें चालव, नाही तर दुसरी सांग. मुलगा मरून गोष्ट ग कशी संपेल? ” आजीचा नाइलाज होतो. ती गोष्ट पुढें सांगू लागते: मग मुलाचें प्रेत पेटींत घातलें. गंगेच्या प्रवाहांत सोडून दिलें. तें पलीकडच्या तीराला लागलें. तिथें होता साधु तप करीत. त्याने ती पेटी उघडून प्रेत पाहिलें. साधूचें हृदय करुणेने भरून आलें. त्याने मंत्र म्हटला. राजकुमार जिवंत झाला. मोठ्या थाटामाटाने परत आला. पुन्हा राज्यावर बसला. राणीबरोबर राहू

लागला. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. आजी म्हणते, "आमची गोष्ट सरो!" नातू म्हणतो, "आता आमचें पोट भरो!" ही लहान मुलांची स्वाभाविक जीवननिष्ठा ज्याच्या तत्त्वज्ञानाचा आधार बनते तो तरुण. तरुण म्हणतो, "जीवनाचा अंत मृत्यूंत होऊच शकत नाही. माझ्या आयुष्याची परिसमाप्ति व परिपूर्णता मृत्यूंत होऊच शकत नाही!"

## अमरत्वाची भावना

म्हाताऱ्याला मरण जवळ आलेलें दिसतें. म्हणून त्याचें मन खचूं लागतें, शरीर खंगूं लागतें. "कृतांतकटकामलध्वज" पाहून त्याच्या छातींत धडकी भरते. तो म्हणतो, "आमच्या गोवऱ्या स्मशानात गेल्या. आतां काय? दररोज आमचें पाऊल स्मशानघाटाकडे जात आहे." म्हाताऱ्याचें जीवन म्हणजे स्मशानयात्रा. पण तरुणाचें आयुष्य म्हणजे जीवनयात्रा. त्याचें वय एक वर्षानें वाढलें तर त्याचा वाढदिवस साजरा होतो. आपल्या आयुष्यातलें एक वर्ष कमी झालें याचें भानहि त्याला रहात नाही. माणसाला जशी क्षयाची भावना होते, तशीच अमरत्वाचीहि भावना होत असते. भावनेला अनुरूप अशी भाषाहि बनत जाते. आपलें सौभाग्य संपूं शकतें, ही कल्पनाच सुवासिनीला सहन होत नाहीं. म्हणून कुंकूं पुसलें गेलें तरी ती म्हणते, "कुंकूं वाढलें"; बांगडी फुटली तर ती म्हणते, "बांगडी वाढली." अशी तिची अक्षय्य सौभाग्याची भावना असते. तरुणाचीहि जीवननिष्ठा अक्षय्य असते. त्याचे जन्मदिवस हे वाढदिवस असतात. मरणांत ज्याची गोष्ट संपूंच शकत नाही, तो बाल; मरणांत ज्याच्या जीवनाचा अंत होत नाहीं तो तरुण! त्याला मृत्यूंतहि जीवनाचें दर्शन होतें. त्याला कोठेंच निराशा आणि मरण दिसत नाही. आज हिंदुस्थानचीं माणसें कुत्र्याच्या मौताने मरत असतील. पण तरुणांचा हिंदुस्थान कधींच मरणार नाही. तो जगांत आपलें नांव गाजविणार आहे. हाच हीन, दीन, दलित, वंचित हिंदुस्थान इतर राष्ट्रांना कित्ता घालून देण्याइतका थोर होणार आहे. अशी ज्याची अमर जीवन-भावना तो तरुण!

## 'मी विधाता आहे !'

असा तरुण क्षणोक्षणीं मृत्यूशीं सामना करायला तयार असतो. पण त्याला ध्यास मात्र जीवनाचा असतो. जीवनांत जी चव, जो स्वाद, जी गोडी उत्पन्न होते, ती मरण विसरल्याने. जो मृत्यूची पर्वा करत नाही, त्याचें जीवन अमर होतें. आपल्याला या देशात अशा तरुणांचीं पथकें उभारायचीं आहेत, पण तीं पथकें हल्लींच्या सैनिकांप्रमाणे सामान्य जनतेहून निराळीं, अलग, आपल्या छावणींत राहणारी नको आहेत. यापुढे शिपाई व सामान्य जन, फौज व जनता असा भेद राहतां कामा नये. सर्वांनी क्रांतिवीर व्हायला हवें.

तरुणांच्या मनांत गरीब जनतेविषयीं जिव्हाळा असावा, पूज्यबुद्धि असावी, पण दया किंवा करुणा नसावी. आपण गरिबांविषयीं कीव दाखविली, त्यांच्या दैन्याचीं अंतःकरणाला पाझर फोडणारीं वर्णनें केलीं, तर आपण त्यांच्या ठिकाणीं 'मी बापडा आहे, मी असहाय आहे, दीन बिचारा आहे' अशी भावना निर्माण करूं. गरिबांविषयीं करुणा उत्पन्न करण्याचे दिवस आतां गेले. ती गोष्ट आमच्या काळाला शोभली. तुम्हा तरुणांनी तेथेंच थबकून राहता कामा नये. आपल्याला दीनाचा दैन्यभाव नाहीसा करावयाचा आहे. 'पुढलें जग मी निर्माण करणार आहे. मी त्याचा विधाता होणार!' अशी सामर्थ्याची भावना आपल्या जनतेत निर्माण करावयाची आहे. 'मी दरिद्री असलों तरी दीन नाही, गरीब असलों तरी बापडा नाही!' असें त्याला वाटलें पाहिजे. तोच क्रांति करणार आहे, याची जाणीव त्याला करून दिली पाहिजे.

## मानवाचा खास अधिकार

पुरुषार्थ-भावना ती हीच. "मुकी बिचारी कुणीहि हांका" या भावनेचा मागमूसहि राहतां कामा नये. पराक्रम हा माणसाचा जन्मसिद्ध आणि खास अधिकार आहे. माणसांत व इतर योनींत हाच फरक आहे. इतर योनी म्हणजे पशु व देव. या दोन्ही भोगयोनी आहेत. देवाला कष्ट करावे लागत नाहीत, भूक तहान नाही व मरणहि नाही. आयतें

अमृत प्यायला मिळतें. शिवाय अप्सरा आहेतच! आणि वर पुन्हा कल्पवृक्ष ठेवलेलाच! त्यांच्या जीवनाला चव कशी राहणार? त्यांचें अमृत म्हणजे नुसतेंच गोड आहे म्हणतात. नुसत्या गोडाने तर आपलें तोंड विटून जाईल. सुखजीवी देवांच्या जीविताला कशी चव असणार? त्यांना जीवनहि आयतेंच मिळतें. तेथें पराक्रमाला वाव नाही. त्यांचा देह हा भोग-देह आणि हा म्हणे स्वर्ग! अशा स्वर्गाचें आकर्षण कुणाला वाटणार? धर्माने उत्पन्न केलेली स्वर्गासारखी पाणचट वस्तु दुसरी नाही. देवाचा देह हा भोगदेह आणि माणसांचा देह हा योग–देह!

जसा एका टोंकाला देव तसा दुसऱ्या टोंकाला पशु. तोहि भोगयोनीपैकींच. तेथेंहि पराक्रमाला वाव नाही. तहान लागली की पाणी प्यावें, भूक लागली की गवत खावें, इतकेंच पशु जाणतो. माणसाच्या ठिकाणीं कांही और शक्ति असते. तो तहान नसतांना इतरांच्या आग्रहाखातर चहा पितो; सरबत पितो. भूक नसताना लाडू खातो, चिवडा खातो. उलट तहान असूनहि पाणी पिण्याचें टाळतो. म्हणजे तो भूक, तहान आवरतो. ही माणसाची दुहेरी शक्ति आहे. इच्छा–भोगाची व संयमाची ही शक्ति देवांत किंवा पशूंत नाही. म्हणून पशु किंवा देव स्वपराक्रमाने दुनिया बदलूं शकत नाहीत. आम्ही दुनिया बिघडवूं शकतों व दुरुस्तहीं करूं शकतों. माणूस जगाचें नंदनवनहि बनवूं शकतो किंवा ओसाड व भयाण रानहि बनवूं शकतो. त्याला देवाने तशा प्रकारची बुद्धि व शक्ति दिली आहे. भूक व तहान आवरून, आपल्या जीवाचें रान करून, जो जगाचें नंदनवन करील तो तरुण.

## तें आतां जुनें झालें

आतां यापुढें गरिबांच्या दुःखांविषयीं करुणा उत्पन्न करून आम्हाला रडविणारी कविता पुरेशी नाही. तें आता जुनें झालें. आता दुःखाची कहाणी ऐकून त्वेष उत्पन्न झाला पाहिजे. याचा अर्थ आपल्याला क्रूर बनविणारे धट्ट व हृदयहीन शिपाईगडी हवे आहेत, असा नाही. गरिबांविषयींच्या कळवळ्याने शिपायाचें मन विरघळून तें त्याच्या डोळ्यांतून

वाहूं लागलें पाहिजे. पण गरिबांच्या पोटांत पेटलेली आग त्याच्या डोळ्यांतून तेजाच्या ठिणगीच्या रूपानें बाहेर पडली पाहिजे. शंकराच्या तिसऱ्या डोळ्यांतलें तें तेज गरिबांच्या कपाळावर प्रकट झालें पाहिजे. शंकराचा तृतीय नेत्र म्हणे त्याच्या कपाळावर असतो. ती त्याच्या दैदीप्यमान विचारसरणीची व उज्वल नशिबाची खूण आहे. शंकराचा तो तृतीय नेत्र दरिद्री व कष्टजीवी जनतेच्या कपाळावर प्रकट झाला पाहिजे !

दीन व दरिद्री माणसाच्या ठिकाणीं देवाचें दर्शन दयावान् भक्तजनांना होत असे. श्रियाळ राजाला कुष्ठरोग्याच्या ठिकाणीं देव दिसला. स्वतःच्या मुलाचें मांस शिजवून त्यानें त्याला तृप्त केलें. आम्हांलाहि आपले रक्त व मांस देऊन दरिद्री–नारायणाला आळवायचें आहे. पण आपला दरिद्री–नारायण हा सामर्थ्यवान् आहे. तो 'नारायण' आहे. 'नारायण' म्हणजे नराचें सामर्थ्यवान् स्वरूप. नुसत्या 'नरां' त कांही जीव नाहीं.

'पशुनकी होत पन्हैयां, नरका कछू नहि होय !
नर जो करनी करे तो नर का नारायण हो'

कवि म्हणतो, नुसत्या नराला किंमत नाही. तो कमजोर आहे. त्याची कातडी घट्ट नाहीं, त्याला सुळे नाहीत, शिंगें नाहीत, नखें नाहीत, पण तो जर करणी करील तर हत्ती व सिंह देखील त्याचे अंकित होतील. आपल्याला ही सामर्थ्याची भावना सामान्य जनांच्या ठिकाणीं उत्पन्न करायची आहे. हीच दरिद्री–नारायणाची खरी उपासना ! हीच क्रांतीची साधना !

आज गरिबांच्या ठिकाणीं गरीबी असेल, पण दैन्य असतां कामा नये. जेथे गरिबी असूनहि दीनता नसेल तेथे सामर्थ्य उत्पन्न होतें.

ज्याप्रमाणें जीवननिष्ठा म्हणजे जीवनलोलुपता नव्हे त्याप्रमाणें ऐश्वर्य–भावना म्हणजे वैभव–लोलुपता नव्हे, सुखाचा हपाप नव्हे. गरीब व फकीर यांच्यातहि फरक असू शकतो.

तरुण हा मृत्युनिष्ठ नसतो. त्याने मृत्युचें भय सोडून त्यावर जय मिळविलेला असतो. क्रांतीचें कंकण बांधलेला आमचा सामान्य शेतकरी

हा कांही दारिद्र्याचा उपासक नव्हे. पण तो दारिद्र्याला भिऊन श्रीमंताचा दास होणार नाहीं.

## दुनिया पेटविण्याची शक्ति

एकदा सगळ्या जगांत दिग्विजय करून आल्यानंतर शिकंदर बादशहा एका फकीराकडे गेला व म्हणाला, " महाराज आपल्या सेवेस आलों आहे. आपली आज्ञा व्हावी. आपल्याला जें हवें असेल तें सादर करीन. " साधु म्हणाला, " अंमळ ऊन्ह सोडून उभा रहा. आणखी कांही नको. " आम्हांला वैभव हवें, पण आम्ही तें श्रीमंताजवळ मागणार नाही, ' आम्हाला भीक नको ' हा बाणेदारपणा जोंपर्यंत गरिबांच्या ठिकाणीं बाणणार नाही, तोंपर्यंत त्यांच्या ठिकाणीं क्रांतीची शक्ति उत्पन्न होणार नाही. गरिबांत जोंपर्यंत दीनता आहे, तोंपर्यंत गरिबी जाणार नाही. गरिबांच्या पोटांतली आग तेजाचें रूप घेऊन त्यांच्या डोळ्यांत चमकली पाहिजे. तेव्हा तिच्यांत दुनिया पेटविण्याची व दुनिया प्रकाशित करण्याची शक्ति उत्पन्न होईल. त्या दिवशीं शिपाई हा नुसता शिपाई रहाणार नाही, नागरिक हा फक्त नागरिक राहणार नाही. शिपायाचें हृदय द्रवून अश्रूंच्या रूपानें वाहू लागेल आणि दरिद्री नागरिकाच्या पोटांतील आग डोळ्यांतील ठिणगीच्या रूपानें प्रकट होईल. तो सोन्याचा दिवस आला म्हणजे क्रांतीचा दिवस आला म्हणून समजावे. तेव्हा गरिबांचें राज्य होईल. जो नागरिक तोच शिपाई, जो शिपाई तोच नागरिक, अशी परिस्थिति निर्माण होईल.

## उपनिषद् काय म्हणतें ?

ही क्रांति करण्याकरतां तशाच अधिकारी तरुणांची गरज आहे. उपनिषदांत क्रांतिकारी तारुण्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत. " युवास्यात् साधु, युवाध्यायकः आशिष्ठो द्रढिष्ठो बलिष्ठः। तस्येयम् पृथ्वी सर्वा वित्तस्य पूर्णास्यात्—तरुण साधु असावा, अध्ययनशील असावा, आशावान् असावा, दृढनिश्चयी असावा, बलवान असावा. म्हणजे त्याच्याकरतां सगळी

पृथ्वी संपत्तीने भरलेली अशी होईल." हा उपनिषदांतील ऋषींचा संदेश आहे. साधु म्हणजे सरळ मनाचा. सीधा साधा. ज्याच्यांत वांकडेपणाचें नांव नाही. साधु म्हणजे रावडमारव्या नव्हे. साधु म्हणजे निष्कपट मनाचा; मग त्याचे गळां माळ असो वा नसो. अनेक वीरपुरुषांचें वर्णन, बालकासारखा निष्पाप' या शब्दांत करतात. 'कोंकरासारखा निरुपद्रवी व बालकासारखा निष्कपट' या शब्दांत आपण वीरांचा गौरव करतो. लहान मुलांच्या वृत्तींत देवलोकींची दिव्यता असते. त्यांच्या वृत्तींत जीवनाचें मांगल्य ओतप्रोत दिसून येतें. लोक जेव्हां लहान मुलांना येशू ख्रिस्ताजवळ जाण्याची मनाई करूं लागले तेव्हां तो कळवळून ओरडला, "येऊं द्या रे, त्या लहानग्यांना माझ्याकडे येऊं द्या! त्या चिमुकल्यांना अडवूं नका! कारण देवाचें राज्य त्यांच्यासारख्यांचेंच आहे." मनाचा सरळपणा व कोंवळेपणा हेंच साधुत्व. ताठरपणा नको. निबरपणा नको. जीवन निबर झालें, ताठर झालें म्हणजे त्याच्यांवर कुठलेंच संस्कार उमटत नाहीत. लहान मुलांचें मन लवचिक असतें. त्याला तणाव असतो. मोडलें तरी लवकर जुळतें. लहान मुलांचें हाड मोडलें तर त्याला 'ग्रीन-स्टिक-फ्रॅक्चर' म्हणतात. हिरव्या देंठा-प्रमाणे तें मोडलेलें हाड लवकर जुळतें. सुकलेल्या काडीप्रमाणे त्याचे काडकन् दोन तुकडे होत नाहीत. ज्याच्या मनांत इतका कस असेल तो तरुण. तरुण म्हणजे ताज्या मनाचा, कोंवळ्या मनाचा, निष्पाप वृत्तीचा.

## 'युवाध्यायकः'

ज्याचें मन ताजेंतवाने असेल, तोच नवीन ज्ञान ग्रहण करू शकतो. म्हणून ऋषि म्हणतो, "युवाध्यायकः". त्याचें शील सगळ्या पृथ्वीतून ज्ञान घेण्याचें असावें. हीच विद्यार्थी-दृष्टि. दत्तात्रेयांनी चोवीस गुरू केले. विद्यार्थ्याला सगळी सृष्टि ज्ञानमय दिसते. तो जें पाहतो त्याच्यापासून कांहीं तरी धडा घेतो. स्कॉटलंडचा ब्रूस राजा अनेकदां लढाईत हरला. बिचारा अगदीं हताश झाला. त्याला एका कोळ्यापासून बोध मिळाला. कोळी त्याचा गुरु झाला. विद्यार्थ्याला सर्वत्र ज्ञान भरलेलें दिसतें. ज्ञान-देवाच्या दिव्य शक्तीने फक्त रेडाच बोलविला. विद्यार्थ्याच्या दिव्य श्रद्धेमुळे ओढे, दगड, झाडाचीं पानें, म्हणजे अखिल चराचर सृष्टि बोलूं लागते. त्याच्या निष्पाप दृष्टीला सगळीकडे चांगुलपणाच दिसूं लागतो.

## आस्तिक दृष्टि

या दृष्टीला 'आस्तिक दृष्टि' म्हणतात. आस्तिकतेची पराकाष्ठा म्हणजे तारुण्य. आस्तिकता हें हिंदुस्थानचें वैशिष्ट्य आहे. आपल्या संस्कृत वाङ्मयांत "सैतान" हा शद्बच नाही. देवाच्या बरोबरीचा, त्याच्या तोडीचा सैतान आपल्या साहित्यांत कोठेंच आढळत नाही. 'डेव्हिल' किंवा 'सैतान' शद्बांचें भाषांतर संस्कृतांत होऊं शकत नाही. सैतान देखील भगवंताच्या सत्तेवाचून क्षणभर टिकूं शकत नाही, अशी आमची श्रद्धा आहे. म्हणूनच शिशुपाल मेला की त्याचें तेज श्रीकृष्णांत मिसळतें. रावण मेला की त्याचें तेज रामांत जाऊन मिसळतें. आणि कंस केशवाशीं तद्रूप होतो. आम्ही सैतानाचें स्वतंत्र अस्तित्वच मुळीं मानत नाही. माणूस कितीहि दुष्ट असो, दुर्जन असो, दुःशासन असो, आम्ही त्याच्या हृदयांतल्या सैतानाला जिंकूं, त्याच्या हृदयांतल्या देवाला जागवूं, असें जो म्हणतो तो तरुण. म्हणून उपनिषद् म्हणतें, तरुण 'आशिष्ठ' असावा. कमालीचा आशावादी असावा. कमालीचा आशानिष्ठ असावा. निराशा हा शद्ब त्याच्या भाषेंत नसावा.

## नचिकेत्यांचीं पथकें

अशी आशानिष्ठा रगदार मनांतच रुजूं शकते म्हणून उपनिषद् म्हणतें, तो 'द्रढिष्ठ' हि असावा. मनाचा मजबूत असावा. कनवाळू असला तरी खंबीर असावा, दृढनिश्चयी असावा. आपण जें ठरविलें तेंच सत्य आहे, तेंच हितकर आहे, तेंच प्रसंगाला आवश्यक आहे, असें एकदा ठरल्यानंतर मग त्यापासून तो डगमगत नाही. शेंडी तुटो वा पारंबी तुटो, अशा निश्चयाने आपल्या मार्गाला तो चिकटून राहतो. त्याच्या ठिकाणीं नचिकेत्यासारखी अविचल निष्ठा असते. नचिकेत्याला भुरळ पाडण्यासाठी यम म्हणतो, "मी तुला देव-दुर्लभ महाल, माड्या, हत्ती, घोडे, सुंदर स्त्रिया व इतर वैभव देतो, हवें तेवढें आयुष्य देतो, पण मृत्यूला जिंकण्याची विद्या माझ्याजवळ मागूं नकोस." पण नाचिकेता भुलत नाही. तो म्हणतो, "तूं दिलेलें माझ्या काय कामाचें! जो देऊं शकतो, तो

हिरावूं शकतो. तूं दिलेलें आयुष्य म्हणजे तुझ्या कृपेनें प्राप्त झालेलें आयुष्य. तुझ्या मेहरबानीवर असलेलें आयुष्य म्हणजे मरणाधीन जीवन. मला असले मुर्दाड आयुष्य नको आहे. तुला जिंकणारें, मृत्युलाहि वश न होणारें जीवन हवें आहे ! " या मृत्युलोकांत मरणाच्या छायेपलीकडे ज्याला अखंड जीवनाचें दर्शन होतें तो तरुण. तो म्हणतो : विज्ञान कांहीहि म्हणो, जीवन कधीच नाहीसें होणार नाही. मरणाला भिऊन, वैभवाला भुलून, तो जीवननिष्ठेला पारखा होत नाही. अशा शाश्वत जीवनाचीं बीजें ज्याला समाजांत नित्य दिसतात तो तरुण. अशा नचिकेत्यांचीं पथकें आमच्यांत उभारलीं जाऊन ' हम अमर भये अब न मरेंगे, ' ची गर्जना करूं लागलीं म्हणजे क्रांतीला किती वेळ लागणार ? नचिकेता आपल्या निश्चयापासून ढळला नाही. तो म्हणाला , " यमराजा, तुझ्या हाताचें नसेल असें जीवन मला हवें आहे. तें तुला जिंकूनच मला मिळवितां येईल ! " मरणाला जिंकून जगण्याचा निश्चय करणारे तरुण आज जगाला हवे आहेत.

## द्रढिष्ठ आणि बलिष्ठ

' द्रढिष्ठ ' म्हणजे मनाचा मजबूत, मनाचा धड आणि ' बलिष्ठ' म्हणजे शरीराचा बळकट. तरुणाच्या शरीरांतही रग पाहिजे. शरीराचा बळकटपणा म्हणजे नुसतीच मल्लगिरी नव्हे. पुष्कळसे शर्यतीचे घोडे, पटाचे बैल व टक्करीचे एडके मोठ्या नाजुक तब्येतीचे असतात. पुष्कळशा मल्लांमध्ये थंडीवारा, उन्हपाऊस सहन करण्याची शक्ति नसते. त्यांच्या हातून श्रम होत नाहीत. हें शरीर पुष्ट असलें तरी बलवान नव्हे. आमच्या तरुणांचें शरीर गुटगुटीत असावें, सुंदर असावें आणि काटकहि असावें.

उपनिषद् म्हणतें, ' ज्या तरुणाच्या अंगीं हे गुण असतील, त्याला सगळ्या पृथ्वींत जिकडे तिकडे संपत्ति भरलेली दिसेल. ' त्याच्याकरितां पृथ्वी सोन्याची होईल. मातींतून सोनें निघेल. पण तें आयतें मात्र मिळ-णार नाही. मरतांना एक बाप मुलांना सांगून गेला, तुमच्याकरतां शेतांत धन गाडून ठेवलें आहे. नेमकें ठिकाण मात्र तो सांगूं शकला नाही. बाप

मेल्याधर धनाच्या आशेने मुलांनी सबंध शेत खणून काढलें. पण सोन्याचा हंडा कुठेच आढळला नाहीं. तेव्हा निराश होऊन त्यांनी त्यांत बीं पेरलें. त्या वर्षी विलक्षण पीक आलें. शेतांत गाडून ठेवलेलें सोनें जमिनीवर डोलूं लागलें. उपनिषद् म्हणतें, "सारी पृथ्वी सोन्याने भरली आहे. पण तें कष्टावांचून मिळणार नाहीं. खणा आणि बी पेरा, म्हणजे सारी जमीन सोन्याची होईल."

## कल्पतरु—वाद

श्रमावांचून सोनें मिळालें तर आपलें जगहि स्वर्गासारखें भयंकर होईल. "स्वर्गातला कल्पतरुवाद" आम्हांला नको आहे. एक शिणलेला प्रवासी योगायोगाने विसाव्यासाठी कल्पतरूच्या छायेंत बसला. तहानेंने व्याकुळ झाला होता. म्हणाला, "कुणा हरीचा लाल पाणी देईल का ?" चांदीच्या झारींत पाणी आलें. प्रवासी पाणी पिऊन तृप्त झाला. मनांत म्हणाला, "पाणी मिळालें तसेंच अन्न मिळालें तर चैन होईल" झालें ! सोन्याच्या ताटांत अन्न वाढून आलें. प्रवाशाने मनमुराद खाल्लें. मग म्हणाला, "निजायला अंथरुण मिळालें तर बहार होईल बुवा" लागलीच मच्छरदाणीचें अंथरुण आलें. अंथरुणावर पडल्याबरोबर सैतानाचा कारखाना सुरू झाला. त्याच्या मनांतलें भूत डोक्यांत थैमान घालूं लागलें. म्हणाला, "ही सगळी भूतचेष्टा तर नव्हे ?" म्हणण्याचाच अवकाश की समोर एक अक्राळविक्राळ भूत येऊन उभें राहिलें. प्रवासी म्हणाला, "अरे बापरे, हें मला खाणार तर नाहींना ?" प्रवासीहि संपला व प्रवासहि संपला !

श्रमावांचून सुखसाधनांची रेलचेल झाली तर मनांतील भुतांचा नंगा नाच सुरू होईल. साधनांच्या गर्दीत जीव गुदमरून जाईल, सुख लोपून जाईल, मानव्य हरपून जाईल. मन जोंपर्यंत वाकडें असेल तोंपर्यंत साधनसामुग्रीने जगहि वांकडेंच निर्माण होईल. म्हणून माणसाच्या मनाला नवीन वळण लावलें पाहिजे. एरवी 'उपकरणवाद' बोकाळेल. यंत्रवादाचें

प्रस्थ माजेल, आणि माणसाचा पत्ता लागणार नाहीं. शस्त्रवाद वाढला म्हणजे वीरवृत्तीची पायमल्ली होते. नागरिक व शिपाई यांच्यांत अंतर पडतें. त्याचप्रमाणें उपकरणवाद व यंत्रवाद वाढला की, माणूस बेपत्ता होतो.

## हवी सोन्याची दुनिया, पण—

आम्हांला सोन्याची दुनिया हवी आहे. पण तें सोनें शेतांत उगवणारें हवें आहे. सामानाच्या गर्दींत माणूस हरवला तर हातीं काय लागेल? समजा, एखाद्या माणसाजवळ इतकीं अंथरुणें आहेत की, त्याचा सगळा वेळ अंथरुणें पसरण्यांतच जातो आणि त्याला आडवा होण्यास उसंतच मिळत नाहीं, तर आपण त्याला काय म्हणूं? अंथरुणांच्या गर्दींमुळे झोपेचा कोंडमारा होणें आणि साधनांच्या अतिरेकामुळे शांति व स्वास्थ्य यांचा नाश होणें यांत प्रकारभेद मुळींच नाहीं. सारांश, व्यवस्थित भोग भोगण्याकरतांहि श्रमाची व संयमाची आवश्यकता आहे.

सोन्याची दुनिया हवी असेल तर 'उपकरणवादा' प्रमाणेंच 'प्रभुत्ववादा' लाहि मूठमाती द्यावी लागेल. आमच्या नवीन जगांत माणूस माणसाचा अंकित राहणार नाहीं. आज मालकीची भावना इतकी वाढली आहे की, प्रेमभावनेंत देखील मालकीची भावना दडलेली दिसून येते. 'मी माझ्या नोकराला वाटेल तसें वागवीन.' 'मी आपल्या मुलाचा जीव घेईन. त्याचें तुम्हाला काय?' 'मी माझ्या बायकोच्या जीवाचें वाटेल तें करीन, तुम्हाला त्यांत ढवळाढवळ करण्याचा कांहींच अधिकार नाहीं.' अशी भाषा आपण नेहमी ऐकतों. या वृत्तीला 'प्रभुत्ववाद' म्हणतात. जोंपर्यंत हा 'प्रभुत्ववाद' नाहींसा होणार नाहीं, तोंपर्यंत माणसाची वृत्ति पशूसारखीच राहील. गुरांच्या बाजाराप्रमाणे माणसांचा बाजार भरेल. माणसें विकलीं जातील, विकत घेतलीं जातील. खाडिलकरांचा रोहिदास तारामतीला मोठा हृदयभेदक प्रश्न करतो, "आई माणसें विकणे म्हणजे काय ग?" आंबे विकतात, गाई म्हशी विकतात, जडजवाहिर विकतात, हें रोहिदासाला माहित आहे. पण माणसेंहि विकतात, माणसांचाही बाजार भरतो, हें त्या निष्पाप बालकाला काय माहित?

## माणसाचा बाजार

माणसांचा बाजार भरला म्हणजे विक्रीला योग्य तो माल तयार केला जातो. पुरुष आपल्या मालकाला हवें असतील तसें परिश्रम करायला शिकतो. आणि स्त्री पुरुषाला आवडेल तसें शरीर नटविते, ईश्वराने दिलेल्या अवयवांना छिद्रें पाडून शरीराच्या सौंदर्यांत भर घालतें. ज्याला सौंदर्य पहायची दृष्टि असेल त्याला माणसाचें नुसतें शरीर सुंदर दिसेल. एकाद्याचें शरीर किंवा एकाद्याचें श्रम विकत घ्यावे ही गोष्टच त्याला खपणार नाही. सुवर्णयुगापेक्षाहि मानव्याचें युग श्रेष्ठ आहे. सत्तेच्या युगापेक्षा सत्ययुग अधिक मंगलकारक आहे. सत्ययुगांत माणसाची सत्ता चालणार नाही, माणूस माणसाला विकला जाणार नाही. त्याला कुणी वर्गहीन समाज म्हणोत, आम्ही त्याला मानवाचें स्वराज्य म्हणतो. असें मानव्याचें युग आणायला शस्त्रवाद, यंत्रवाद व प्रभुत्ववाद या तिन्ही वादांचा नायनाट झाला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की, यंत्र किंवा उपकरणें मुळीच नकोत. त्याचा उपयोग असा झाला पाहिजे की, त्यांच्या योगाने मानवाच्या सर्व नैसर्गिक शक्तींचा व्यवस्थित विकास होईल, इतकेंच म्हणायचें आहे.

## तारुण्याचे 'त' कार

अशा मानवतेच्या युगाच्या निर्मितीसाठीं तुमच्या अंगीं तारुण्य-सुलभ व तारुण्योचित गुण बाणले पाहिजेत. ते गुण म्हणजे तेजस्विता, तप-स्विता व तत्परता. हे तारुण्याचे तीन 'त' कार म्हणतां येतील.

तेजस्विता म्हणजे वीरवृत्ति. वीरवृत्ति म्हणजे प्रतिकारनिष्ठा; प्रति-काराचें व्रत घेण्याची वृत्ति. वीरवृत्ति म्हणजे माणसाची माणसाशीं लढ-ण्याची वृत्ति नव्हे, प्रतिकार म्हणजे टक्कर किंवा सांठमारी नव्हे. आम्हाला जगांतून अज्ञान, अन्याय, दारिद्र्य हीं नाहीशीं करायचीं आहेत. आम्ही अज्ञानाचा प्रतिकार करूं, अन्यायाला विरोध करूं, दुःखाशीं झुंज देऊं हीच तेजस्विता. अज्ञान, अन्याय व दुःख यांचा नाश करण्याकरितां माणसांचाच नाश करणें म्हणजे समाजाच्या मुळावरच घाव घालणे होय.

जगांत सगळीकडे संपन्नता व समृद्धीचें साम्राज्य झालें, पण सुबत्तेचा सुण्यागोविंदाने फायदा घेणारीं माणसेंच नसलीं तर? त्या सगळ्या संपत्तीची यादवीमुळे राखरांगोळी होईल. म्हणून तेजस्विता किंवा वीरवृत्ति म्हणजे माणसाचें रक्षण करून त्याला जडलेल्या व्याधींचा प्रतिकार करण्याची वृत्ति . हेंच तेज.

तपावांचून तेज उत्पन्न होणें शक्य नाही. तप हें दोन प्रकारचें असतें. एक, कष्ट सहन करण्याचा सराव करणें आणि त्याकरतां मुद्दाम संकटांत जीव घालणे या धाडसी वृत्तीला तपाचरण म्हणतात. यांत कष्ट सहन करण्याचा अभ्यास करावयाचा असतो. तपाचा दुसरा प्रकार म्हणजे **तितिक्षा.** तितिक्षा म्हणजे येऊन पडलेल्या हालअपेष्टा सोसण्याची तयारी. तपाच्या अभ्यासाने ही शक्ति अंगीं येतें. अशा दुहेरी तपाने प्रतिकारनिष्ठा जागृत होते.

तेज व तप यांच्या जोडीला तत्परताहि हवी. तत्परता म्हणजे पत्करलेल्या कार्याशीं तदाकार होण्याची वृत्ति. घेतलेल्या कामांत गढून जाण्याची आणि त्यासाठीं इतर कामें बाजूला सारून नेहमी 'तयार' असण्याची संवय असली पाहिजे. कुठलीहि सबब किंवा अडचण अंगीकृत कार्याच्या आड येतां कामा नये. ज्यांची वृत्ति कार्याशीं तद्रुप झालेली आहे, त्यांना स्वतःचा संसार सुचत नाही, विषयसुखाची चाड वाटत नाही. जुन्या मराठ्याबद्दल असें म्हणतात की, तरवार हीच त्यांची अर्धांगी असे. ज्यानें प्रतिकाराचें व्रत घेतलें आहे त्याच्या निष्ठेचें हें स्वरूप आहे. ही निष्ठा तुम्हाला प्रत्येक क्रांतिवीराच्या चारित्र्यांत आढळेल.

## माणुसकीचें गौरीशंकर

या गुणांचा विकास करण्याचें शिक्षण जेव्हां तुमच्या शिबिरांतून देण्यांत येईल, तेव्हां आपलें सामाजिक जीवन धन्य होईल. सगळ्या दुनियेचा संसार हा त्या दिवशीं सोन्याचा होईल. एकमेकांना सुखी पाहण्यांत माणसाला धन्यता वाटेल. आपल्या सुखांत दुसऱ्याला वांटेकरी केल्याशिवाय माणसाला चैन पडणार नाही. आजहि आपण एखादें सुंदर दृश्य

पाहिलें किंवा स्वादिष्ट फळ खाल्लें, तर त्या आनंदांत आपल्या प्रेमाच्या माणसाला सामील केल्याखेरीज आपल्याला चैन पडत नाही. सुखांत दुसऱ्याला वाटेकरी केल्याने सुख वाढतें, ही व्यापक जाणीव ज्याला आहे तो माणूस. जो एकटा भोगतो तो चोर. गीता म्हणते, जो स्वतःकरतां स्वयंपाक करतो तो पाप खातो. आपल्याला जगाचें सैनिकीकरण करावयाचें नाही. समाजाला एका विशाल सैन्याचें स्वरूप द्यावयाचें नसून संयुक्त विश्वकुटुंबाचें स्वरूप द्यायचें आहे. तें कुटुंब स्वयंशासित राहील. त्यांत कुणी अधिकारी नसतील, कुठलेहि कायदे नसतील. आईने पहाटे उठून स्वयंपाक करावा, नाहीतर तिला शिक्षा होईल, असा काय कुणी कायदा करून ठेवला आहे? घरांतील माणसांनी जेवणाकरितां एकमेकांची वाट पहावी असें कांही कुठें लिहून ठेवलें आहे? पण त्यांना एकमेकांबरोबर जेवल्याखेरीज अन्नच गोड लागत नाही. ही कौटुंबिक वृत्ति ज्या दिवशीं सर्वत्र होईल, त्या दिवशीं राजसंस्था आपोआप विरून जाईल. माणसें आपापलीं कामें आनंदाने व शिस्तीने करतील. जेव्हां आपण सारें जग असें संयुक्त कुटुंब करूं शकूं, त्या दिवशीं आपण सांस्कृतिक उन्नतीचें गौरीशंकर गाठलें असें म्हणतां येईल. त्या दिवशीं क्रांति सफल होईल. माणुसकीचें हें गौरीशंकर आपल्याला गांठावयाचें आहे. आपल्याला मानव्याचा संसार थाटावयाचा आहे. आपल्याला देवहि व्हायचें नाही आणि हैवानहि बनायचें नाही. माणूसच बनावयाचें आहे. हेंच आपल्या क्रांतीचें उद्दिष्ट आहे. माणूस बनण्याची शक्ति व बुद्धि ईश्वर आपल्याला देवो.

कार्यकर्ता शिबिर, मु. थाटुरवाडा (मध्यप्रांत) येथील समारोपाचें भाषण.

# विधायक विचारशीलता

## [१] बुद्धिमत्ता आणि बुद्धिनिष्ठा

आज आमच्या देशांत विचारशीलतेची उणीव आहे. बुद्धिवान् लोकांची उणीव मात्र नाही. तथापि बुद्धिमान लोकांनी विचार करायचें सोडून दिलें आहे. निदान विधायक विचारांना तरी त्यांच्या बुद्धिकडून रजा मिळाली आहे. त्यामुळे आज जे बुद्धिमान् आणि विद्यासंपन्न आहेत ते विचारवान नाहीत. बुद्धिमान आणि शिकल्या-सवरल्या लोकांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला आहे. त्यांची सर्व विद्या पुस्तकांत बंद आहे. जुन्या काळीं ब्राह्मण वर्ग विद्यासंपन्न होता. पण त्यांच्या ठिकाणीं देखील विधायक प्रतिभेचा अभावच होता. ते सर्व ग्रंथजीवि बनले होते. विचारविमुक्त पांडित्य त्यांच्या ठिकाणीं होतें. शास्त्रीय ग्रंथांचा अर्थ लावतां लावतांच त्यांची बुद्धि कामास येत होती. नवीन विचार समाजामध्ये प्रवर्तित करण्याचें काम जणूं आपलें नव्हे अशीच त्यांची समजूत होती. त्यामुळे ते मीमांसक बनले. शास्त्री मात्र होऊं शकले नाही. शास्त्रार्थातच त्यांनीं कृतकृत्यता मानली.

आज जी स्थिति वकील आणि न्यायाधिशाच्या कामाची आहे, तीच त्या काळच्या बुद्धिमान वर्गाची होती. वकील व न्यायधीश हे फक्त कायद्याचा अर्थ लावतात. नवा कायदा करणें त्यांचें काम नव्हे. १९२२ सालीं गांधीजींचा खटला ज्या न्यायाधिशासमोर निघाला होता, त्यानें स्वतःची स्थिति अगदी स्पष्ट शब्दांत मांडली होती. तो म्हणाला, " गांधीजी, आपण अत्यंत महान् आहांत, सदाचारी व नीतिमान् पुरुष आहांत, तथापि न्यायाधीश या नात्यानें आपल्या नैतिक महानतेशीं मला कांही एक कर्तव्य नाही. कायदा काय सांगतो व तो आपल्या बाबतींत कितपत लागूं होतो, पाहणें एवढेंच माझें काम आहे."

धर्मशास्त्र्यांची स्थिति हीच आहे. नव्या सामाजिक मूल्यांचा आविष्कार आणि त्यांचें प्रवर्तन करण्याची शक्ति ते गमावून बसले आहेत. शास्त्री आणि राज्यकर्ते हे नेहमी समाजाच्या प्रचलित मर्यादांचें रक्षण करण्याचा प्रयत्न करतात. नव्या मर्यादा कायम करणे त्यांच्या शक्तीच्या बाहेर आहे. प्रत्यक्ष रामाचेंच उदाहरण घ्या. तो तर युगप्रवर्तक राजा होता. परंतु त्यालाहि बहुतांशी आपल्या काळाच्या मर्यादांचें रक्षण करावें लागलें. त्याच्या वेळीं कोण्या एका शूद्राने वर्णधर्माची मर्यादा तोडली, तेव्हा मर्यादा-रक्षणासाठी त्याने त्या शूद्राचा शीरच्छेद केला. विद्यमान मर्यादांचें रक्षण करणें हें राजसत्तेला आपलें कर्तव्य वाटते. मग त्या राजसत्तेचा अधिष्ठाता प्रत्यक्ष प्रभू राम कां असेना !

## [२] बुध्दिनिष्ठ वर्ग

बुध्दिनिष्ठ वर्गाचें कार्य मात्र यापेक्षा भिन्न आहे. त्याने स्थितिस्थापक आणि गतानुगतिक होण्याचें ठरविल्यास गंगेचें पावनत्वच गेल्यासारखे होईल. जुन्या मर्यादा तोडून त्यांच्या ऐवजी कालानुरूप नव्या मर्यादा कायम करणे हा बुध्दिनिष्ठ वर्गाचा अधिकार आहे. तें त्याचें पवित्र कर्तव्य आहे. समाजाची सांस्कृतिक भूमिका उन्नत होण्याचा तोच एक मार्ग आहे. यांतूनच क्रांतीचा उदय होतो. सामाजिक परिस्थितीचा वस्तुनिष्ठ विचार करून बुध्दिनिष्ठ वर्गाने नवी मूल्यें शोधलीं पाहिजेत आणि समाजापुढे ठेवलीं पाहिजेत. या महान कार्याचा सहभाग तुम्ही म्हणजे प्रौढ विद्यार्थी उचलूं शकतां.

## [३] अहंनिष्ठा, आत्मनिष्ठा, समाजनिष्ठा

विचारशील होण्यासाठीं जगापासून दूर जाण्याची गरज नाही. आत्मनिष्ठ किंवा एकांतसेवी बनण्याचेंहि कारण नाही. माणसाने सामाजिक परिस्थितीकडे डोळेझांक केली, तर तो हृदयहीन होईल किंवा विरक्त होईल. रोम शहर जेव्हा जळत होतें तेव्हा नीरो आपली सारंगी वाजविण्यांत मग्न

होता. त्याचें मन दगडाचें बनून गेलें होतें. जनकपुरी जळायला लागली तेव्हा विदेही जनकाला त्याचें मुळीच दुःख झालें नाही. कारण ती त्याची वैराग्य वृत्ति होती. ही आत्मनिष्ठा आणि एकांतसेवन आज आमच्या कांही कामाचें नाही. तुम्हांला लोकांत राहूनच सेवा करायला हवी. तुमचें हृदय संवेदनाशील आणि संस्कारक्षम व्हायला हवें. समाजांत जे फेरबदल होतात त्याची प्रतिक्रिया तुमच्यावर व्हायला हवी. सामाजिक घटनांचा परिणाम जर तुमच्यांवर झाला नाहीं तर तें मुडदाड बनेल. मनावर जेव्हा अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होतो तेव्हाच बुद्धिला चालना मिळते. कित्येक लोक रोज रोज सिनेमा पाहायला जातात, त्यांच्या भावना त्यामुळे मुडदाड बनतात. सिनेमांतील चित्रांचा त्यांच्या मनावर कांहीच परिणाम होत नाही. तें वेदनाहीन बनून जातें. आपल्या मनाला आल्हाद होत आहे असा त्यांना भ्रम होतो. पण ती निव्वळ आत्मवंचना असते. मनाला कसलीहि लागणी न लागतां भावरुप मनोरंजन होईल तरी कसें? आपण ताजमहाल पाहून त्याच्या अनुपम सौंदर्य सौष्ठवाने प्रभावित होऊन गद्‌गद् होतो; परंतु तेंच तेथे राहणारे पाहारेदार अहर्निश ताजमहाल पाहातात, पण त्यांच्या मनांवर त्याचा कांहीच परिणाम होत नाही. त्यांना तर ताजमहालांपेक्षा चिरभिरीची पावली अधिक महत्वाची वाटते.

## [४] बुद्धिनिष्ठ आणि हृदयवान् बना.

तात्पर्य, तुम्हांला बुद्धिनिष्ठ झालें पाहिजे आणि हृदयवान देखील! आज बुद्धिमान् दोन प्रकारचे आढळून येतात. एक पुराण–कुराणवाले आणि दुसरे मार्क्स–लेनिनवाले. दोघांचीहि प्रतिभा ग्रंथजीवि आहे. ग्रंथाचाच आधार देत देत ते नवीन विचारांचें आणि योजनांचें प्रतिपादन करतात. या महान् ग्रंथाचें मूल्य आपल्याला कमी करावयाचें नाही. आम्हांला प्रेरणा व स्फूर्ति त्यांच्यापासूनच मिळते. एका अर्थानें जगांतील सर्वच क्रांत्या ग्रंथोद्‌भूत 'Book revolutions' आहेत. मार्क्सवादाचे सर्वच अनुयायी अशा प्रकारचे आहेत असें मला म्हणावयाचें नाही. मार्क्स

म्हणणें एवढेंच की, आम्ही निव्वळ ग्रंथदास किंवा लकीरीचे फकीर बनतां कामा नये. नवनिर्मितीची आणि नवनवीन आविष्काराची अकुंठित शक्ति आमच्या प्रतिभेंत असली पाहिजे. या देशाच्या विशिष्ठ परिस्थितीचें प्रतिबिंब आपल्या विचारधारेंत उठलें पाहिजे. आमच्या हृदयांवर आणि मनावर दैनंदिन घटनांची प्रतिक्रिया झाली पाहिजे. ती प्रतिक्रिया आमच्या भावनेला व बुद्धिमत्तेला अनुरूप अशीच होणार! म्हणून त्यासाठीं आमच्या भावना सुसंस्कृत आणि बुद्धि वैज्ञानिक परिष्कृत असली पाहिजे.

तथापि आज हें होत नाही!

## [५] विज्ञानाचा पराजय

आजचा जमाना विज्ञानाचा आहे असें लोक समजतात, बुद्धि-मानाचा आहे असें मानतात, यावर मी अेवढेंच सांगूं अिच्छितो की, जमाना विज्ञानाचा तर आहे, पण त्याच्या पराभवाचा! त्या विज्ञानाच्या असफलतेचा आहे. विज्ञानामध्ये आज मानवतेचा विकास करण्याची शक्ति राहिलेली नाही विज्ञानाला कांही काळ रजा द्या—

A moratorium on science अशी यूरोपची ओरड आहे, ही मोठी भयानक गोष्ट आहे. म्हणूनच विज्ञानाचा पराभव झाला आहे तें हताश झालें आहे. युग आहे विज्ञानाच्या विचक्याचें, frustration of science चें! विज्ञान आम्हांला सोडावयाचें नाही. तसें करून माणसाचें निभावयाचें नाही. तथापि जी गोष्ट प्राचीन काळीं धर्माच्या बाबतींत घडली, तीच आज विज्ञानाच्या बाबतींत घडत आहे. नीतीची साथ धर्मानें सोडली आणि त्याची परिणति निर्जीव अवडंबर आणि निव्वळ तांत्रिकता यांत झाली. रविवार, शुक्रवार, अेकादशी अित्यादि दिवशींच फक्त धर्माचें स्मरण केलें जातें. बाकीच्या दिवशी त्याला रजा देण्यांत येतें. विज्ञानाचेंहि आज फक्त युद्धाकरितां काम पडतें आणि अितर सर्व व्यवहारांत त्याला फांटा देण्यांत येतो.

## [६] आपल्या देशाची गोष्ट

आज मी तुमच्यासमोर आपल्या देशासंबधींच बोलण्यासाठी आलों. म्हणजे मी या देशाच्या चारहि बाजूंना चीनची भिंत उभी करीत आहे असें नव्हे. माझा आशय एवढाच की, या देशाचे कांही खास प्रश्न आहेत आणि ते सोडविण्याची जबाबदारी आपली आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञानाची मदत आम्हांला घ्यावी लागेल, पण ही मदत घेण्यांत वैज्ञानिक दृष्टि असली पाहिजे.

## [७] विज्ञानाचें कार्य

आमचें जीवन आनंदमय आणि रुचकर बनविणें हें विज्ञानाचें कार्य आहे. जीवन सुलभ आणि सोपें करून दिलें म्हणजे तें नेहमी सुखमयच होते असें नाही. ज्याचे दांत पडले आहेत त्याला विडा कांडून देण्यांत आम्ही मदत करूं, पण ज्याला दांत आहेत त्याची विडा चावण्याची यातायात वांचविणें हें विज्ञानाचें कार्य नव्हे. विज्ञान असें करील तर जीवनाला तें साधक होण्याऐवजी तें बाधकच होईल. चालणे, पाहणे, खाणे, पिणे इत्यादि शरीराच्या सहज क्रिया विज्ञानाच्या प्रभावाने उपकरण नी व्हावयाला लागल्या तर जीवनच निःशेष होऊन जाईल. विज्ञानाने आमची चालण्याची शक्ति कायम ठेवून ती वाढविली पाहिजे. डोळ्याची शक्ति कायम ठेवून ती वाढविली पाहिजे. तुम्ही डॉक्टरी विद्या शिकत आहांत तुमच्या विद्येने शरीर-बल वाढविण्याऐवजी तें जर कमीच होत असेल तर ती विद्या काय कामाची ? असल्या विद्येचें कौतुक कोण करणार ? विज्ञानाने आमच्या सर्व शक्ति कायम ठेवून त्या वाढवावयाला पाहिजेत. माणसांना मिळून मिसळून गोडीगुलाबीने राहण्याची कला विज्ञानाने शिकविली पाहिजे तथापि आज याच्या उलट प्रकार होत आहे. जीवनाचीं व मानवतेचीं मूल्यें आज नष्ट झालीं आहेत. त्याची प्रतिष्ठा पण धर्माच्या योगाने अशक्य सिद्ध झाली आहे. जो धर्म मानवतेचीं नैतिक मूल्यें कायम

करावयास असमर्थ ठरतो तो माणसांना भ्रमांत टाकतो. त्यांचा बुद्धिनाश करतो. असला धर्म खरोखरच अफूच्या गोळीसारखा आहे. समाजाचें संजीवन त्याच्याने होणार नाही. विज्ञानाचीहि गत तीच आहे. मानवतेच्या किंवा नैतिकतेच्या अधिष्ठानाच्या अभावी हें विज्ञान माणसाला हैवान बनविल्याशिवाय राहणार नाही.

## [८] तरुणांकडून आशा

या मूल्यांची प्राणप्रतिष्ठा करणें हें तरुणांचे काम आहे. मला या ठिकाणीं रोमारोलांच्या एका सुंदर वाक्याची आठवण येते. ते म्हणतात, "you are the hope of the world, the seed of the future classless society of all hamanity— a society without exploitation of man by man, without frontiers between the states, without hatred between races and people."

(तुम्ही म्हणजे जगाची आशा. ज्या समाजांत आपल्या स्वार्थासाठी माणूस माणसाचें शोषण करणार नाही, ज्यांत राज्या राज्यांच्या सीमा उरणार नाहीत, ज्यांत राष्ट्र व जाति यांच्यांत द्वेष राहणार नाही अशा अखिल मानवतेचें, वर्गहीन समाजाचें बीजारोपण तुमच्या हातून व्हावयाचें आहे.)

हा आमचा आदर्श आहे. आमच्या आदर्शाला अनुरुप असेंच आमचे उपाय व आमची साधनें राहतील. म्हणूनच सर्वारंभी मी आपल्या उद्देशाचा म्हणजे आपल्या आदर्शाचा किंवा ध्येयाचा उल्लेख केला.

## [९] शुष्क बुद्धिवाद

या आदर्शाच्या सिद्धीसाठीं कोणते गुण अंगीं बाणले पाहिजेत हे पाहावयाचें. सर्व प्रथम बुद्धिनिष्ठेची आवश्यकता आहे. ही कोरडी मात्र नको ! शुष्क बुद्धिनिष्ठा, निर्जीव, रूक्ष निष्ठूर होऊ शकेल. जीवन स्मशानवत् किंवा वाळवंटासारखेहि बनूं शकेल. शुष्क बुद्धिनिष्ठा कधी कधी

माणसाला कोरड्या तर्काच्या फेऱ्यांत अडकवून त्याच्या विचारांना अप्रतिष्ठित आणि निरुपयोगीहि करून टाकते. कांही भावना अशा आहेत की, ज्यांना आम्ही मानवतेसाठी प्राथमिक मूलभूत म्हणून मानलें आहे. विज्ञान आणि बुद्धि यांच्या तर्कावर त्या सिद्ध होऊं शकत नाही. पुरुषाने आपल्या मातेबरोबर यौन संबंध का ठेऊं नये ? भौतिक विज्ञानाजवळ याचें काय उत्तर आहे. सुप्रजा–जननाच्या बाबतींत शास्त्र स्थिर असें नाही. कांही म्हणतात, In and in breeding ( प्रजनन आंतल्या आंत असावे; कांही म्हणतात Out and out breeding तें बाहेर–बाहेर असावें ) हीं दोन्ही टोकें आत्यांतिक आहे. सख्ख्या बहीण–भावडाची लग्नें कां होऊं नयेत या प्रश्नाचें तार्किक किंवा वैज्ञानिक उत्तर अजून सांपडलें नाही. तसेच एका माणसाने दुसऱ्याला कां खाऊं नये ? याचेंही उत्तर निव्वळ तर्काच्या किंवा विज्ञानाच्या आधरें देतां येत नाही. सामाजिकतेच्या आधाराने मात्र या प्रश्नाचें उत्तर देतां येईल. पण समाजविज्ञानाला आधरभूत असलेली सामाजिकता भावनात्मक देखील आहे. म्हणून मला असें म्हणावयाचें आहे की, तुम्ही बुद्धिनिष्ठ बनावें, तुमची बुद्धि कुशाग्र असावी आणि त्यासोबत तुमचें ह्रदयहि भावनासंपन्न असावे.

## [१०] आत्मीयतेची व अहंमतेची भावना

माणसामाणसांत आत्मीयता निर्माण करायला, त्यांच्या सुखदुःखांत सहभागी बनायला भावना शिकवी। असते. एका इंग्रज लेखकाने म्हटलें आहे, " While there is alower class, I am in it While there is a criminal element I am of it, and while there is a soul in prison, I am not free. "

( समाजतांत जोंवर दलितवर्ग आहे, तोंवर मी त्यांतला आहे; अपराधी आहेत तोंवर मी त्यांच्यांतला आहे; आणि जोंवर अेक जरी माणूस बंधनांनी जखडला आहे तोंवर मी देखील स्वतंत्र नाही. )

हा मानवतेचा व्यथित आवाज आहे. दलितां बद्दल, अपराध्यां बद्दल गुलामगिरीबद्दल आपलेपणाच्या अनुभूतीचें,साधुतेचें हें अनन्य लक्षण होय. " मोसम कौन कुटिलखल कामी," असें ओरडून सांगणारा आत्मा साधूचा होता. क्रांतिनिष्ठ तरूणांच्या भूमिकेंत हा साधुतेचा सुगंधहि असला पाहिजे. कुणाबद्दलहि त्याच्या मनांत तिरस्कार, तिटकारा असतां कामा नये. कारण ही आढ्यतेची भावना, अस्पृश्यतेला कारणीभूत होते. ही अस्पृश्यभावना आपल्याला आपल्या भावाच्या दुबळेपणाचा, अज्ञानाचा फायदा घ्यायला लावते, अहंनिष्ठ बुद्धिवादांतून प्रभुत्वाची भावना उत्पन्न होतें तर विनयाच्या आत्मीयतेंतून विश्वकुटुंबनिष्ठेचा उदय होतो.

## [११] मंदिर आणि बाजार

आमच्या आजच्या सामाजिक जीवनांत दोन गोष्टींचा प्रभाव दिसून येतो. एक मंदिर आणि दुसरें बाजार. मनुष्याच्या दैनंदिन व्यवसायाशीं अथवा एक दुसऱ्याशी होणाऱ्या वर्तनाशी मंदिराचा मुळींसुद्धा संबंध राहिलेला नाही. त्यांत बाजाराचाच प्रभाव दिसून येतो. या वृत्तींत माणसाची एकच दृष्टि असते आणि ती म्हणजे पोटाची ! त्याच्या शरीराच्या सर्व अवयवांत पोटच प्रधान असते. इतर सर्व अवयव गौण, पोटाचे दास असे असतात. आपली नीति सांगणारा इसम हा अत्यंत चतुर तत्वज्ञ होता. लोक-चरित्राचा आणि लोक-जीवनाचा तो ज्ञाता होता. त्याचें निवेदनचातुर्य अलौकिक होतें. जीवनाचें सिद्धांत आणि व्यवहारांतील नैतिक तत्वें मोठ्या चतुराईने सुबोध, सुंदर भाषेंत, छोट्या छोट्या कहाण्यांच्या रुपाने त्याने सांगून ठेवलीं आहेत. त्याची शैलीच अपूर्व ! त्याने पोटांवर लिहिलेली गोष्ट प्रसिद्धच आहे. पोट शरीराचा एक महत्वपूर्ण अवयव आहे. माणसाचा आहार व पचनक्रिया चांगली असली म्हणजे शरीराचे व्यापार चांगले चालतात .मनुष्य खाल्यावाचून जगूं शकत नाही. पण बहुधा असें होतें, की मनुष्य खाण्यासाठी म्हणूनच जगूं लागतो. त्याचें पोट हें त्याच्या व्यवहाराचें केंद्र बनतें. त्याची इतर सर्व इंद्रियें पोटाच्या उपासक म्हणून असतात. आज पोटपूजेस प्रतिष्ठा आहे. सामूहिक पोटपूजक

बनलेला आहे. भांडवलशाहीचा हा अनिवार्य परिणाम आहे. एका टोंकाला नखेबाजी तर दुसऱ्या टोंकाला लाचारी आणि कंगाली! उदर दर्शनाच्या म्हणजे पोट-वादाच्या ह्या दोन बाजू आहेत.

## [१२] एकांगी विशेषज्ञता

ही एकांगी वृत्ति विज्ञानाच्या क्षेत्रांतहि दिसून येते. या क्षेत्रांतील 'specialization' विशिष्टिकरण म्हणतात. उदर परायणते मुळे मनुष्याने विज्ञानालाहि पोटाचें दास बनविलें. जास्तींत जास्त कमाईच्या दृष्टीनेच त्याने उद्योग व कलेंत प्राविण्य मिळविलें. प्रत्येक मनुष्य आपल्या विशिष्ट उद्योगांत. परिणामतः माणसाच्या जीवनांत कोणत्याहि प्रकारचा अनुबंध राहिला नाही. समग्र अगर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीची कुणाला पर्वाच राहिली नाही. या वस्तुस्थितीचें वर्णन प्रो. सी. ई. एम् जोड याने मोठ्या मजेदार शद्बांत केलें आहे.

'The greek ideal of the fully developed human being with his sound mind and, his sound body, has given place to the bruiser all fist, the film star all face and legs and the athlete all legs, or to the bespectacled scholar incapable alike of knocking in a nail, or digging in the garden.'

मुष्टियुद्ध प्रवीण मल्लाचें जीवन मुष्टीच आहे. कारण मुष्टियुद्धांत कमाल करुन दाखविणें एवढेंच त्याचें उपजीविकेचें साधन आहे. मुष्टियुद्धांस प्रारंभ कसा झाला कुणास ठाऊक, पण आज मात्र तें मनोरंजनाचें आणि उपजीविकेचें साधन होऊन बसलें आहे. अनेक-वर्गीय समाजांत धनिक वर्गासाठी जें साधन मनोरंजनाचें असतें तेंच दुसऱ्या त्याच समाजांतील वर्गाकरितां उदरनिर्वाहाचें साधन होतें. जें एकाचें मनोरंजन तो दुसऱ्याचा धंदा! ज्यांना आपल्या गरजेपेक्षा ज्यास्त मिळतें त्यांच्याकरितां मुष्टियुद्ध किंवा मल्लयुद्ध रंजनाचें साधन होतें. काशींत असेंच घडतें तेथील गंगापुत्रांना आतां-आतांपर्यंत विनासायास पुष्कळ मिष्टान्न मिळत असे. तें पचावितां यावें

म्हणून व्यायाम हवाच ! मग त्यांत शौक आलाच ! शरद–पौर्णिमेच्या दिवशी गंगेच्या घाटावर मुष्टियुद्ध होऊं लागलें. दोन टोळ्या आपआपसांत हा खेळ खेळूं लागल्या. सामना मोठा अद्भूत् व्हावयाचा ! पुढें कालांतराने मुष्टियुद्ध हा कांही लोकांचा धंदाच झाला. हीच दशा पहेलवान व खेळाडू यांची झाली. पळण्याच्या कलेंत नैपुण्य मिळवूं इच्छिणाऱ्याकरितां एका पाया खेरीज इतर सर्व अवयव गौण बनलें. नाटक हें प्रेक्षकाकरितां जरी मनोरंजनाचें साधन असलें तरी नटनटींकरितां मात्र तें उपजीविकेचें साधन आहे. त्यासाठी सुंदर रुप व सुंदर पाय यावरच नटनटींचा भर ! तात्पर्य, मुष्टिमल्ल मुठीपुरताच राहिला म्हणजे तो मूठच झाला. नटनटी म्हणजे रूप व पाय. पहेलवान म्हणजे शक्ति; आणि आजचा सुशिक्षित म्हणजे चष्मा धारण करणारा बाबू, त्यांच्यांत जमीन खणण्याची किंवा खिळा ठोकण्याचीहि शक्ति व कौशल्य राहिलें नाही. या प्रकारे उदयपरायणतेने विज्ञानाला जीविकेचा दास बनविले. आणि मग त्यांतूनच विशेषज्ञतेच्या कल्पनेचा उदय झाला.

## [१३] अनुबंधाचा अभाव

याचा परिणाम असा झाला कीं, माणसाच्या ठिकाणीं असलेल्या विशिष्ट विद्येचा किंवा कलेचा सामाजिक जीवनाशीं कोणत्याहि प्रकारें अनुबंध राहिला नाही. व्यक्तिगत जीवनांतील निरनिराळ्या कामामध्ये देखील परस्पर संबंध राहिला नाही. जीवनांतील सर्व क्रियांचे व्यापार स्वतंत्रपणे होऊं लागले. एकाग्रतेचीं सूत्रें खऱ्या अर्थानें एकाग्रतेचीं न राहातां एकांगितेचीं सूत्रें बनलीं. ‘Work while you work, play While you play,’ (काम करतानां कामच करा; आणि खेळतांना फक्त खेळाच म्हणजे काम कराल तेव्हा खेळूं नका आणि खेळाल तेव्हा काम करुं नका, या प्रकारे खेळ व काम हे दोन परस्पर विरोधी व्यापार बनले. त्यांत कोणत्याहि प्रकारची एकता ( Unity ) अथवा समग्रता ( Integrity ) अथवा संवादित्व ( Harmony ) राहिलें नाही.

## [१४] रशियाचा प्रयोग

मनुष्याचें आर्थिक जीवन आणि त्याचें सामाजिक जीवन व जबाबदाऱ्या यांत परस्पर मेळ घालण्याचा प्रयत्न आधुनिक काळांत कार्लमार्क्सने सर्वप्रथम केला. त्याच्या पूर्वीच्या आर्थिक जीवनांत सर्वत्र अराजकता व अव्यवस्था माजली होती. आज रशियांत polytechnization म्हणजे सर्वांगीण वैज्ञानिकतेचा उपक्रम सुरू झाला आहे. त्याचा उद्देश आर्थिक जीवनांत अनुबंध व समग्रतेची तत्त्वें दाखल करणें हा आहे. आमच्या आर्थिक प्रवृत्तींत सामाजिक हेतु व सामाजिक प्रेरणा राहून सामाजिक आवश्यकतेशी तिचा संबंध असला की आम्हांला संतोष होईल असें नाही. आमच्या भिन्न भिन्न प्रवृत्तींत परस्पर अनुबंध व समग्रतेचा भाव राहणें आवश्यक आहे. रशियांत जें शिक्षण दिलें जातें, त्यांत प्रत्येक विद्या व कला समग्र जीवनाचा एक भाग आहे 'As part of a whole' ही दृष्टि ठेवली जाते.

## [१५] वर्गनिष्ठ नीति

रशियाचा प्रयोग आमच्याकरितां मार्गदर्शक होऊं शकतो, परंतु त्याचें संपूर्ण अनुकरण मात्र होऊं शकत नाही. या देशांत आपण संक्रमणावस्थेंत आहोंत. आमचीं आर्थिक व नैतिक मूल्यें अजून वर्गनिष्ठच आहेत. भिन्न भिन्न वर्गांकरितां म्हणूनच सदाचाराच्या कसोट्याही वेगवेगळ्या आहेत. कांही उदाहरणें देऊन माझें म्हणणें स्पष्ट करतां येईल.

## [१६] एक दोन उदाहरणें

कांही दिवसांपूर्वी वर्धा तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष एक व्यापारी होते. एक वकील त्यांच्या विरुद्ध तक्रार घेउन आले. त्यांची तक्रार अशी होती की, "सध्याचे अध्यक्ष दुकानदारींत खोटेपणा व लबाडी करतात. तेव्हा अशा माणसानें कॉंग्रेसचे अध्यक्ष राहणें योग्य नाही. एखाद्या शिकल्या सवरल्या माणसाला अध्यक्ष केल्यास कॉंग्रेसची सचाई व दानत वाढेल."

मी त्यांना म्हटलें, "ते दुकानदारींत जर लबाडी करतात तर तुमच्या वकीलींत काय कमी लबाडी असते? तुम्ही कित्येक खोट्या मुकदम्यांची वकीली करतां तें?"

वकीलसाहेब म्हणाले, 'अहो, त्याला काय हरकत आहे? ही आमची Professional morality (व्यवसायिक नीतिमत्ता) आहे. आमच्या धंद्यांत ही शिष्टसंमत आहे. आम्ही खोटा मुकदमा जरी घेतला तरी आमच्या पक्षकाराबरोबर कसलीही दगाबाजी करीत नाही. This is our profe-ssinal honesty (ही आमची व्यावसायिक सदाचार नीति आहे.)"

मी म्हटलें आमच्या अध्यक्षांची देखील एक सौदागरनीति आहे. दुकानदारींत जी नीति रुढ झाली आहे, तिचेंच अनुसरण आमचें अध्यक्षही करतात."

ज्या समाजांत वर्ग असतात, त्या समाजांत नीतीच्या मर्यादाहि वेगवेगळ्या असतात. एका डॉक्टरांनीहि अशीच एक तक्रार आणली होती. एकदा रात्रीं डॉक्टर स्टेशनांवर आगगाडींतून उतरले, रात्र अंधारी होती. अंधार मी म्हणत होता. पावसाचीहि झड होती, डॉक्टर एक टांगा ठरवूं लागले. टांगेवाला अव्वाचे सव्वा दाम म्हणूं लागला. डॉक्टर चीडून म्हणाले, "हे टांगेवाले मोठे मूर्ख व बे मुर्वतखोर असतात. दुसऱ्याच्या अडचणीचा गैरफायदा घेऊं इच्छितात.

मी त्यांना म्हणालों की, "या टांगेवाल्यांच्या जातीचे लोक तुम्हां डॉक्टरांत देखील कांही कमी नाहीत. आजार जितका अधिक असेल आणि गरज जितकी जास्त असेल तितकी फी डॉक्टर जास्त मागतो. हा दुसऱ्याच्या अडचणीचा गैर फायदा नव्हे काय? पुष्कळशा लहानलहान गावांतून एखाद–दुसरी डॉक्टरीन असते. कधी कधी बाळंतीण अडली तर ऐन प्रसंगी पांच–पांचशे रूपये देखील मागते. नाइलाजाने पैसे तर दिले जातात पण गांवच्या स्त्रीया डॉक्टरीनला शिव्या शाप देत राहतात. म्हणतात, "या मटवीचें लग्न झालें नसेल! हिला प्रसूतीच्या वेदना काय ठाऊक!" सांप्रतच्या आर्थिक व्यवस्थेतील हा एक अनिवार्य असा दोष आहे. एकाचें नुकसान हाच दुसऱ्याचा फायदा! एकाचे संकट ते दुसऱ्याचे

सुयोग! वकील काय, सर्वच एक दुसऱ्याच्या अडचणीचा फायदा घेतात. यांत छोट्या मोठ्यांचा भेद नाही. प्रसंग पाहून टांगेवाला आणि व्यापारी जर अडून बसत असेल तर डॉक्टर आणि वकीलही कांही कमी करीत नाहीत!

## [१७] व्यक्तिवादाचा उदय

खरी गोष्ट अशी आहे की, वर्गव्यवस्थेमुळे सगळीं नैतिक मूल्यें कनिष्ट झालीं आहेत. व्यक्ति स्वातंत्र्यवादाचा जन्म याच व्यवस्थेंतून झाला. प्रत्येकाला आपल्या फायद्यासाठीं आपल्या शक्तीचा उपयोग करण्याचें स्वातंत्र्य मिळालें. परिणाम असा झाला कीं, दरेक आप आपल्या पुरताच जगूं लागला. दुसऱ्याची दखल घेईनासा झाला 'Each one for himself and devil for the rest', असल्या प्रकारच्या व्यक्तिवादामुळे आमचीं नैतिक मूल्यें व्यक्तिनिष्ट व अहंनिष्ट झालीं. स्वतः करितां वेगळी नीति आणि इतरांसाठीं वेगळी नीति अशी स्थिति झाली.

## [१८] धर्म आणि जीवन यांत विच्छेद.

धार्मिक जीवनांवरहि याचा परिणाम झाला. 'माझें' व 'तुझें' चा सुळसुळाट माजला. माझा तो धर्म व दुसऱ्याचा तो अधर्म असा त्यांतून भेद उत्पन्न झाला व आर्थिक जीवनाशीं धर्माचा संबंध नांवापुरताच उरला. जीवनाचा समतोलपणा नष्ट व्हावयाला सुरवात झाली. मंदिरासाठी जे नियम व व्यवहार उपयुक्त मानल्या गेलें ते बाजारासाठीं तेवढेच टाकाऊ ठरले. ह्या दुटप्पी नैतिकतेंतून पश्चिमकडे Christianity व Churchanity हा भेद उत्पन्न झाला. Churchanity फक्त Church मध्यें बंदिस्त असते. बाहेरच्या हवेचा संपर्क तिला लागत नाही. बाहेरची हवा तिला मानवत नाहीं आपल्याकडे देखील सिध्दांत आणि व्यवहार म्हणजे धर्मकारण व अर्थकारण याची विसंगति समजावून सांगण्यासाठी धर्मशास्त्र्यांनी, दार्शनिकांनी दोन सत्ता कल्पिल्या. पहिली पारमार्थिक दुसरी व्यवहारिक. एकीला जें लागू तें दुसरीला नाही. परमार्थाच्या पातळीवरुन

आत्मदृष्टीने भूतमात्र आत्मवत् आहे. पण व्यवहारिक भूमिकेवरून शरीर भेदामुळे उच्च–नीच, श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद आहे. परिणाम असा झाला की जो दार्शनिक अगर साधु असेल तो व्यवहाचतुर समजला जात नाही. धन मिळविण्यासाठी ज्या प्रकारच्या व्यवहार कुशलतेची गरज आहे तिच्यामुळे कधी कधी मनुष्याच्या धार्मिक वृत्तींवर आघात होतो तथापि ही वेदना कमी व्हावी म्हणून मनुष्य आपला धर्म मशीद. मंदिर किंवा चर्च यांत सुरक्षित ठेवतो. लढाईच्या मैदानांवर किंवा बाजरांतील चव्हाट्यावर त्याला फटकूं देत नाही.

या प्रकारच्या शोषणाने मानवतेचा जो ऱ्हास होतो त्याकडे धर्म डोळेझांक करतो व अप्रत्यक्षपणे त्याला संमति देतो. असल्या धर्माचा मानवता प्रेरित क्रांतिकारकांनी विरोध करून, ते म्हणूं लागले की, अशा प्रकारचा हा धर्म माणसाचा संहारच करील. त्यांचें म्हणणें शंभर टक्के खरें आहे.

सारांश, आज मानवाला सुखी करण्याच्या कामीं धर्म व विज्ञान असफल ठरलें. समाजामधून शोषण जर कायमचें बंद करावयाचें असेल तर त्यासाठी आजच्या तरूणतरूणींनी या विषयाचा मूलगामी विचार केला पाहिजे. नुसता निषेध किंवा धिःकार करून हें होणार नाही.

## [१९] रशियाचा मोठेपणा

सांप्रदायिक टीकाकारांचें म्हणणें कांही जरी असलें तरी माझी अशी समजूत आहे की आमच्या या चालू जमान्यांत रशियानेंच फक्त मंदीर व बाजार, धर्म व अर्थ सिद्धांत व व्यवहार यांत अविरोध स्थापन करण्याचा सर्वप्रथम केला. रशिया विषयीं या मुळेच माझ्या मनांत मोठा आदरभाव आहे, विज्ञानाच्या असफलतेंतून वर उठण्याचा प्रयत्न रशिया अत्यंत तन्मयतेने व मनापासून करीत आहे. मंदिरांत बंद करून ठेवलल्या निर्जीव धार्मिकते-ऐवजी सामाजिकतेंची नवीन प्राणवान मूल्यें कायम करण्याचा रशिया प्रयत्न करीत आहे. पण त्याला अजून यश मिळालें नाही. याचें कारण उघड आहे. वातावरण जेव्हा युद्धाने दुमदुमत असते तेव्हा सबंध सामाजिक

जीवनांत युद्ध हीच प्रधान वृत्ति बनून जाते सर्व कार्य शक्ति युद्धासाठी अय्यत तयार राहण्यांतच खर्च होऊन जाते. युद्धाला अमुक एक गोष्ट किती उपयोगी आहे हें पाहून त्या गोष्टीची किंमत ठरविली जाते. आज युरोपाची गोष्ट तशीच आहे. शिवाय केवळ एका देशांत समाजवादी सिद्धांत अमलांत आणणें तितकेंसे संभवनीय नसते. रशियाची स्थिति आज कांही अशी अशीच आहे,

## [२०] पहिलें पाऊल टाकण्याची हिंमत

तर मग जोंवर सर्वच देश युद्धाचा त्याग करीत नाहीत तोंपर्यंत युद्ध-विरोधाचा उपक्रम शक्यच नाही म्हणायाचा! आणि त्या दिशेने होणारे सर्व प्रयत्न शेवटी निरर्थकच ठरावयाचे ?

पण वस्तुस्थिति तशी नाही. रशियाने जसा एका क्षेत्रांत सर्वप्रथम आरंभ केला तसा कुणाला तरी निःशस्त्रीकरणाच्या दिशेने पुढाकार घ्यावा लागेल. लेनिनच्या वेळेला मार्क्सवादी म्हणत असत की, केवळ एकाच देशांत समाजवादाची स्थापना होऊंच शकत नाही. परंतु आता स्टॅलीनच्या वेळीं लोक असे आग्रहाने म्हणूं लागले की एका देशांत सुद्धां समाजवादाची स्थापना होऊं शकते व ती केली पाहिजे. ज्या देशांतील परिस्थिति जरूर तेवढी परिपक्व होते तो देश चट्‌कन् समाजवादी होऊं शकतो. इतर देशांत क्रांतीसाठी थांबावें लागतं. क्रांति एका देशांतूनदुसऱ्या देशांत नेतां येत नाही असें स्टॅलीन म्हणतो तो याच अर्थाने.

## [२१] देशकाल वर्तमान

उदाहरणादाखल मी रशियाचा निर्देश केला. क्रांति साठी विवेकाची गरज आहे हें समजावून घेण्यासाठी सुद्धां हें उदाहरण लागूं पडते. त्यांच्या सिद्धांताच्या विनियोगाची पद्धति देशकाल वर्तमानाप्रमाणे वेगवेगळी असते. देशादेशाची परिस्थिति सारखीच असत नाही. त्याचे प्रश्न, त्यांना उपलब्ध असलेलीं साधनें हीं देखील भिन्न भिन्न असतात. क्रांतीचे सिद्धांत लागूं करण्यासाठी या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो.

## [२२] परशुराम–न्याय

आपल्या देशाच्या सांप्रतच्या परिस्थितींवर जों जों मी विचार करतो, तों तों माझी बेचैनी वाढत जाते. ज्याला या देशाचें स्वातंत्र्य नको आहे, सुखसमृद्धि नको आहे, असा एकहि मनुष्य सांपडणार नाही. हा देश, अविभाजित, अखंड एक राहावा असें सुद्धा आपल्याला वाटते. आज पूर्वीपेक्षा ही गोष्ट सोपी वाटायला हवी होती. कारण जनतेचेप्रतिनिधि हे राज्यकारभार चालवीत आहे. पण आज आपण काय पाहातो. सर्वत्र अशांति, अव्यवस्था, रामराज्याच्या सुरुवातीलाच दडप्रयोग! आपल्या पुराणांत रामराज्यापूर्वी परशुरामाचा अवतार झाला होता. त्या काळीं युद्ध–प्रवृत्ति अत्यंत प्रबळ झाली होती. युद्धवादामुळे मानवतेची क्षति झाली होती. परशुरामाला वाटलें या क्षत्रियांमुळेच युद्धें होतात. त्याने पृथ्वी एकवीस वेळा निःक्षत्रिय केली. म्हणजे एकदां ती पूर्णपणे निःक्षत्रिय होऊं शकली नाहीं. जर पहिल्याच वेळी निःक्षत्रिय झाली असती तर पुनः प्रयत्नाचें कारण उरलें नसतें. या एकवीस वेळां प्रयत्न करण्याचा परिणाम असा झाला की, परशुरामच स्वतः युद्ध–परायण, क्षत्रिय–रूप असा झाला. क्षत्रियांच्या साधनाने त्यांचा चीमोड करतांना तो स्वतःच तद्रूप व तदाकार झाला आणि शस्त्र प्रयोगाने शस्त्रवादाचा अंत होऊं शकत नाही हा धडा आम्हांला मिळाला.

## [२३] कॉंग्रेसची नीति

आज हा प्रश्न अत्यंत भीतिदायक स्वरूपांत आमच्या समोर उभा आहे. कॉंग्रेसने शासनाची जबाबदारी स्वीकारली आहे. शांति, संरक्षण, सुव्यवस्था हें तिचें आद्यकर्तव्य झालें आहे. तिच्या धोरणांवर व नीतीवर टीका करुन आज देशापुढील प्रश्न सुटणार नाहीत. प्रश्न असा आहे की, आजच्या परिस्थितींत कोणत्याहि सरकारने काय करावे? राज्य चालवावे कीं दूर व्हावे? मुस्लिम लीग आणि डिप्रेस्ड् क्लास फेडरेशन यांची जिद्द पेटलेली आहे. कॉंग्रेसला शासन अशक्य करून सोडण्याचा निर्धार केलेला आहे. कारण कॉंग्रेसने एक–दोन वर्षं सफलतेने राज्य केलें तर इंग्रजी राज्याबरोबर आपलाहि शेवट होईल हें ते पुरतेपणी जाणून आहेत.

म्हणून ते इरतऱ्हेने कॉंग्रेसला गादीखालीं ओढूं इच्छितात. या उलट इंग्रजी राज्याचा नाश व्हावा असें ज्यांना वाटते, त्यांना कॉंग्रेसला सुरळीत पणें व सफलतापूर्वक शासन करतां यावें म्हणून काळजी लागली आहे. आजच्या स्थितींत शांतता नांदावी म्हणून कॉंग्रेसचे हटाताटाचे प्रयत्न चालू आहेत. यबाबतींत तिने हिंसे–अहिंसेचा विधिनिषेध मानला नाही.

## [२४] हिंसेची प्रवृत्ति

हिंसा निष्णात नसली तर ती कार्यक्षम व सफल होत नाही. हें तिचें वैशिष्ठ्य आहे. सफल हिंसेसाठी शीघ्रता व दृढता पाहिजे. पुढे या दृढतेचें पर्यवसान कठोरतेंत व कठोरतेचें निर्दयतेंत होत जातें. सहृदय सरकार याबाबतीत संयमपूर्वक वागूं शकतें परंतु अलिप्त मात्र कोणतेंच सरकार राहूं शकत नाही. सांप्रतपरिस्थितींत कॉंग्रेस सरकार जे कठोर उपाय अमलांत आणीत आहे त्याबद्दल आम्हाला खेद व विषाद वाटला तरी त्यांचा विरोध करण्याचीहि शक्ति आमच्यांत नाही. एक मात्र आम्हांला पुरतेपणीं ठाऊक आहे की, कडक उपायांनी व जबरीने सरकार शांतता प्रस्थापित करूं शकलें तरी सांप्रतचे प्रश्न मात्र सुटणार नाहीत.

## [२५] क्रांतिनिष्ठ बुद्धिमत्ता

हे प्रश्न सोडविण्याचे काम क्रांतीची दीक्षा घेतलेल्या बुद्धिनिष्ठ तरुणांचें आहे. प्रश्न सोपे नाहीत. दुसऱ्या देशाच्या अनुकरणाणने ते सुटणार नाहीत. एका देशांतील परिस्थिति दुसऱ्या देशांतील परिस्थितीं वर हुकूम असती तर स्वतंत्र बुद्धीची, विचारशीलतेची किंवा मौलिकतेची गरज पडली नसती. आज आपल्या पुढील प्रश्न निव्वळ शांति कायम करण्याचा नसून एक राष्ट्रीयत्वाच्या विकासाचाहि आहे. सरकार शांति स्थापन करूं शकते. एक राष्ट्रीयत्वाच्या विकासासाठी ती पोषकहि ठरूं शकते. तथापि कोणतेंहि सरकार झालें तरी तें भिन्न भिन्न लोकांत सख्य वाढवून त्यांना गुण्यागोविंदाने वागायला लावूं शकत नाही. सरकार सर्व प्रकारची सोय करुन देऊं शकते. त्यांचें काम एक प्रकारचें निषेधात्मक आहे

विधायक नव्हे ! हीच नीति क्रांतिकारक पक्षाने अवलंबिल्यास आम्हेला जागाच उरत नाही. आपलें सरकार असल्यास आपण त्याला शक्य ती मदत करूं. त्याचें सामर्थ्य व कार्यक्षमता आपल्यामुळे कमी होणार नाही असें आपण करूं. परंतु सद्भावना व पुरुषार्थ गाजवून समाजक्रांतीची भूमिका मात्र आपल्यालाच निर्माण करावी लागेल. शासन हातांत आल्या बरोबर आपोआप क्रांति घडते असें नाही. क्रांतीची भूमिका तयार करण्या-साठी प्रस्तुत प्रश्न सोडविलें पाहिजेत. अंबेडकराईट विघ्नसंतोषी आहेत, लीगवाले खोडसाळ आहेत, गुंड आहेत असे केवळ ताशेरे झाडून काम भागणार नाही. शिव्या शापाने कांही साधलें आहे काय !

## [२६] गुंड कोणी स्वतंत्र प्राणी नाही।

दंगेधोपे केवळ गुंड करतात असें म्हटल्याने काय साधणार आहे ! आणि हे इतके गुंड एकदम आले तरी कुठून? हे काय आकाशांतून पडलेत! आजचा काळ सत्तासंक्रमणाचा आहे. आपलें अधिराज्य असावें अशी प्रत्येक गटाला काळजी लागली आहे गुंड–राज्याची जर स्थापना होऊं द्यावयाची नसेल तर आपल्याला समाजांत सभ्यतेची व शिष्ठतेची प्रतिष्ठा वाढवावी लागेल.

आजच्या प्रश्नाचें स्वरूप हिंसे अहिंसेचें तितकेसें नसून सभ्य–असभ्य-तेचें आहे. हिंसेंत सुद्धा सभ्यता व शिष्ठता असते. तिला आपण वीरता व क्षात्रवृत्ति म्हणतो. पूर्वकाळांत वीर पुरुषांमध्ये जेव्हा द्वंद्व युद्ध अगर सेना-युद्ध होत असे, तेव्हा दोन्ही पक्षाचे योद्धे लढण्यापूर्वी प्रतिपक्षाला स्वतःच्या भूमिकेवर आणीत. विरोधी झोंपला असेल तर त्याला जागें करीत. निःशस्त्र असला तर त्याला शस्त्र देत. गैरसावध असला तर सावध करीत. प्रतिपक्षाला गैरसावध असतांना ठार करणाऱ्याला, झोंपेंत असतांना मारणाऱ्याला अथवा असभ्य शिव्या देणाऱ्याला कुणी वीर पुरुष म्हणत नाही! हिंसेला सुद्धा शिष्ठतेची मर्यादा असते.

## [२७] आमची अमानुषता व विवशता।

आज आपल्या देशांत सभ्यपणे जगणें अशक्य झालें आहे. आपली स्थिति हैवानापेक्षा व राक्षसापेक्षाहि वाईट झाली आहे. या प्रांतांत गुंडा-

बील मंजूर झालें तेव्हा मला फार यातना झाल्या. परंतु हा दुबळ्याचा क्रोध आहे. माझ्यामध्ये किंवा माझ्या विचारांच्या लोकांमध्ये गुंडा-बिलाची गरज राहूं नये अशी परिस्थिति निर्माण करण्याची ताकद आहे काय? बिलाच्या वेळीं विरोधी पक्षाच्या सदस्यानें विचारलें, "आपल्या देशांवर परदेशाचें आक्रमण होत आहे काय? जर्मन किंवा जपान चालून येत आहे काय? सरकारला या बिलाची कां गरज वाटावी? या बिलाच्या मागची परिस्थिति मला माहित आहे. गुंडा-बिल पास झाल्यामुळे मला दुःख झालें. आपल्या सरकारला तें बिल निरुपायास्तव आणावें लागलें हें मी जाणतों. पण इतकें असून देखील विरोधी पक्षाचा एकहि आक्षेप पटण्यासारखा नव्हता. आज परकीय आक्रमणाचें भय नाही. विदेशी आक्रमणांत जीवित आणि वित्त धोक्यांत असतें, गावेची गावें उजाड होतात, दवाखान्यांवर बॉम्बगोळे टाकले जातात. विद्येचीं आणि ग्रंथांचीं मंदिरें जमीन दोस्त केलीं जातात. पण त्या परिस्थितींत देखील मनुष्य शिष्टतापूर्वक व सभ्यतापूर्वक जगूं शकतो. भय परक्यांचें असते. स्वजनापासून भय नसतें. स्वजनांचें म्हणजे आपसांतलें भय जिंदगी हराम करून टाकतें. या देशांत आज सभ्य माणूस अब्रूनिशी जगूं शकत नाही. त्याच्या आई बहिणी, लेकीसुना, कुणी कुणीहि सुरक्षित नाही. तुमचें-माझें भांडण असेल तर आपण दोन तलवारी घेउन भांडणाचा निकाल लावूं. ही परिस्थिति मला समजूं शकते. परंतु माझ्या भांडणासाठी तुम्ही माझ्या निरपराधी मुलीची अब्रू घेतली किंवा मी तुमच्या कोंवळ्या मुलाची निर्दयपणे कत्तल केली आणि असें महिनोंगणती चालू राहिलें तर कोणतें सरकार हें बरदास्त करील? अहिंसेच्या मार्गानें प्रतिकार करण्यास हें सरकार समर्थ नसलें तर त्यानें काय हात चोळीत स्वस्थ बसावें? हें भय अल्पकालीन नाही; कारण तें बाहेरचें नाही. आंतल्या भयाला सीमा नसते, मर्यादा नसते, स्थल काल नसतो. सरकार शक्तीच्या उपायांनी परिस्थिति शांत करूं शकतें. पण प्रेमाचें व बंधुत्वाचें वातावरण निर्माण करण्याचें काम मात्र तुमचें माझें आहे. त्यासाठी पुरुषार्थ बरोबर निरपेक्ष मानवप्रेमाची हि गरज आहे. केवळ बुद्धिनिष्ठेनें हें साधणार नाहीं; त्याला भावना संपन्नताहि लागेल.

## [२८] ईंट का जबाब पत्थरसे.

खोलवर विचार न करतां झटपट शारे करूं इच्छिणारे काय तोड सुचवितात याची मला कल्पना आहे. मी आतांच एक दौरा आटपून आलों. एके ठिकाणी एक सज्जन गृहस्थ मला भेटायला आले. त्यांची मनःस्थिति अस्वस्थ व बेचैन होती. ते म्हणाले, " आपण मुसलमानांना दहशत बसविली पाहिजे. ते आम्हांला कांहीं किंमतच देत नाहीत. ते आम्हांला शेळपट भागूबाई समजतात. स्वतःचें व शेजाऱ्याचें रक्षण करून भागणार नाही. ज्या प्रांतांत मुसलमान जास्त आहेत तेथे ते हिंदूवर हल्ला करतील. आपला धर्म व आपल्या स्त्रिया भ्रष्ट करतील, आपलें धन लुटतील. आपल्याला त्यांचा प्रतिकारहि करतां येणार नाही. बरें, जेथे मुसलमान कमी आहेत तेथे ते स्वस्थ राहतील. केवळ आक्रमक धोरण न ठेवलें म्हणजे ते सुरक्षितहि राहतील. कारण आपण फक्त आत्मरक्षणापुरतीच हिंसा करणार. अल्पसंख्य हिंदूचें रक्षण करणें आपलें काम नव्हे काय ? त्या प्रांतांत आपण त्यांचें रक्षण करूं शकत नाही म्हणून आपण बहुसंख्य असलेल्या प्रांतांत मुसलमानांना चांगलें सडकून धडा दिला पाहिजे. म्हणजे दुसऱ्या प्रांतांतील मुसलमान वठणीवर येतील. याठिकाणीं आक्रमणहेंच आत्मरक्षणाचें मोठें साधन आहे. त्यांच्या प्रांतांत ते आम्हांला काफीर समजून बाटवितात, आमच्या बायका पळवितात, त्यांच्याशीं जबरीचीं लग्नें लावतात तर आपणहि आपल्या प्रांतांत त्यांच्यावर हल्ला करूं, त्यांच्या बायका पळवूं, आणि त्यांच्यावर गंगाजळ शिंपडून त्यांच्याशी लग्नें लावूं. त्याची वीट तर आमचा पत्थर ? याशिवाय अन्य उपाय नाही. असेल तर निरर्थक पोकळ वेदान्त आहे तो ! "

## [२९] वाईटाची नक्कल म्हणजे भलाईपणा नव्हे

वरील विधानांत वास्तविकता नाही असें मला वाटत नाहीं. कांही अंशी हें म्हणणें खरें आहे. परंतु त्यांत बुद्धिमत्ता व दूरदर्शित्व नाही. विचारांचा गोंधळहि पुष्कळ आहे. मुसलमानांना दंड्यांने दुरुस्त केलें पाहिजे, असें ते म्हणाले असते तरी हरकत नव्हती. हा उपाय शाश्वत नसला

तरी समजण्याजोगा आहे. परंतु ते तर म्हणतात की, गुंडांच्या प्रतिकारार्थ आपणहि सभ्यतेच्या पोषाखांत गुंड बनलें पाहिजे म्हणजे मुसलमानांच्या दोषांचें अनुकरण करून हिंदूंच्या पोषाखांत वाईट मुसलमान झालें पाहिजे. शिष्टपणाच्या आवरणाखालीं वाईटाची नक्कल प्रत्येक बाबतीत जर झाली, हिंदुत्वाच्या अभिनिवेषाने मुसलमानांच्या दोषांचें अनुकरण जर केलें तर त्यायोगें सत्वरक्षा कशी होणार ? तो भलेपणा मग केवळ नांवापुरताच राहील.

निकड फक्त एका गोष्टीची आहे की, कांही तीव्र उपाय तात्काळ योजणे अवश्य आहे. जमतील तेवढे अहिंसक नाहीतर हिंसक देखील ! सरकार शस्त्र आणि कायद्याचा उपयोग करील. सभ्य लोकांना शौर्याने आणि हत्यारांनी काम भागवावें लागेल पण ही शांतता कांही काळच टिकेल. त्यायोगें समाजक्रांति होणार नाही.

## [३०] वैचारिक भूमिकेंत क्रांति

समाज क्रांतीचा माझा अर्थ असा की, यापुढे कुणी हिंदु आणि कुणी मुसलमान होणार नाही. धार्मिक दृष्टीनेदेखील हा भेद राहूं नये असें मी म्हणेन. तथापि नागरिकतेच्या क्षेत्रांतून जरी हा भेद गेला तरी मला संतोष आहे. यासाठी वैचारिक भूमिकेंत क्रांति घडून आली पाहिजे. तुम्ही शूर व्हा. शस्त्रास्त्र प्रवीण व्हा. माझी हरकत नाही. पण तुमची वैचारिक भूमिका मात्र अजिबात बदलली पाहिजे. तुमच्या या दिवाणखान्यांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा फोटो आहे. तो पाहून मला आनंद झाला. पण हा श्रीकृष्णाचा फोटो कशासाठी? तो एखाद्या विद्यार्थ्याने आपल्या खोलींत खुशाल ठेवावा. त्याची पूजा, अर्चा ध्यान करावे. परंतु विद्यार्थी कॉंग्रेसच्या या सभेंत त्याला स्थान नाही. पण श्रीकृष्णाच्या फोटोचा अपमान करण्याचा जर कुणी प्रयत्न केला तर त्याची प्रतिष्ठा कायम ठेवण्याचें काम आपणासर्वांचें प्रत्येक हिंदूचें, प्रत्येक मुसलमानाचें आहे. त्याचप्रमाणे कुराणाची अप्रतिष्ठादेखील आपणा पैकी कुणालाहि सहन होतां कामा नये. यासाठी आम्हाला आमचें नागरिक–जीवन हिंदुमुसलमानांच्या धार्मिक

भेदांच्या वरच्या पातळींवर आणावें लागेल. आमची धार्मिकता सर्वव्यापक बनवावी लागेल. क्रांतिकारी विचारांत वर्ग-भेद व धर्म भेद नको. असें झाल्यानेच समान नैतिक मूल्यें स्थापन होतील सगळयांसाठी एकमाप, एक कसोटी राहील.

## [३१] अखंड हिंदुस्थानचा वास्तविक अर्थ.

हा खरा अखंड हिंदुस्थानचा अर्थ आहे. अखंड हिंदुस्थान म्हणजे एखादी जड वस्तु अथवा बाह्य अवस्था नव्हे! ती एक वृत्ती, एक मनोभूमिका आहे. आपण परस्परांना दडपून टाकले तर आपण एकत्र राहूं; परंतु भीत भीत साशंक असे. मुसलमान हिंदूंना घाबरतील, हिंदू मुसलमानांना घाबरतील. अखंड भारताचा ढोलाराच तेवढा शिल्लक राहील. त्यांत त्राण, प्राण राहणार नाही.

## [३२] नागरिक-शांतता दलें

म्हणून आत्म रक्षणासाठी तुम्ही पुलिस अगर लष्कर यांच्यावर विसंबून राहूं नये, हें मला सांगावयाचें आहे. आपलें रक्षण आपणच करावें. नागरिक-सैन्य आणि शांतता दलें स्थापन करावींत. या दलांचें स्वरूप प्रतिकारात्मकहि असावे त्यांनी धर्म, संप्रदाय, जात निरपेक्ष भावनेने आपल्या वेटाळाचें रक्षण करावे. आम्ही सर्व संप्रदायाच्या व सर्व जातीच्या लोकांना शूरवीर, धैर्यवान् बनवूं इच्छितो. दुर्बल शेजारी चांगला असें जे मानतात ते चूक करतात. दुर्बल शेजारी सहाय्यक होऊं शकत नाही. उलट त्याचें आपल्यावर ओझें पडतें आपल्या जीवाबरोबर त्याच्याहि जीवाचा भार आपल्यावर पडतो. म्हणून अंमळ बारकाईने विचार केल्यास आपल्याहि लक्षांत येईल की, संपूर्ण शांतता स्थापन करण्याच्या दृष्टीने आपण सर्व अल्प संख्यांक जमातींना सुरक्षित केलें पाहिजे. केवळ शस्त्रधारी होऊन कुणी सुरक्षित होत नाही. शस्त्रधारण हीच सुरक्षिततेची अट असेल तर स्त्रीया कधीच नागरिक होऊं शकत नाहीत. त्या पळविण्याच्या वस्तूच राहतील.

## [३३] पाणी बामणीया

हें एक झालें आणखी अेका क्षेत्रामध्ये आम्हांला आमची वैचारिक भूमिका बदलावी लागेल. तें क्षेत्र म्हणजे हिंदूंचें अंतर्जीवन! हें जीवन देखील जातीयतेच्या भूताने पछाडलेलें असें आहे. मुसलमानांचा प्रश्न सुटला तर 'हिंदु–पाणी' व 'मुसलमान–पाणी' फार तर बंद होईल, पण ब्राह्मण पाण्याचें व अब्राह्मण पाण्याचें काय? गुजराथमधील स्टेशनांवर अजून देखील 'पाणी–बामणीया' असा आवाज ऐकू येतो. पंजाबमधील खाणावळींत 'वैष्णव खाना' मिळतो. आपल्याला नागरिकतेच्या मूल्याशी नैतिक मूल्यांचा अनुबंध साधावा लागेल. धार्मिकता व मानवता ह्यांतील अंतर नाहींसें करावें लागेल. सर्व जाति, धर्म, संप्रदायांच्या लोकांना नागरिकतेच्या नात्याने समान भूमिकेवर आणावे लागेल. बायका पळविणारे ना हिंदू समजले जातील ना मुसलमान! त्यांना धर्मच नाही. धर्म, संस्कृति, सभ्यता सगळ्यांसाठी एक आहे, समान आहे. कुणी स्वधर्माच्य नांवावर लढतो, कुणी स्वसंस्कृतीचे देव्हारे माजवितो, कुणी स्वभाषेच्या नांवावर इतरांशी झगडतात. हीं सगळीं सामाजिक प्रलयाचीं लक्षणें होत, क्रांतीची नाहीत. मी आपणाला अतिशय स्पष्ट रीतीने सांगून ठेवूं इच्छितों की, आगामी काळांत मानवाचा धर्म व संस्कृति एकच एक राहील, अनेक नाही. तिच्यावर कुणा एकट्याची मालकी असणार नाही- सांप्रतच्या धर्मांपैकी एखादा धर्म विश्वधर्म होणार नाही, किंवा विद्यमान संस्कृतिपैकी एक विशिष्ट संस्कृति विश्वसंस्कृतीचें स्थान घेणार नाही. अखिल मानवांचा तो व्यापक धर्म आणि ती विश्वव्यापी संस्कृति आजचे तरुण विकसित करतील; त्यावेळीं एक धर्म राहील, एक संस्कृति राहील, आणि धर्म व संस्कृति यांत अभेद राहील.

## [३४] भाषावादाचें भय

शिक्षणाचें माध्यम मातृभाषा असावें हें माझें मत सर्व विश्रुत आहे. भाषावार प्रांत रचने' ला देखील मी संमति दिली आहे. परंतु या विषयासंबंधी माझ्या मनांत कधी कधी विकल्प उत्पन्न होतो. मला सारखी भीति

वाटतें की, यांतून भाषावादाचा प्रादुर्भाव न होवो. ईश्वराने संवादासाठी भाषा दिली, परंतु तिचा जास्तीत जास्त उपयोग विवादासाठीच केला जात आहे. संवाद प्रेमाला पोषक आहे. विवाद नाशक आहे. इंग्रजींत मला वाटते. लॉर्ड ॲव्हेबरीचें एक वाक्य आहे. "you may gain in argument but lose a friend, which is a very bad bargain in deed." वादांत तुमची सरशी होईल पण मित्र मात्र गमावून बसाल. हा सौदा तोट्याचा आहे. भाषावाद या देशांतील अंतरप्रांतीय व अंतरसांप्रदायीक मित्रभावाला बाधक तर होणार नाही, अशी शंका राहून राहून येते. आतां आपल्या नागपूर विश्वविद्यालयांत मातृभाषेच्या माध्यमाला सुरवात होईल. हिंदी भाषी हिंदींत शिकतील, मराठीवाले मराठींत आणि मुसलमान आपल्या उर्दूचा हेका सोडणार नाहित. आज तिघेहि इंग्रजींत शिकतात आणि एकत्र शिकतात. आतां येथेच पहा. तुम्हां मंडळींत बंगाली मुलें आहेत, मद्रासी व गुजराथी मुलें आहेत. एकाद दुसरा मुसलमान पण आहे. पुढे देखील हेंच दृश्य दिसेल काय?

## [३५] भाषेचें धर्म व संस्कृतीशीं नातें नाही.

तुम्ही विचाराल की, "मातृभाषा आम्ही सोडून द्यावी कीं काय?" मी असें म्हणत नाही. पण आपण सगळ्यांनी मिळून सोडूनच दिली तर मला दुःख होणार नाही, हेंहि तितकेंच खरे. कदाचित् आनंदच होईल. तथापि प्रांतिय भाषा ही आम जनतेची भाषा आहे. लोकांचें शिक्षण आणि लोकराज्य त्यांच्याच भाषेतून होईल. आणखी कांही काळ तरी त्याशिवाय इलाज नाही. परंतु त्यांत प्रांतवाद, जातिवाद व संप्रदाय वाद यांचा दर्प असतां कामा नये. भाषेचा धर्माशी कांही संबंध नाही. संस्कृतीशी देखील खास संबंध नाही. जगांतील सर्व ख्रिस्ती बायबल एकाच भाषेतून थोडेच वाचतात? सर्व मुसलमानांची सर्वत्र बोल-भाषा एकमात्र उर्दूच आहे? दूर कशाला, शेजारचेंच उदाहरण घ्या ना! बलुचिस्थानचा मुसलमान, सरहद्द प्रांतांतील मुसलमान, मलबार मधील मुसलमान हे काय सारे एकच भाषा बोलतात. ज्या पूर्व बंगालमध्ये आज एवढा जोरजुलूम होत आहे,

तेथील मुसलमान तरी उर्दू बोलतात काय ? सबंध यूरोपची संस्कृति एक आहे, पण भाषा भिन्न भिन्न आहेत. धर्म व संस्कृतीशी भाषेचा संबंध जोडणारी ही विचारसरणी चूक आहे.

## [३६] प्रांतीय भाषांचा राष्ट्रीय विकास

विभिन्न धर्मांचे लोक प्रांतीय भाषेंतून जेव्हा लिहूं वाचूं लागतील तेव्हा नवे नवे वाक्‌प्रचार व विशेषणें भाषेला समृद्ध करतील हें खरें, कुणी प्रभु येशू म्हणेल, तर कुणी हजरत येशू ख्रिस्त म्हणेल. एखादा भगवान् महंमद म्हणेल तर कुणी हजरत बुद्ध म्हणेल. किंग राम व क्विन सीता ह्यांना जर आपली हरकत नाही तर बादशाह राम लिहिल्याबद्दल चिडण्याचें तरी काय कारण आहे ? स्वामी रामतीर्थांनी तर आपलें नांवच राम बादशाहा ठेवून घेतलें होतें. भाषाभेदांतून जर भाषावाद उत्पन्न झाला तर आपण परस्परांची भाषासुद्धा शिकणें सोडून देऊं. धर्म आणि संस्कृतीच्या आधारें जर भाषा वेगवेगळ्या झाल्या तर सर्व व्यवहारहि वेगवेगळे होऊन जातील. या फाटाफुटीचें नांव पाकिस्तान आहे. पाकिस्तानला आणखी वेगळीं शिंगे नसतात !

## [३७] विधायक विचार

आज समाजामध्ये सगळ्यांत मोठी व सगळ्यांत जास्त उणीव विधायक विचारांची आहे. चामडी बचावून काम करणारे जीर्ण मतवादी किंवा परिमित दृष्टि असलेले राज--नीतिज्ञ ही उणीव भरून काढूं शकत नाही एखादें संकट अचानक चालून आल्यावर येन केन प्रकारेण त्याचें निवारण करावेंच लागतें. घराला आग लागली तर ती ताबडतोब विझवावी लागेल. पूर आला तर लोकांना वांचविण्याची व्यवस्था करावी लागेल. परंतु आसाम किंवा जपान मध्ये वारंवार घरांना आगी लागूं लागल्या किंवा उत्कल मध्ये पूराची भीति रोजचीच होऊन बसली तर तिचें निवारण करण्यासाठी कांही मूलगामी उपाय योजावेंच लागतील. यासाठी विधायक प्रतिभेची आवश्यकता आहे. अस्पृश्यांचें भांडण आज आहेच, लीगवादी मुसलमानांचा तंटाहि सुरूच आहे. या अशांतीचें निवारण पुलिस आणि

लष्कराच्या सहाय्याने होऊं शकेल पण भांडणाचें मूळ मात्र अशाने नाहींसें होणार नाही. तो आजे परिस्थितींत खोलवर रुजून बसतील. या प्रश्नाचें मूलग्राही आणि विधायक विचारशक्तीनेच उत्तर मिळूं शकेल. विधायक विचारांत वास्तविकता यावी म्हणून ते विचार तुम्हांला आपल्या जीवनांत आचरावे लागतील. ह्याबाबतींत तुम्हां मंडळींना करण्यासारखें पुष्कळच आहे.

## [३८] क्रांतियोग

माझ्याकडे एक दिवस अग्रिकल्चरल कॉलेज मधील दोन विद्यार्थी आले होते. त्यांची तक्रार अशी होती, की त्यांच्या वसतीगृहांतील नोकर त्यांचे कपडे धूत नाहीत, उष्टें शेण करीत नाहीत, त्यांची भांडी घांसीत नाहीत. त्यांचें गाऱ्हाणें खरें होतें. परंतु त्यांत नोकरांचा संबंध असल्यामुळे मी त्यांना सांगितलें, की याला इलाज नाही. नोकरांवर बळजबरी करणे चांगलें नाही. कारण त्यांना बिचाऱ्यांना त्यांच्या जातीबाहेर निघावे लागेल. त्याचें हुक्कापाणी व रोटीबेटी व्यवहार बंद होतील. माझ्या घरीं जेव्हां एकादे हरिजन पाहुणे येतात तेव्हा एखादे वेळीं आमची मोलकरीण त्यांचें उष्टें काढायला व भांडी घासायला तयार नसत, अशावेळी आम्ही स्वतः— मी माझी पत्नी, माझी मुलें— त्यांचें उष्टें काढून भांडे घासतो. वेळप्रसंगीं त्या मोलकरणीचेंहि उष्टीं भांडी घांसायला आम्हांला हरकत नसते. मग तीच विचार करायला लागते की, ज्यांची उष्टी भांडी मी घांसते तेच जर हरिजनांचीं भांडी घांसतात तर मग माझें पावित्र्य कुठें राहिलें! हळूं हळूं तिच्याहि मनाची तयारी होत जाते. तुम्हीहि असेंच केलें पाहिजे. जर नोकर तयार नसतील तर तुम्ही स्वतः आपल्या हरिजन मित्रांचें भांडी—धुणें केलें पाहिजे. म्हणजे हळूंहळूं नोकरांचीहि तयारी होऊं लागेल. हा क्रांतियोग आहे.

## [३९] डॉक्टर नित्य पवित्र

आणि तुमच्याकरितां तर ही गोष्ट अगदी सहज शक्य आहे. डॉक्टर काय काय करीत नाही? बेडूक व मुडदा कापण्यापासून तर तुमचें शिक्षण

सुरू होतें. पूर्वी वैद्य अस्पर्श समजला जात असे. आज सुद्धा डॉ. खरे म्हणत असतात की, मी तर शूद्र आहे, कारण मी मुड्यांची व बेडकांची चीरफाड करायला शिकलों आहे. हें काम पूर्वी कांही पवित्र समजलें जात नसे. उच्च जातींतील मुलें तें करायला तयार होत नसत. कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजांत जेव्हा पहिल्या प्रथम एका ब्राह्मण विद्यार्थ्यानें मुड्याला सुरी लावली तेव्हा सरकारकडून त्याला तोफेची सलामी दिली गेली. नालवाडीमध्ये मेलेलीं ढोरें फाडण्याचें काम पहिल्या प्रथम एक ब्राह्मण पदवीधर, श्री गोपाळराव वाळुंजकर यांनी केलें. गांधींनी त्यावेळी मोठा सोहळा केला. महादेव भाईंनी त्यांची 'हरिजन' मधून मोठी प्रशंसा केली. हें काम जेव्हा अपवित्र मानलें जात असे तेव्हा वैद्य अस्पर्श होता. परंतु त्यानंतर उच्च कुलीन व उच्च वर्णीय लोक वैद्याचा धंदा करूं लागले तेव्हा वैद्य स्वतः अस्पर्श राहिला नाही. फक्त त्याला कुणाचा स्पर्श दोष होत नसे. तो हरिजनांची आणि रजस्वलांची नाडी पाहून देखील स्नान न करताहि शुद्धच मानला जात असे. असा हा तुमचा व्यवसाय वरकरणी कितीहि अस्वच्छ व कठोर भासत असला तरी वस्तुतः अत्यंत पवित्र व शुद्ध आहे. जातपातीच्या पलीकडे तुम्ही गेले असल्यामुळे हे भेदभाव नाहीसे करण्यासाठी पहिलें पाऊल तुम्ही टाकलें पाहिजे.

## [४०] संप्रदायातीत पेशा

डॉक्टर हा जसा जातीच्या पलीकडील आहे तसाच तो संप्रदायाच्या पण पलीकडील आहे. माणसाला वित्तापेक्षाहि जीव प्यारा असतो. जीवावर बेतली म्हणजे धर्म जाति संप्रदाय सोडून तो डॉक्टरला शरण जातो. जातीय दंग्यामध्ये घायाळ झालेले लोक दवाखान्यांत येतात व त्यांचा औषधोपचार तुम्हांला करावा लागतो. मला माझीच एक गोष्ट आठवते. मी, हसनसाहेब (येथील आरोग्य मंत्री) एकदां माझे दुसरे एक मित्र डॉ. पांडे यांचेकडे उतरलों होतों. पांडे ग्रँड मेडिकल कॉलेजमध्ये शिकत होते. भेंडी बाजारांतच ते राहत असत. मुंबईला हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला. मी पायीच मुक्कामाकडे चाललों होतो. माझ्या समोरच

एका माणसाला सुरीने भोसकण्यांत आले. कांही विचार न करतां एकदम मी तिकडे धांवलों. माझ्यावर देखील वार झाला असतां इतक्यांत एक दंगेवाला ओरडला 'अरे हे तर मोठे दवाखानेवाले आहेत. आपल्याला मलमपट्टी करतात.' मला सोडून देण्यांत आले. मी मेडिकल विद्यार्थ्यांच्या सोबत राहत असे, इतकेंच त्यांना पुरें होतें. ही घटना तुमच्या दृष्टीने मोठी उद्‌बोधक आहे. सांप्रदायिक भेदभावांच्या वर येऊन निर्लेपपणें जर तुम्हांला तुमचें काम करतां आलें तर तुम्ही जातीयवादाचा व संप्रदायवादाचा प्रतिकार इतरांपेक्षा सुलभ रीतीने करूं शकाल. आज दोन्ही जमातीमध्ये अतिशय मनोमालिन्य वाढलेलें आहे आणि तरी देखील डॉ. खरे, डॉ. दुबे हे लोकप्रियच आहेत. तुम्ही माणसाचें कष्ट दूर करतां, वेदनेचा परिहार करतां, रोगाचें निवारण करतां, मरत्याला वांचवूं शकलां नाहीत तरी कमींत कमी त्याचें जीवन निरामय व सुखद करतां, आणि म्हणूनच तुम्हांला जाति, संप्रदाय निरपेक्ष मानवतेची प्रतिष्ठा सुगमपणे वाढवितां येते. स्थिर सामाजिक मूल्यांची स्थापना करायला तुमच्या व्यवसायामुळे जी मदत मिळते ती इतरांना मिळत नाही. म्हणून ही जबाबदारी तुमच्यावर विशेषरूपाने आहे. ती पार पाडण्यासाठी तुम्ही आपला व्यवसाय मंदिर व बाजार यांच्या प्रभावापासून अलिप्त ठेवला पाहिजे. तुमच्यासाठी रोगी हा हिंदु, मुसलमान, ब्राह्मण–मेहेतर यांपैकीं कोणी नसून केवळ रोगी आहे.

## ४१] केवळ उपजीविकेकरितां नव्हे.

वास्तव तुमचा धंदा केवळ उपजीविकेचें साधन म्हणून असतां कामा नव्हे. तो जीविकेचें साधन तर आहे पण ही त्याची गौण बाजू झाली. समाजसेवा ही त्याची मुख्य बाजू! रोग्याला जशी जात नाही तशी तुम्हांलाहि जात नाही. तुमचा दवाखाना म्हणजे दुकान नव्हे आणि सांप्रदायिक भेदभावाच्या चार भिंतांत्यांनी घेरलेले मंदिर, मसजीद किंवा चर्चहि नव्हे! जे लोक औषधोपचार व रुग्णशुश्रुषा ही धर्म प्रसाराची साधनें मानतात ते आपल्या व्यवसायाच्या पवित्रतेवर, उपयोगितेवर आणि प्रतिष्ठेवर कुठाराघात करतात.

## [४२] व्यावसायिक चारित्र्य

तुमच्या व्यवसायाच्या श्रेष्ठतेचें वर्णन आणखी कुठवर करूं. तुम्ही लिंग–भेदाच्याहिवर उठावे अशी तुमच्याकडून लोकांची अपेक्षा आहे. तुमच्याकडून स्त्रीया आपला इलाज करवितात. डॉक्टरणीच्या अभावी आपल्या विशेष रोगांची चिकित्साहि करवून घेतात. प्रसूतीच्यावेळीं देखील तुमचीच मदत घेतात. मुंबईचे डॉ. पुरंदरे हे नाणावलेले स्त्री–रोग–चिकित्सक आहेत जर ते दूषित व विकारी वृत्तीनें काम करतील तर त्यांची काय प्रतिष्ठा राहील. मी याला व्यवहारोचित ब्रह्मचर्य भावना म्हणतो. सारांश, तुमच्या व्यवसायांत बाजारचें तत्व नसावें मंदिर, मसजीदींतली संकीर्णता नसावी आणि विकारी दृष्टि सुद्धां राहूं नये.

## [४३] तुमचा विशेषअधिकार

हें तुमचें विद्यालय देखील मुंबई सारखेंच हिंदु–मुस्लिम वस्तीच्या मध्यावर आहे. तुम्ही दोघांचीहि सेवा शुश्रुषा करून त्यांचा विश्वास मिळवूं शकतां. माणूस पैसे देणाऱ्याचें कर्ज फेडूं शकतो परंतु शारीरिक पीडा आणि रोग दूर करणाऱ्याचा कायमचा ऋणी होऊन बसतो. आमच्या ग्रामसेवा योजनेंत देखील दवाखाने अधिक लोकप्रिय आहेत. सेवाग्राम हें आपणासारख्यासाठी गांधींच्या विधायक भिन्न भिन्न प्रवृत्तींचें केंद्र आहे. परंतु खेडुतांना सेवाग्रामचें महत्व तेथील दवाखान्यामुळे वाटते. वर्ध्याच्या सरकारी दवाखान्यांत गरिबांना जें औषध मिळत नाही, तें तेथे मिळतें. एके काळीं जे मुसलमान डॉ. मुंज्याकडे आपल्या डोळ्यांचा इलाज करण्यासाठी जात, मुंजे त्यांना हे हिंदुसभेचे प्रमुख अगर अध्यक्ष आहेत याची जाणीवहि राहत नसे. माझें तुम्हांला असें कळकळीचें सांगणें आहे की, तुम्ही क्रांतिकारक बनावे, इनामदार बनावे; राजकीय पक्षोपक्षापासून, धार्मिक संप्रदायापासून अगदी अलिप्त राहावे. याचा अर्थ असा की, तुमचा म्हणून कोणताहि राजकीय पक्ष राहू नये. मी तर असेंहि म्हणेन डॉक्टराने कोणत्याहि सरकारांत सत्तेचें पद घेऊं नये. हें सगळेच तुम्हांला साधणार नाही, हें मी जाणतो. कारण तुमच्या निष्ठेंत इतकी तीव्रता व उत्कटता नाही. परंतु तुम्ही आपल्या व्यवसायाचें सामाजिक मूल्य व नैतिक प्रतिष्ठा वाढवावयाचा

प्रयत्न मात्र अवश्य करा. तुमच्या हृदयावर सामाजिक परिस्थितीची प्रतिक्रिया झाली पाहिजे. तुमची बुद्धि जागृत झाली पाहिजे व याचा परिणाम तुमच्या जीवनांत प्रकट झाला पाहिजे. भिन्न भिन्न वर्णांच्या भिन्न भिन्न वर्गांच्या, भिन्न भिन्न जाति आणि जमातींच्या लोकांबरोबर समानतेचा व्यवहार करणें तुमच्यासाठी फार सोपे आहे. तुम्ही तरुण आहांत विद्यार्थी आहांत आणि तेहि मेडिकल विद्यार्थी आहांत. म्हणजे एकेक गोष्ट दुसरीहून वरचढ अशी आहे. म्हणूनच विधायक प्रतिभेनुसार आचरणामध्ये तुम्ही पुढाकार घेतला पाहिजे.

## [४४] पुण्य संकल्प

आपल्या देशासमोर असलेल्या बिकट प्रश्नांवर वास्तविक व मूलगामी तोड काढणे हा विद्यार्थ्यांचा अधिकार आहे. ह्याचेंच नांव विधायक विचारशीलता आहे. हें काम एकटी कॉंग्रेस करूं शकत नाही. आजवर ती एक प्रतिकारक चळवळ करणारी संस्था म्हणून राहिली आहे. आज ती सत्ताधारी सरकारच्या भूमिकेंत आहे. तिच्यासमोरील प्रश्न मोठा बिकट आहे जर ती वर्ष दोन वर्षे शांति व सुव्यवस्था ठेवूं शकली नाही तर आमची स्वराज्याची व 'चलेजाव' ची घोषणा व्यर्थ होणार आहे. कॉंग्रेस असफल ठरली तर इंग्रजी राज्य आमच्या नालायकीने टिकून राहील. बंधुविग्रह व दुही चालत राहिली तर पाकिस्तानची बीजें अंकुरित होतील. हिंदुस्थानांत सामाजिक क्रांतीच्या योगाने अखंडत्व, अंतरप्रांतीयत्व आणि संयुक्त राष्ट्रीयत्वाच्या भावनांचा विकास करण्यासाठी ज्या प्रकारच्या विधायक विचारांचा व चळवळींची गरज आहे, त्यांचा संकेत मात्र मी या ठिकाणीं केला

आपल्या आवडत्या मायभूमीवरून जीव ओंवाळून फेंकणे तुमच्याकरितां एकप्रकारे सोपे आहे परंतु या विधायक क्रांतीकरितां आपलें जीवन अर्पण करणे तितकें सोपे नाही. गरज मात्र आज त्याचीच आहे. परिस्थिति आज तेंच मागत आहे. सामाजिक क्रांतीसाठी विधायक प्रतिभेच्या विकासाचा आणि राष्ट्रव्यापी संयोजनाचा पुण्य संकल्प जर तुम्ही कराल तर हिंदुस्थानचें भविष्य उज्वल आणि आशामय आहे.

व्याख्यान— (रॉबर्टसन, मेडिकल स्कूल, नागपूर.)

(मूळ हिंदीतून) ता. २२–९–४६

# तरुणांचें संगठन

ही खाजगी सभा राष्ट्रीय युवक संघाच्या कार्यकर्त्यांची आहे. त्यांनी आज इतर मित्रांनाहि मुद्दाम बोलाविलें आहे. हेतु हा की युवकांच्या संगठनाच्या बाबतीत माझे विचार ऐकून घेऊन थोडीशी चर्चा करतां यावी.

●

## युवक संघाशी माझा संबंध

राष्ट्रीय युवक संघ ही माझी संस्था आहे, म्हणजे ती मी काढलेली आणि मी चालविलेली संस्था आहे, असा समज सार्वत्रिक आहे. पण हा समज खरा नाही. या संघाशी माझा संबंध बराच निकटचा व जिव्हाळ्याचा आहे. पण मी त्याचा संस्थापक किंवा संचालक मात्र नव्हे. फार काय हा संघ स्थापण्याची कल्पना किंवा स्फूर्तीहि माझी नाही.

तर मग या संस्थेशी माझा संबंध आहे म्हणजे काय? आपल्या देशांत जे अनेक विचार प्रवाह अस्तित्वांत आहेत त्यांत गांधी विचार हा सर्वांत जास्त कल्याणकारक व क्रांतिकारक आहे हें कांही तरुणांना पटलें आणि त्या विचार प्रणालीच्या आधारांवर आपल्या मगदूराप्रमाणे तरुणांचें संगठन करावे असें त्यांच्या मनाने घेतलें. अर्थात गांधीच्याप्रमाणे आश्रम चालवून किंवा विधायक कार्याच्या इतर संस्था काढून अहिंसक संगठनाचे प्रयोग करण्याचा त्यांचा अविष्कार नव्हता. 'लहान तोंडीं मोठा घांस' घेण्याचा घाट त्यांनी घातला नाही. आपल्या समजूतीप्रमाणे व शक्तिप्रमाणे गांधींच्या विचारसरणीच्या आधारांवर संगठन करण्याचें त्यांनी निश्चित केले आणि कामास लागले. त्यांत, त्यांनी सुरुवातीपासून माझा सल्ला घेण्याचें ठरविले. पण माझ्या गैरशिस्तपणामुळे आणि कामाच्या व्यापामुळे त्यांना

माझा विशेष उपयोग झाला नाहीं. माझ्या नांवाचा त्यांना कांहीसा उपयोग झाला. पण माझ्या नांवाचाहि उपयोग करणें त्यांच्या संगठनाच्या दृष्टीने गैर व अप्रशस्त कसें आहे हें त्यांना पटविण्याचा प्रयत्न मी करीत आलों आहे.

त्यांना आपल्या कल्पनेप्रमाणे संगठन करण्याच्या बाबतींत यश कितपत आलें हा मुद्दा अगदीं अलाहिदा आहे. यशापेक्षा अपयशच जास्त आलें हें त्यांनाहि कबूल आहे. अगदीं शून्य यश आलें असें समजा. कांहीं प्रसंगीं अगदीं 'मी' 'मी' म्हणणाऱ्याचाहि तोंड सुटलें असेल पण त्या मुद्याचें विवेचन आज मला करावयाचें नाहीं. आज आपल्या समोर जो मुद्दा आहे तो हा कीं यांनीं स्वीकारलेल्या संगठनेची तऱ्हा काय होती ? आणि ती कितपत योग्य होती ? याच दृष्टीनें आतां आपण विचार करूं.

## संगठनाचे प्रचलित दोन प्रकार

आपण असें पाहतों कीं सामान्यतः तरुणांचें संगठन शिपाई बाण्याचें किंवा सैनिक वळणाचें असतें. सैनिक संगठनाचे दोन प्रकार प्रचलित आहेत. एक दंडनिष्ठ अगर राज्यनिष्ठ किंवा सत्तानिष्ठ आणि दुसरा व्यक्तिनिष्ठ. व्यक्तिनिष्ठ संगठनांतहि दंडाचें तत्व मुख्य असतें. पण त्या संगठनाचा आधार प्रमाणभूत व्यक्तिवरील निष्ठा असते.

## सत्तानिष्ठ संगठन

सत्ताधिष्ठित म्हणजे सत्तेवर उभारलेलें संगठन बहुधा सरकारचें असतें. त्यांत निष्ठावान माणसें नसतातच असें नाहीं. पण मुख्य भरणा पगारी अथवा भाडोत्री शिपायांचा असतो. त्यांच्या ठिकाणीं आज्ञापालन व कार्यनिष्ठा असली म्हणजे झालें. विचारनिष्ठेची गरज नाहीं. किंबहुना त्यांच्या ठिकाणी विचार नसलेलाच बरा. त्यांना विचार करण्याची मोकळीक दिली तर भलत्यावेळीं त्यांचें मतस्वातंत्र्य नडायचें. त्यांच्या हृदयांत फारशा भावनाहि असतां कामां नये. एरवी आयत्या वेळीं त्यांच्या कोमल भावना कर्तव्य पाळण्याच्या आड यायच्या. अर्जुनाचें उदाहरण या बाबतींत प्रसिद्धच आहे.

## पशूपेक्षाहि हिनकस जीवन

त्यामुळे फौजेंतील शिपायाला कोणचेंहि प्रेमबंधन नसावें, कौटुंबिक पाश नसावा असा प्रयत्न होत असतो. परिणाम असा होतो की त्यांना बायका पोरें किंवा स्वतःचें घरदार नसतें. पण म्हणून संयम किंवा वैराग्य साधतें असें नव्हे. डोक्यांत विचार नाहीत, हृदयांत भावना नाहीत. खावें, प्यावें, झोपावें आणि मन रमवावें. हेंच त्यांचें जीवन. त्या जीवनाला मी पशुवत म्हणण्याचें धाडस मुद्दाम करीत नाहीं. सैन्यांतील शिपायांची शारीरिक गरज भागविण्याकरितां त्यांच्या छावणींत बायका किंवा पोरी पुरविण्याची सोयहि कांही ठिकाणी असते. काही ठिकाणी तसली सोय दुसरीकडे केलेली असते. युद्धाच्या काळांत देशरक्षणाचें महत्कार्य या सैन्याला पार पाडायचें असतें. म्हणून युद्ध चालू असतांना त्यांची शरीर-सेवा करण्यांत कित्येक मुलींना भूषणहि वाटते. परवाचीच गोष्ट आहे. बिलासपूर—कटनीच्या गाडींत आमचा एक अमेरिकन प्रवासी सोबती एका ॲंग्लोइंडियन तरुणाला विचारीत होता, 'अजून लग्न करण्याचा विचार नाही वाटतं?' तरुण म्हणाला, 'आहे, पण मुलगी पाहिजेना' अमेरिकन म्हाताऱ्याने विचारलें, 'अरे. मुलींना कांही तोटा कां आहे?' तरुण विषादपूर्वक म्हणाला 'मुली मुबलक आहेत. पण या युद्धांत त्या सगळ्या डागळलेल्या आहेत. सोजिरांनी किती मुली भ्रष्ट केल्या असतील याचा नेम नाही' : वरून सैन्यांतील शिपायांच्या शिपाईगिरीची कल्पना येईल. शील किंवा नीति यांचा त्यांना कांही उपयोग नसतो.

## स्त्री जातीचा उपमर्द

'संगठन हिंसक असावें की अहिंसक? सशस्त्र असावें की निःशस्त्र?' हा प्रश्न निराळा. पण सशस्त्र संगठन करायचें झालें तरी तें क्रांतिकारी होण्यास कोणत्या गुणांची आवश्यकता आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. सशस्त्र संगठनहि फक्त सांगकाम्या, भाडोत्री लोकांचें असलें तर त्यांचीं डोकीं विचारशून्य, त्यांचीं हृदयें भावनाशून्य असलीं पाहिजेत असा प्रयत्न करावा लागेल आणि त्यांना कुठलेंहि स्नेहबंधन नसावे याची काळजी घ्यावी

लागेल. म्हणजे सैन्यांतील शिपाई अविवाहित असूनहि ब्रह्मचारी असले पाहिजेत असें नाही. पूर्वी देवाच्या वाहिलेल्या मुरळ्या किंवा देवदासी पुरोहिताच्याद्वारें देवाची सेवा करीत असत. आतां राष्ट्रांगना किंवा देशदासी सैनिकांच्या मार्फत देशाची सेवा करतात. स्त्री जातीचा हा उपमर्द कुठल्याहि समाजक्रांतीला पोषक कसा बरें ठरेल! भाडोत्री शिपायाचा एका किंवा अनेक स्त्रियांशी शरीर संबंध येऊं शकेल. पण प्रेम संबंध जडतां कामां नये. कुठल्याहि स्त्रीचा अधिकार किंवा सत्ता त्याच्यावर राहाणार नाही. तो फक्त बराकींत राहाणारा शिपाई आहे घरांत राहणारा कुटुंबवत्सल नागरिक नव्हे. 'सिव्हिल' निराळे. 'मिलिटरी' निराळे.

## 'सिव्हिल' व 'मिलिटरी'

युद्धाच्या वेळीं त्यांच्या निसर्ग सिद्ध कोमल भावना जागृत होऊन ऐन वेळीं घोटाळा होऊं नये म्हणून ही सावधगिरी बाळगावी लागते. तो अगदी भान विसरून लढला पाहिजे. त्यासाठी त्याला मुद्दाम दारू पाजण्याचा परिपाठ आहे. बेताची दारू पिऊन तो स्वत:ला व जगाला विसरतो आणि अगदी बेहोश होऊन लढतो. आपल्या इकडे पटाच्या बैलालाहि शर्यतीच्या वेळीं शिंदी किंवा ताडी पाजण्याचा प्रघात आहे. तेवढ्यासाठीच त्याला मलिदा चारण्यांत येतो. त्याने सदासर्वकाळ मनमुराद खुराक खावा. कुठलेंहि उपयुक्त काम करूं नये आणि शर्यतीच्या वेळीं विक्रम गाजविण्यास सज्ज राहावें हेंच त्याचें जीवन. हेंच सैनिकाचेंहि जीवन. त्यांत विचारांची गरज नाही. समाजोपयोगी कार्याला वाव नाही. लष्करी शिक्षणांत भाकऱ्या भाजणें, आग विझविणें, ओझें उचलणें, लाकडें फोडणें, पाणी काढणें इत्यादि अनेक बाबींचा समावेश होतो. पण त्या सगळ्या गौण व आनुषंगिक असतात.

या प्रकारच्या संगठनाने एका विशिष्ट प्रकारची मनोरचना बनते. मनाला एक ठराविक वळण लागतें. परवा आगगाडींत थंडीचा बराच त्रास झाला. आमच्या डब्यांत कांही सोजीर होते. थंडीच्या निवारणासाठी आम्हांला ओवरकोट, घोंगडी, लेप यांची आठवण झाली. पण ते

शिपाईगडी म्हणायचा लागले, 'कोण दैना आहे बुवा या कडाक्याच्या थंडीत देखील एक घोटभर दारू मिळू नये. Not even just a sip.' आम्हांला पोंगडी आठवली, त्यांना दारू आठवली. हा त्यांच्या व आमच्या मनोवृत्तींतील भेद. आमची मनोवृत्ति नागरिक त्यांची सैनिक. आमची मुल्की त्यांची फौजी.

### बहुप्रसवा लष्करशाही

हा झाला संगठनाचा एक प्रकार. या लष्करी संगठनाचा जन्म लष्करशाहीच्या पोटीं झालेला आहे. शस्त्रनाद व दंडनिग्रह हीं लष्करशाहीचीं प्रमुख अस्त्रें आहेत. भांडवलशाही प्रमाणेच लष्करशाही देखील बहुप्रसवा म्हणजे मोठी लेकुरवाळी आहे.

### सत्तानिष्ठा व क्रांतिनिष्ठा यांचें वैर

अशा संगठनाचा मनांतील भावनेशी किंवा विकाराशीं कांहीही संबंध नसतो. म्हणून तिच्या द्वारें माणुसकीचा विकास होऊ शकत नाही. पैसे घ्यायचे आणि हुकुम बजवायचा एवढेंच शिपायाचें काम. जेथे मोजणेच काम करायचें तेथे कळकळीचा किंवा उत्कटतेचा प्रश्नच उभव होत नाही. समजा की दोन शेठांचें भांडण आहे. दोघांनीहि एकमेकाला मारायला दोन गुंड ठेवले. ते गुंड पैशांकरिता एकमेकांशी लढतील. पण त्यांत त्यांची स्वतःची भावना मुळीच असणार नाही. पैसे दिले नाही तर ते लढणार नाहीत. अर्थात त्यांच्या मारामारीच्या मुळाशी त्यांच्या मनांतील संताप किंवा भावना नसून फक्त दाम आहे. जेलमध्ये फटके मारण्याकरिता मुद्दाम एखाद्या बलवान कैद्याची नेमणूक करतात. ज्याला फटके मारायचे त्या गुन्हेगाराचा फटके मारणाऱ्याला मोठा सात्विक संताप आलेला असतो असें मुळीच नाही. पण जोराने फटके मारण्याबद्दल त्याला शिक्षेची माफी आणि बक्षिस मिळते म्हणून तो फटके मारतो. निव्वळ शिपाईगिरी किंवा भाडोत्री शिपायाचा शिपाईपणा याच प्रकारचा असतो. राज्यसत्तेला अशा शिपायांचा उपयोग होऊ शकतो. पण हें क्रांतिनिष्ठ संगठन नव्हे. अशा संगठनेतून क्रांतीचा उदय होत नसतो.

## व्यक्तिनिष्ठ संगठन

दुसरें संगठन व्यक्तिनिष्ठ असतें. व्यक्तिनिष्ठ संगठन क्रांतिकारकहि असूं शकेल. एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या भोवती कांही शिपाई गोळा होतात आणि एकनिष्ठपणे त्याचा हुकुम पाळतात. मोगल राज्याचा संस्थापक बाबर याचें सैन्य व्यक्तिनिष्ठ होतें. स्वराज्य संस्थापक शिवाजी यांचेंहि सैन्य व्यक्ति निष्ठच होतें. पण त्यांचे शिपाई स्वराज्य स्थापनेच्या उदात्त भावनेने पुढे सरसावले होते. राणा प्रताप यांच्या बरोबर रानावनांत हिंडून हाल अपेष्टा सोसणारे शिपाई उदात्त भावनेने प्रेरित झालेले होते. नेताजी सुभाष बोस यांचें उदाहरण अगदीं ताजें आहे. त्यांच्या हांकेसरशी लक्षावधी लोक त्यांच्या निशाणाखाली गोळा झाले. कारण ते सर्व स्वराज्य संस्थापनेच्या उदात्त भावनेने प्रेरित झालेले होते. **उदात्त भावनेने प्राण अर्पण करायला सिद्ध झालेलें सैन्य स्वयंसैनिकांचें असतें.** या स्वयंसैनिकांना खायला अन्न लागत नाही असें नाहीं; पण ते दामा करिता काम करणारे नसतात. पोटा पुरतें मिळालें म्हणजे आपल्या ध्येया करिता पडेल तें सोसून लढण्यास ते तयार असतात.

## सत्तानिष्ठ व व्यक्तिनिष्ठ संगठनांतील फरक

ध्येयासाठी तळहातावर शिर घेऊन आपल्या नेत्यांच्या निशाणाखाली लढायला सज्ज होणाऱ्या या सैनिकांच्या अंगीं जें निष्ठाबळ असतें तें केवळ राज्यनिष्ठ किंवा स्वामिनिष्ठ शिपायांच्या अंगीं नसतें. त्यामुळे केवळ स्वामिनिष्ठ किंवा राजनिष्ठ शिपाई नेहमी जिव्हाळ्याने देहभान विसरून लढतील असें नाहीं. युद्धांत त्यांना स्वतःच्या देहाचा विसर पडावा म्हणून कृत्रिम उपायांची योजना करणें हा सुरक्षित पक्ष ठरतो. पण ध्येयाकरिता एखाद्या व्यक्तीचें नेतृत्व पत्करणाऱ्या सैनिकांना स्वतःच्या सुखदुःखाचा विसर पडावा म्हणून दारू पाजावी लागत नाही. आणि गृहस्थाश्रमाच्या स्नेहबंधनातून मुक्त ठेवण्याकरिता छावणींत स्त्रियाहि पुरवाव्या लागत नाहीत. त्यांना त्यांचें घरदार प्रिय असतें, बायका पोरें जिवापलीकडे लाडकीं असतात. पण युद्धाचा दुंदुभी वाजला की ते सारें कांही विसरतात. घरदार, बायकापोरें, आप्तेष्ट या सगळ्यांना ते विसरतात. त्यांना स्वतःच्या जीवाचाहि विसर पडतो.

मग परस्त्रीची किंवा विश्वयोषितेची गोष्ट कशाला? ध्येयाने प्रेरित होऊन रणमैदानावर निघालेल्या मर्दांची युद्धकालीं तलवार हीच अर्धांगी असते. हें समर वैराग्य म्हणजे स्मशान वैराग्य नव्हे! समर वैराग्यांत निराशा नसते, उत्साह असतो, निवृत्ति नसते, पराक्रमाची हौस असते. 'स्वराज्य मिळेपर्यंत लग्न करणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करणारे भीष्माचार्यांचे सवाई उत्तराधिकारी आजहि आपल्यांत आहेत. या वीरांचें युद्ध हें तप आहे. तें प्रखर तप चालू असें पर्यंत त्यांनी साऱ्या सुखोपभोगांचा त्याग केलेला असतो. ध्येयाशी तादात्म्य झाल्यामुळे केलेला सुखोपभोगांचा त्याग हेंच आपलें वास्तविक नैष्ठिक ब्रह्मचर्य. ब्रह्मचर्य कांहीं फक्त बाह्य परिस्थितीचि नव्हे. ती एक निष्ठा आहे. एक वृत्ति आहे.

## नेताजींचें प्रखर ब्रह्मचर्य

नेताजी सुभाषचंद्र बोस व कॅप्टन लक्ष्मी या दोघांनी एकत्र राहून, खांद्याशी खांदा लावून स्वातंत्र्याकरिता युद्ध केलें. पण त्यांच्या संबंधानें स्वतःच्या मनाशीं तरी कोणी कुजबुजतें का? कोणी कुजबुजला तर लोक त्याची जीभ छाटून टाकतील. सुभाषबाबूंचें ब्रह्मचर्य रामदासा इतकेंच ध्येयमूलक व शुका इतकेंच प्रखर नाही असें कोण म्हणेल? ज्याची चित्तवृत्ति ध्येयाच्या ठिकाणीं एकाग्र झालेली असेल, त्या क्रांतीच्या उपासकाला ही साधना सुलभ असते. सुभाषांच्या ठिकाणीं ती एकनिष्ठ होती. त्यांचें लग्न क्रांतीशी लागलें होतें. जुन्या भाषेंत, तलवारीशीं लागलें होतें. 'तलवारीशी लग्न' म्हणजे साधनैक वृत्ति, साधनाच्या ठिकाणीं सर्व वृत्ति एकवटणें. त्यामुळेच सुभाष व लक्ष्मी एकत्र राहूनहि शुद्ध राहूं शकलीं. प्राचीन काळीं बहिण भावांना एकाच अंथरुणावर झोपण्याचा प्रसंग आला तर मध्यें 'नंगी तलवार' ठेवीत. ती दोघांचेंहि रक्षण करी. त्यांना नित्य 'हुश्शार' (सावधान) ठेवी. ध्येयाच्या या नंग्या तलवारीने रशियाच्या क्रांतीच्या वेळीं क्रांतिकारक तरुण-तरुणींचें रक्षण केलें. समर वैराग्यांत इतकें तेज आहे, इतकें काव्य आहे, इतकें अमोघ सामर्थ्य आहे.

नेताजींची आझाद हिंद फौज जेथें जेथें जात असे, तेथले लोक तिचें स्वागत करीत. त्यांना त्या फौजेचा आधार वाटे. पण भाडोत्री सैन्याला

म्हणजे लोक कंटाळतात, उबगतात, त्रासतात. कारण त्या सैनिकांना संयमाचें वळण नसतें, संभावितीची चाड नसते. ते पशू प्रमाणे स्वैराचारी असतात. जेथे राहातील तेथील लोकांना त्यांच्या पासून उपसर्ग होतो, उपद्रव होतो. लोक म्हणतात तुमच्यापासून आम्हांला रक्षणहि नको आणि उपद्रवहि नको. सत्तानिष्ठ व राज्यनिष्ठ संघटनांत पगारी लोकांचा भरणा असतो. त्यांची तलवार पिशवीची बटीक असते. तिच्यावर ध्येयाचें तेज तळपत नाही. व्यक्तिनिष्ठ संगठनांत हा दोष नसतो.

## व्यक्तिनिष्ठ संगठनांतील दोष

परंतु व्यक्तिनिष्ठ संगठनांत दुसरा एक महत्वाचा दोष असतो आणि तो म्हणजे व्यक्तिनिष्ठ संगठन सुरुवातीला जरी तत्वनिष्ठ असलें तरी पुढेपुढे त्यांत तत्वनिष्ठेचें महत्व कमी कमी होत जाऊन व्यक्तिनिष्ठेचेंच स्तोम माजते. एक व्यक्ति परम प्रमाण मानली जाते, आणि तिची आज्ञा वेदाइतकीच पवित्र समजण्यांत येते. परिणाम असा होतो कीं त्या व्यक्तीचा वियोग झाल्या बरोबर सैन्याच्या निष्ठेला आधारच राहात नाही. ज्या मावळ्यांनी शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली स्वराज्याची स्थापना केली त्या मावळ्यांची ती शक्ति शिवाजींच्या मृत्यूनंतर लयाला गेली. आझाद हिंद सैनिकांनी सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली अलौकिक शौर्य गाजविलें. पण आज त्या सैनिकांच्या अंगीं तें सामर्थ्य दिसत नाही. कारण आज ते नेताजींना पारखे झाले आहेत. इतर कोणत्याहि व्यक्तीच्या भोंवतीं हें सैन्य उभे राहूं शकत नाही. कारण नेताजीची शक्ति त्यांच्या बरोबर लयाला गेली. त्यांचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अनुयायां पैकीं कुणांतहि दिसून येत नाही. म्हणून आज आपण हिंद फौजेचें कितीहि कोडकौतुक करीत असलो तरी त्या फौजेच्या द्वारें जो चमत्कार नेताजींना करतां आला तो आतां करतां येणें शक्य राहिलेलें नाही.

## आझाद हिंद फौजेची आवृत्ति नको.

आझाद हिंद फौजेच्या आवृत्त्या काढून आपलें काम भागणार नाही. सुभाषबाबूंना जें यश लाभलें तें कोणत्या परिस्थितींत लाभलें

याचाहि विचार आपल्याला केला पाहिजे. आझाद हिंद फौजेची उभारणी परदेशांत केली. तेथील माणसांनी इंग्रजांची कशी गाळण उडाली तें डोळ्याने पाहिलेलें होतें. ब्रिटीश सैन्यांतील जीं माणसें आझाद हिंद फौजेंत दाखल झालीं त्यांना स्वाभिमानाचा आणि देश-सेवेचा तोच एक मार्ग मोकळा होता. परदेशांत किंवा परप्रांतांत राहणाऱ्या लोकांत स्वप्रांतीया बद्दल व स्वदेशबांधवाबद्दल एक प्रकारची आपुलकीची भावना असते. त्या भावनेच्या आधारावर त्यांच्यामध्ये ऐक्य स्थापन करणें कमी अवघड असतें. या सर्व कारणांमुळे नेताजी सारख्या कर्तबगार देशभक्ताला आझाद हिंद फौजेची स्थापना करता आली. त्यामुळे नेताजींची थोरवी किंवा त्यांनी केलेल्या कार्याचें अलौकिकत्व यत्किंचितहि कमी होत नाही. त्यांचा पराक्रम लोकोत्तर आहे. त्यांनी केलेला चमत्कार अभूतपूर्व आहे. त्यांनी स्वतःच्या कृतीने रचलेलें इतिहासाचें प्रकरण अद्भुतरम्य आहे. पण त्यांनी जें केलें तेंच आम्हीहि करण्याचा घाट घालूं तर 'डॉन क्विक्झोट' च्या मार्गानेंत जाऊन बसूं. खुद्द नेताजीहि आजच्या परिस्थितींत हिंदुस्थानांत आले तर ते देखील बदललेल्या काळाला व परिस्थितीला अनुरूप असें धोरण आखतील. आझाद हिंद फौजेंत हिंदु-स्थानच्या बाहेर हिंदु-मुसलमानांचें जें ऐक्य त्याना साधतां आलें तें हिंदुस्थानात उभारलेल्या आझाद हिंद फौजेंत जिना साहेब, मुस्लीम लीग व मुस्लीम सरकारें, त्यांच्या सारख्या अनन्य पराक्रमशाली पुरुषाला देखील साधूं देणार नाहीत.

## क्रांतीची शिळी कल्पना

यांत आणखी एका गोष्टीचा विचार करणें आवश्यक आहे. राजाच्या किंवा राज्याच्या सैनिका प्रमाणेच या आझाद हिंद सैनिकांचीहि क्रांतीची कल्पना शस्त्रास्त्रांशी निगडित आहे. युद्ध व रक्तपात यांचा क्रांतीशी अपरिहार्य संबंध आहे अशी इतर सैनिकाप्रमाणे त्यांचीहि समजूत झालेली दिसते. '**सशस्त्र बंड म्हणजे क्रांति**' ही **क्रांतीची कल्पना आता जुनी झालेली आहे.** शस्त्रबलाने घडवून आणलेलें परिवर्तन म्हणजे क्रांति नव्हे, हें या युगांतील प्रत्येक क्रांतिकारकाला पटलेलें

आहे. क्रांति घडवून आणण्या करितां कधी कधी शस्त्रास्त्रांचा प्रयोग करावा लागतो असें अनेक क्रांतिकारकांचें मत आहे. म्हणजे त्यांना तलवारीचें वावडें नाही. पण ज्या ज्या ठिकाणीं तलवारीचा उपयोग होईल तेथें तेथें क्रांति होईलच असा मात्र नियम नाही. आज पर्यंत आपण क्रांति शब्द किंचित सैलपणानें वापरीत आलो आहोत. आपली क्रांतीची कल्पना विधायक नाही. फक्त निषेधात्मक आहे.

आज या देशांत सैनिक वृत्ति प्रधान संगठनाची गरज आहे, पण त्या प्रकारचें संगठन पुरेसें होणार नाही. क्रांतीची विधायक भूमिका निर्माण करणाऱ्या विधायक वृत्तीच्या संगठनांची तितकीच किंबहुना त्यापेक्षा कांकणभर जास्त आवश्यकता आहे. आपल्याला फक्त राज्यसत्ता उलथून पाडायची नाही तर समाजक्रांति घडवून आणायची आहे, हें लक्षांत आलें म्हणजे माझ्या म्हणण्यांतील मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

## तत्वनिष्ठा हाच संगठनेचा खरा आधार

म्हणून राष्ट्रीय युवक संघानें माझ्या नांवाचा उपयोग करणें माझ्या भूमिकेच्या दृष्टीनें अनिष्ट आहे असें मला सुचवायचें आहे. आपल्याला शक्ति समाजाची वाढवायची आहे, कुठल्याहि व्यक्तीची नाही. संगठनेचा आधार व्यक्ति नसून तत्व आहे. तुम्ही माझ्या भोंवती संगठन उभारलें तर त्यानें देशाची किंवा संस्थेची शक्ति वाढण्या ऐवजी माझी शक्ति वाढेल. आपल्याला शक्ति एका व्यक्तीची वाढवायची नसून समाजाची वाढवायची आहे. आपल्याला कुठल्याहि व्यक्तीचें राज्य नको आहे. आज सकाळच्या मिरवणुकींत मुलें ओरडून ओरडून म्हणत होतीं, "इन्किलाब जिंदाबाद, थोडे दिनमें गांधी–राज." आपल्याला गांधीराज नको आहे. गांधी थोर असतील, महात्मा असतील तरी पण आम्हांला त्यांचें राज्य नको आहे. राज्य लोकांचें हवें आहे. 'रामराज्य' म्हणजे श्रीरामचंद्र या व्यक्तीचें राज्य नव्हें. त्याच प्रमाणें गांधीराज्य म्हणजे गांधी या व्यक्तीचें राज्य नव्हें. रामराज्य किंवा गांधीराज्य म्हणजे लोकांचें राज्य, जनतेचें राज्य. तुमच्या संगठनेला लोकांनी माझ्याकडे पाहून पैसा दिला किंवा माझ्या नांवामुळे लोक तुमच्या

संस्थेंत येऊन सामील झाले तर त्यापासून तुमची प्रतिष्ठा न वाढतां माझी प्रतिष्ठा वाढेल. अशाने तुमच्या संस्थेची खरी भरभराट होणार नाही. तुम्हांला आपलें कार्य साधण्याकरिता अत्यंत शुद्ध बुद्धीने माझ्या नांवाचा उपयोग करणें अप्रशस्त न वाटलें तरी परीणामीं तें मला किंवा तुम्हांला हितावह होणार नाही.

## पित्याचें पुत्राप्रत कर्तव्य

दरेक प्रामाणीक माणसाचें आज हें कर्तव्य आहे की त्याने तरूणांना आपली गरज राहाणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. तरुणांचीं संगठनें स्वायत्त व स्वतंत्र व्हावींत आणि त्यांना आपली फारशी गरज उरूं नये, असा सारखा प्रयत्न प्रत्येक प्रामाणिक प्रौढ व्यक्तीने केला पाहिजे. चांगला बाप, आई, वडील भाऊ किंवा पालक याच पद्धतीने शिक्षण देत असतात. हेंच वळण मुलांच्या हिताचें ठरतें. म्हणून माझी अशी विनंती आहे की, तुमच्या संस्थेच्या संगठनाशी माझा प्रत्यक्ष संबंध शक्य तितका कमी असावा म्हणजे माझे दोष तुमच्यांत उतरणार नाहीत आणि तुमचें संगठन व्यक्तिनिष्ठ बनणार नाही.

याचें कारण असें की तुम्ही माझ्या एक युग पुढें आहांत. विचाराच्या बाबतींत तुम्ही एक पाऊल नेहमीं माझ्या पुढेंच राहिले पाहिजे. म्हणून तुम्हांला माझें जितकें पटत असेल तितकें तुम्हीं अवश्य स्वीकारा. माझी सल्ला मसलत व जरूर तर मार्गदर्शनहि तुम्ही स्विकारूं शकतां. पण वैयक्तिक संबंधाची मर्यादा या पलीकडे जाऊं देऊं नका. कोणत्याहि व्यक्तीचें एकछत्री वर्चस्व राहाणें इष्ट नाही. एखाद्या प्रसंगीं त्या व्यक्तीशी तुमचा मतभेद झाला तर तुमच्या संगठनेंत तट पडतील आणि फुटीरपणाची वृत्ति बोकाळूं लागेल.

## संगठनेची क्रांतिकारक भूमिका

तुमचें संगठन दंडनिष्ठ अथवा व्यक्तिनिष्ठ नसावें म्हणजे तें सैनिक स्वरूपाचें नसावें असें मी म्हटलें हा मुद्दा थोडासा अधिक विशद करूं या.

सैनिक संगठनेचा मुख्य उद्देश व कार्य मुख्यतः संरक्षण व शांतता हा असतो. पण हें कार्य त्यांना नित्य करावें लागत नाही. सैन्याच्या जरबेनेच बहुधा शांतता रक्षणाचें कार्य होतें. सैनिकांचें नित्याचें कार्य त्यामुळें शांतता संरक्षणाची तयारी करीत राहणें व आपल्या शारीरिक गरजा भागविणें इतकेंच राहातें. नियमितपणे कवायत करणं, खाणें, पिणें, व चैन करणें एवढाच सैनिकाचा नित्य कार्यक्रम असतो.

सेवेचें शिक्षण शिपायांना मुळीच देण्यांत येत नाहीं असें नाही. आग विझाविणें, सांथीच्या रोगाच्या वेळीं आरोग्य रक्षणास मदत करणें अशा प्रकारचीं सेवेचीं कामें करण्याचें शिक्षण त्यांना दिलें जातें. पण हें सैन्याचें मुख्य काम नव्हें. सैन्य कशासाठी? या प्रश्नाचें उत्तर आग विझविण्यासाठी, रोगाचा प्रतिकार करण्यासाठी असें कुणी देणार नाही. सैन्याच्या दृष्टीने हीं कामें नैमित्तिक व गौण आहेत.

तुमचें संगठन हीं लोक–सेवेचीं कामें आपला नित्यधर्म मानणारें असलें पाहिजे. देशापुढे असलेल्या निरनिराळ्या प्रश्नांचा खोल अभ्यास करून त्यांचीं मूळ कारणें शोधलीं पाहिजेत. त्या कारणांच्या निवारणाचे उपाय शोधून काढण्याची विधायक प्रतिभा तुमच्या अंगीं असली पाहिजे. आणि त्या उपायांचा प्रत्यक्ष प्रयोग करण्याची हिंमत, कर्तृत्वशक्ति व संयोजन–चातुर्यहि तुमच्या ठिकाणीं विकसित झालें पाहिजे. हें सगळें करीत असतांना शरीर तरतरीत, चपळ व कार्यक्षम राहावें, शारीरिक धैर्य अंगीं बाणावें म्हणून कदाचित तुम्ही कवायत व व्यायाम कराल पण ' फायरब्रिगेड ' किंवा ' रेडक्रॉसचीं शुश्रूषा पथकें ' यांच्या योजनेत कवायतीचें जें स्थान असतें, तेंच तुमच्याहि योजनेंत राहील. बिनलष्करी संगठनेची ही मुख्य खूण आहे. आमचें संगठन लष्करी थाटाचें नाही, हें म्हणणें सोपे आहे, पण बिनलष्करी संगठनाने क्रांति घडवून आणण्याचें कार्य फार अवघड आहे, फार मोठें आहे. त्यांत संगठनापासूनच क्रांतीला सुरुवात होते. या दृष्टीने तुमची भूमिका क्रांतिकारक आहे. म्हणजे संगठनेच्या कल्पनेतच तुम्ही क्रांति करूं इच्छितां.

## सामाजिक भूमिका निर्माण करा

सैन्यांत जातिभेद व संप्रदाय-भेद नसावा व बहुतांशी तो नसतोहि परंतु आपल्या येथील सरकारी सैन्यांत ब्राह्मण ब्राह्मणेतराच्या हातचें खात नाहीं, हिंदु व मुसलमान एकमेकांबरोबर जेवीत नाहीत. अशा स्थितींत त्यांच्यांत जी ऐक्य भावना असते, ती फक्त शत्रूशी लढण्यापुरती आणि सैनिकाची कर्तव्यें पार पाडण्यापुरती असते. आझाद हिंद फौजेंत हा जाति-भेद व पंक्तिभेद नव्हता. पण ही एक्याची भावना फक्त सैन्यापुरती किंवा संस्थे-पुरती राहिली तर समाज-क्रांति होणार नाहीं. युद्धांत व प्रवासांत शूद्रा-प्रमाणे भाजापान हरकत नाहीं असें तर जुने कर्मठ लोकहि मानीत असत. सगळ्या समाजाचें सैनिकीकरण किंवा 'रेजिमेन्टेशन' केल्यास ही ऐक्य भावना कदाचित सार्वत्रिक होऊं शकेल. पण त्यासाठीं समाजच सैन्यमय बनवावा लागेल. सारे जग हें एक अखंड सैन्य होईल आणि विश्वसेनानी व विश्वराज यांची स्थापना झाली म्हणजे हें सैन्य कोणाशीं लढेल?

## विश्वसैन्याची कल्पना

सगळ्या समाजाचें रूपांतर विश्वसैन्यांत करणें अनिष्ट व अनर्थ-कारक आहे. म्हणून तर आस्तिकतेच्या व अहिंसेच्या पायावर संघटन करण्याचा प्रयत्न आहे. समाजव्यापी लष्करीकरणाकरितां हे समाजांतील सर्व संप्रदायाचें व जातीचें सहकार्य लागेल. असें सहकार्य लाभावें म्हणून सामाजिक भूमिका निर्माण करावी लागेल. ही सामाजिक भूमिका निर्माण करण्याकरितां हिंदुसमाजांतून जातिवादाचा व मुसलमान समाज-तून संप्रदायवादाचा नायनाट करणें आवश्यक आहे.

जातिसंस्था हिंदुसमाजाचें वैशिष्ट्य आहे. त्या संस्थेनें हिंदु समाजाची प्रकृति बनली आहे. 'रोटी-बंदी' 'बेटी-बंदी' आणि 'स्पर्श-बंदी' हीं जातीचीं बाह्य लक्षणें आहेत. या तिन्ही प्रतिबंधांचा आधार उच्चनी-चतेची भावना आहे. ही उच्चनीचतेची भावना जन्मावर आधारलेली असल्यामुळे ती आजन्म कायम राहते. जन्मगत भेद हा औपचारिक असला तरी जोपर्यंत हें शरीर आहे तोपर्यंत तो नाहींसा होण्याची आशा नसते.

सामाजिक दृष्टीने जन्मगत भेद हा नित्य स्वरूपाचा असतो. जन्मगत भेद व आर्थिक भेद यांच्यांत हा फार मोठा फरक आहे. आर्थिक भेद अस्थिर व अनित्य स्वरूपाचे असतात. आज जो नीच आहे, तो उद्या उच्च होऊ शकतो; पण जन्मगत भेदांना हा 'इकॉनॉमिक' देखील लागू नाही. मानव-शरीरापुरता जन्मगत भेद वज्रलेप असतो. त्यामुळे जन्मगत उच्चनीच भाव हिंदुसमाजाचें अनन्य स्थायी व शाश्वत लक्षण होऊन बसलें आहे. या समाजाला जन्मगत भेदभाव असतात तो समाज इतराच्या दृष्टीने निरुपद्रवी असला तरी त्याच्या ठिकाणीं कार्पण्य दोष म्हणजे अंतःकरणाचा अनुदारपणा उत्पन्न होतो. त्यातून पावित्र्यवाद बोकाळतो पावित्र्यवाद म्हणजे माणसाचा विटाळ मानण्याची वृत्ति. आणि माणसाचा विटाळ मानणें म्हणजे असामाजिकता. ज्या समाजाची प्रकृतिच असामाजिक असेल त्यांत सामाजिक सामर्थ्य निर्माण होणें कसें शक्य आहे? काल-मानाची ओळख मनकून त्यांच्या मनांत जरा उत्पन्न करता येईल। जरबेच्या योगाने बाह्य अक्रमणापासून हिंदु–समाज कांही काळ सुरक्षित राहूं शकेल. पण त्याच्या अंतरंगातील दोष नाहीसा होणार नाही. आणि जो पर्यंत तो दोष कायम राहील तो पर्यंत हिंदु–समाज आक्रमण सुलभ राहील. म्हणून हिंदु–समाजाच्या प्रगति करिता व उत्कर्षा करिता त्याची जाति-शीलता नष्ट झाली पाहिजे. दुसरा तरणोपाय नाही. 'नान्य पंथाः विद्यते अयनाय.'

## ब्राम्हणेतर चळवळीचें स्वरूप

वरिष्ठ जातींच्या विरुद्ध कनिष्ठ जातींनी केलेल्या चळवळी या दृष्टीने एकेवेळीं आवश्यक व इष्ट होत्या. ब्राह्मणेतर चळवळीचा त्याकाळीं उपयोग होता आणि उपयोग झालाहि. पण विशिष्ट जाति विरुद्ध केलेली चळवळ स्वभावतः जातिवादीच असते. त्यामुळे तिचा उपयोग मर्यादित असतो. ती उपयुक्ततेची मर्यादा गाठली म्हणजे त्या चळवळी पासून फायद्या ऐवजी तोटा होऊ लागतो. घरांत जाऊन परतलेल्या सोंगटी प्रमाणे ती चळवळ उफराट्या गतीने चालू लागते. उफराट्या गतीने चालणारी

चळवळ म्हणजे चळवळीचें भूत. या भुताचें थैमान सुरू झालें म्हणजे समाजाचें स्मशान होतें.

## समाज रक्षणासाठी आवश्यक तर ब्राम्हणांचा बळी द्या.

ब्राम्हणांना वगळल्याने जर हिंदु समाजातील इतर सगळ्या जाति एक होत असतील, तर मी म्हणेन की समाजाच्या रक्षणाकरितां ब्राम्हण जातीचा बळी दिला पाहिजे. यज्ञातील बोकडाला मुक्ति मिळत होती किंवा नाही, या बद्दल वाद असेल. पण समाजाच्या रक्षणा करिता ब्राम्हण जातींचें बलिदान करावें लागलें, तर तिला मात्र खात्रीने सद्‌गति लाभेल या बद्दल माझ्या मनांत शंका नाही.

## जातींचें भूत

तुम्ही फार दयावंत असाल तर वाटल्यास कत्तल करण्या ऐवजी ब्राम्हणांना गंगा-युमनांच्या अंतर्वेदीत कोंडून ठेवा. तरी मला अशी भीति वाटते की जातींचें भूत उरलेल्या हिंदु समाजांत धुडगूस घातल्या वाचून राहाणार नाही. आणि ब्राम्हणेतर चळवळीच्या पोटीं 'मराठा-मराठेतर' 'माळी--कुणबी,' 'महार-महारेतर' असे वाद उत्पन्न होतील. तिकडे गंगा यमुनांच्या दोआबांत स्थानबद्ध झालेले ब्राम्हणहि आपसांत ऋग्वेदी-युजुर्वेदी, देशस्थ-कोकणस्थ,-कऱ्हाडे, असे अनेक भेद शोधून आपल्या जातीशील प्रकृतींचें अनुसरण करतील. सांगण्याचा मुद्दा असा की हिंदु-समाजांतून जातींचें मूळ समूळ नष्ट झाल्या वाचून त्याची प्रकृति निकोप होणार नाही.

## इस्लामाचा कडवेपणा

दुर्दैवाने तुमच्यांत कोणी मुसलमान तरुण नाहीत. तरीपण मुसलमान समाजाबद्दलचें तरुणांचें जें कर्तव्य आहे त्याचाहि निर्देश थोडक्यांत करणें जरूरचें आहे. मुसलमान हा संप्रदायवादी असतो. इस्लाम हा खरा धर्म आहे एवढें मानल्याने त्याचें काम होत नाही. तो असे मानतो

की इस्लाम हाच खरा धर्म आहे. म्हणून जे त्या धर्माच्या बाहेर असतील ते त्याच्या दृष्टीने अभागी, करंटे, अपवित्र, देवाला मुकलेले, सद्गतीला पारखे झालेले. म्हणून साऱ्या जगांतील यच्चयावत् माणसांना इस्लाम धर्माची दीक्षा दिल्यावाचून त्याला कृतकृत्यता वाटणें शक्य नाही. जे नापाक आहेत, काफर आहेत, त्यांच्या देशांत राहाणें हा त्याच्या दृष्टीने आपद्धर्म आहे. मुसलमानेतराच्या राज्यांत राहाणें, त्याच्या दृष्टीने अत्यंत निकृष्ट तऱ्हेची गुलामगिरी आहे. जगांतून इतर सर्व संप्रदायांचा व धर्माचा नायनाट करणें, कोठेहि त्यांची सत्ता अथवा अस्तित्वहि न उरूं देणें मुसलमानाचें धार्मिक कर्तव्य ठरतें. याचा अर्थ मुसलमान मुसलमानेतरांबरोबर समानतेच्या नात्याने राहूंच शकत नाही. सर्वच सांप्रदायिक धर्मांचा हा स्वभाव-गुण आहे. पण इस्लामांत तो अत्यंत उग्र स्वरूपांत आढळून येतो. **इतरांबरोबर समान भूमिकेवर राहतां न येणें असामाजिकतेचेंच लक्षण आहे.** या असहिष्णुतेचा परिणाम असा होईल की संप्रदायवादाची प्रतिक्रिया इतर समाजांवर होऊन एक मुसलमानेतरांची फळी, मुसलमानांना वठणीवर आणण्यांकरिता जगांत निर्माण होईल. तसें झालें तर पुन्हा अखंड कलह माजेल. म्हणून ज्यांना इस्लामविषयीं आदर असेल, त्यांनी त्या समाजांतून संप्रदायाच्या मूल्याचा नायनाट करण्याचा संकल्प केला पाहिजे.

## समाजक्रांतीला व अर्थक्रांतीला वाहून घेणारें तरुणांचें संगठन उभारा

सारांश काय की हिंदुसमाजांत जातिवादी चळवळ सुरू करण्याऐवजी जन्माचें प्रस्थ समूळ मोडून काढणारी जाति विरोधी चळवळ सुरू केली पाहिजे. आणि मुसलमान समाजांतून संप्रदायवाद अगदी निःशेष करण्यासाठी निकराची चळवळ केली पाहिजे. **जातिवाद व संप्रदायवाद हे दोन्ही वाद देवद्रोही आणि मानवद्रोही आहेत.** म्हणून त्यांचा उच्छेद करणें अत्यंत आवश्यक आहे. पाकीस्तानी प्रवृत्तीला एरवी पायबंद घालतां येणार नाही, आणि मूठमातीहि देतां येणार नाही. या दोन

चळवळींना पूरक व पोषक अशी तिसरी चळवळ म्हणजे जाति-धर्म निरपेक्ष आर्थिक पायावर शेतकरी व कामकरी यांचें संगटन करणें. हिंदु-दारिद्य, मुस्लीम दारिद्य, हिंदु सावकार, मुस्लीम-सावकार, हिंदु गुलामगिरी, मुस्लीम गुलामगिरी असा भेद आर्थिक क्षेत्रांत नाही. म्हणून दोघां मधील साम्याचा फायदा घेऊन आर्थिक पायांवर संगठन केलें तर सांप्रदायिक व जातीय भेदांची नांगी मोडण्याची बरीच आशा आहे. यापुढे समाज क्रांतीला व अर्थ क्रांतीला वाहून घेणारें तरुणांचें संगठन उभारणें हेंच तुमचें कर्तव्य आहे.

## शक्य तो वाद टाळा.

तुम्हांला जर खरोखर कार्यांची कळकळ असेल तर मेहेरबानी करून वाद करण्यांत व हुज्जत घालण्यांत आपल्या आयुष्याचा अपव्यय करूं नका. जो वादांत पडतो त्याचा वादविवादांत व शास्त्रार्थांतच सारा वेळ जातो. कांहीं करण्या इतकें अवसानहि त्याच्या जवळ उरत नाही. आणि प्रवृत्तीहि शिल्लक रहात नाही. वादांतून प्रतिवाद व पोटवाद उत्पन्न होतील आणि ही परंपरा कधीच संपणार नाही. तेव्हा देशासमोर असलेल्या जिवंत प्रश्नांचा मूलगामी व पूर्व ग्रह सोडून आस्थेने विचार करा आणि बुद्धीला पटलेल्या तत्वांचें आचरण आपल्या वैयक्तिक जीवनांत यथाशक्ति तावड-तोब सुरू करा. समाजक्रांतीच्या प्रक्रियेंत वैयक्तिक आचरणाचें महत्व ओळखा. जे वाद-निपुण आहेत, शास्त्रार्थ-प्रवीण आहेत, त्यांना खुशाल वाद घालूं द्या.

## संघटनेला घटनासुद्धा नको

बिनलष्करी संगठनांत आतांपर्यंत ज्या संगठनांचा समावेश होतो, त्यांत घटनानिष्ठ संस्था प्रामुख्याने दिसून येतात. घटनेचीं कलमें प्रामाणिकपणे पाळायचीं हा संकल्प त्या संगठनेचा आधार असतो. पण पुढे पुढे घटनेच्या कलमांच्या अर्थावरच रणें माजूं लागतात आणि जो तो आपआपल्या सोयीप्रमाणें घटनेचा अर्थ करूं लागतो. घटनेच्या भाषेंतून पळवाटा शोधण्याचें कौशल्य दाखविण्याची वृत्ति

घळावतें आणि संघशक्तीचा विकास होण्याऐवजीं कायदेबाजीचा धुडगूस सुरू होतो. आजीबाईची ती प्रसिद्ध गोष्ट तुम्हांला माहितीच असेल. एका बाईने देवाला नवस केला की, 'देवा, मला मुलगा होऊ दे, म्हणजे तुला सोन्याचा तोडा वाहीन.' देवाच्या कृपा प्रसादाने बाईला पुत्र रत्न झालें. पण बाई घटना पंडिता प्रमाणेंच मोठी मीमांसा विशारद होती. शब्दांचा आपल्याला अनुकूल असा अर्थ लावण्याची हातोटी तिला अवगत होती. त्यामुळे तिनें आपल्या मुलाचें नांवच सोन्या ठेवून दिलें, आणि त्याच्या पायांत कथलाचा तोडा घालून तो मोठ्या भक्तिभावाने विधिपूर्वक देवाला अर्पण केला.

दुसरें उदाहरण काँग्रेसच्या घटनेतील खादीच्या कलमाचें देतां येईल. जो खादी वापरील त्याला मताचा अधिकार, असा तो नियम होता. जो खादीचा रूमाल किंवा टोपी वापरतो तोहि खादी वापरतोच, असा त्या नियमाचा गंमतीचा अर्थ गंभीरपणाने करण्यांत आला. तेव्हा 'नेहमी व संपूर्ण खादी वापरणारा,' असे शब्द त्या नियमांत घालावे लागले. शब्दांचा कीस काढण्याला अंत नाही. घटनेच्या मुळाशी जर जिव्हाळा व निष्ठा नसेल तर घटनेच्या बळावर संघटन टिकूं शकत नाही. त्यांतून सत्तावादी राजकारणाचा जन्म होतो आणि त्याचाच धूमाकूळ सुरूं होतो. जेथें अंगीकृत कार्यावरील निष्ठा व परस्पर विश्वास असेल तेथे घटनेचें प्रयोजनच उरणार नाही.

## हृदयनिष्ठेनें अधिष्ठान द्या.

याचा अर्थ असा की 'दंडनिष्ठ व घटनानिष्ठ' या दोन्ही प्रकाराहून अगदीं निराळें असें एक हृदयानिष्ठ संगठन करण्याचा एक नवीनच प्रयोग तुम्हीं आरंभिला आहे. आजहि तुमचे पाच-सात हजार मुलांचें संगठन आहे. कागदावर लिहिलेली घटना किंवा नियम तुमच्या जवळ नाही. फक्त परस्पर विश्वासावर आतां पर्यंत तुमचें कार्य चाललें. तें घटनानिष्ठ किंवा दंडनिष्ठ संगठना पेक्षा वाईट रीतीनें चाललें असें कुणाला म्हणतां येणार नाही. घटनानिष्ठ संघटनेंत अत्यंत कडक शिस्त असते, कारण तिच्या

मुळाशीं शिक्षेचें भय असतें. घटनानिष्ठ संघटनेत जी शिस्त असते ती देखील कमी अधिक प्रमाणांत कृत्रिम व औपचारिक असते. आपल्याला जर स्वयंस्फूर्त व जिवंत शिस्त हवी असेल तर ती हृदयांच्या एकतेवरच उभारलेली राहूं शकेल. '**समानीव आकूतिः समाना हृदयानि वः**' **तुमचे संकल्प व तुमचीं हृदयें समान असोत. हा स्वयंस्फूर्त संघटनेचा मूलमंत्र आहे.** हृदयें एक झालीं म्हणजे तुम्हाला एकमेकां-बद्दल जिव्हाळा वाटेल. विश्वास वाटेल आणि आपुलकी वाटेल. तसें झालें म्हणजे तुमच्यांत शिस्त व एकोपा राखण्याकरिता बडग्याची किंवा घटनेच्या नियमाची गरजच उरणार नाही.

## गांधी–सेवा–संघाशी साम्य

अहिंसेवर आधारलेल्या संगठनेचें हें वैशिष्ट्य आहे. या युगांतील अहिंसेचें लोकोत्तर प्रयोगी गांधी यांनी गांधी–सेवा–संघाच्या रूपानें अशा प्रकारचा संगठनेचा प्रयोग केला. गांधी-सेवा-संघाला घटना होती. पण कुठ-ल्याहि सभासदाला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याकरिता घटनेच्या कलमाकडे बोट दाखविण्याची पाळी चिटणीसावर आली तर आतां हें आपलें संघटन फार दिवस टिकणार नाही, असें त्यांना वाटूं लागत असे. जी संगठना दंड–निष्ठ किंवा घटनानिष्ठ नसेल ती कौटुंबिक न्यायावर आधारलेली असेल.

## कौटुंबिक न्याय

आपली आई घरांतील सगळीं कामें नियमितपणे आणि नीटनेटकीं करतें. तिच्याकरिता कोणी भिंतीवर वेळा–पत्रक लावलेलें नसतें. उलट देवपूजा, बाजार, साफसफाई इत्यादि कामें करण्याकरिता आपण घरांतील मुलांच्या पाळ्या बांधून देतो. भिंतीवर ठळक अक्षरांनी त्यांच्या पाळ्यांचें पत्रक लावून ठेवतो. तरी मुलांची आपआपसांत चुकारपणाच्या बाबतीत स्पर्धा होते आणि कुठलेंहि काम वक्तशीर किंवा पद्धतशीर होत नाही. कारण आईला कामाची कळकळ असतें. माणसांचा जिव्हाळा असतो.

मुलांना एकतर 'बावांच्या' माराचें क्षय असतें किंवा आई जेवूं घालणार नाही हा धाक असतो. त्यामुळे मुलांनी वक्तशीर व व्यवस्थितपणे पूजा केली तरी तिच्यांतून पुण्य किंवा शक्ति उत्पन्न होणार नाही. हाच न्याय संगठनेलाहि लागूं आहे. म्हणून तुमच्या संगठनेंत दंड किंवा घटना यांना स्थान असतां कामा नये.

## आत्मख्याति अगर प्रसिद्धीचा मोह आवरा.

लोकांना तुमच्या संगठनेबद्दल संशय किंवा वैशम्य राहणार नाही असाहि प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. आपल्या समारंभाची वर्णनें, आपल्या कार्याचें अहवाल, आपल्या संस्थेची स्तुति वर्तमान पत्रांतून आली पाहिजे, मोटमोठ्या लोकांनी आपल्या संस्थेला भेद देऊन कौतुक करणारे दोहे लिहिलें पाहिजे, हा मोह तुम्ही मोठ्या कसोशीने आवरला पाहिजे. हा मोह मोठा दुर्धर आहे. तो जर आवरतां आला नाही तर प्रसिद्धीच्या लोंढ्यांत संघटना वाहून जाईल.

## आत्मसमर्थनाचा मोह हि आवरा.

आत्मख्याति प्रमाणेच आत्मसमर्थनाचाहि मोह तुम्हांला आवरावा लागेल. हें काम जास्त कठिण आहे. त्यासाठी अधिक कडक संयम हवा. अनेक लोकांचे तुमच्या विषयीं अनेक प्रकारचे गैरसमज होतील. तुमच्यावर हेत्वारोप करण्यांत येतील. आक्षेप घेण्यांत येतील. बरीच अवास्तव किंवा यथार्थ टीकाहि होईल. हें सगळे पचविण्या. इतका कस तुमच्या निष्ठेंत असला पाहिजे. **निंदेचें हलाहल पचवूं शकणारी निष्ठाच संघटनेला स्थैर्य व दीर्घायुष्य देऊ शकेल.**

याचा अर्थ असा नाही की आम्हीं यथार्थ टीकेकडे दुर्लक्ष करूं किंवा सद्बुद्धीने केलेल्या सूचनांची उपेक्षा करूं. आमचें संगठन कोणालाहि बोचूं नये अगर खुपूं नये असा प्रयत्न आम्हीं सतत करूं. इतराशी समान संगठना करण्याचा व्हास आम्हीं धरणार नाही. अहंकाराने नव्हे

तर नम्र निष्ठेने नवीन प्रकारचे संगठन करण्याचा आम्हीं इमाने इतबारे प्रयत्न करूं. तो साधला तर ज्या प्रमाणांत तो साधेल तितकेंच श्रेय पदरांत पडेल! 'स्वल्प मप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' हा धर्म थोडा जरी घडला तरी मोठ्या संकटापासून रक्षण करतो. बरें, प्रयत्न केल्या-नंतरहि आमची शक्ति किंवा बुद्धि उणी पडल्यामुळे कार्य न साधलें तरी प्रयत्नांचे समाधान व पुण्य पदरांत पडेल. प्रयत्न विफल कधीच होत नाहीत अशी आमची श्रद्धा आहे. नव्हे हा निसर्गाचा अबाधित नियम आहे. फक्त प्रयत्न योग्य दिशेने होत आहे, याची काळजी मात्र घेतली पाहिजे.

## आचार हेंच प्रचाराचें एकमेव साधन

आणि म्हणून तुम्हीं प्रसिद्धि व प्रचार यांवर विशेष भर न देतां आपल्या रोजच्या आयुष्यांत आणि नित्याच्या व्यवहारांत या तत्वांची मंसळवजावणी करायला सुरवात करा.

## 'सर्वेषां अविरोधेन'

समान भूमिका समान कार्य असलें म्हणजे विरोध अपरिहार्य आहे. या गावांत एकाच वेळीं दोन संस्था ठेवल्या तर विरोध कसा टळू शकेल? म्हणून तुम्हीं अत्यंत शुद्ध मनानें आणि असंदिग्ध बुद्धीने असा संकल्प केला पाहिजें कीं, इतर संस्था कार्य करीत असतांना तत्सम संस्था आम्हीं काढणार नाही. आमच्या संस्थेसारखीं संस्था इतरांनी काढली तर आम्हीं नांवाचा व संस्थेचा मोह सोडून त्या दुसऱ्या संस्थेच्या विकासाला मदत करूं.

## संस्थेचाहि मोह सोडा.

प्रसिद्धीच्या मोहा प्रमाणेच नांवाचा व संस्थेचा मोहहि मोठा दुर्धर आहे आणि अधिक भयंकर आहे. एकदा जनकराजाला कदाचित आपल्या राज्याचा मोह सोडतां येईल. पण एखाद्या संन्यासाला आपल्या मठाचा

किंवा पीठाचा मोह सोडणें अशक्य होईल. आपण जें कार्य आरंभिलें, तें आपल्याला साधत नसेल तर त्याचा उपसंहार करून मोठ्या आनंदानें इतर संस्थेंत सामील होणें हा अविरोधी संगठनेचा निष्कर्ष आहे. अविरोधी वृत्तीची ही खूण आहे. आम्हीं नवीन प्रकारचें संगठन करण्याला सरसावलो होतों. आमची ताकद उणी पडते तेव्हा नांवाच्या किंवा निर्जीव कलेवराच्या मोहाला बळी न पडतां एखाद्या सुव्यवस्थित व सुप्रतिष्ठित संगठनेंत जाऊन दाखल होऊं या. आपली अल्पशक्ति व बुद्धि तिलाच अर्पण करूं या. या वृत्तींत निरहंकारिता आहे, प्रांजळपणा आहे, संगठनेचें अक्षय सामर्थ्य आहे. **म्हणून राज्यावर पाणी सोडण्यापेक्षाहि कधी कधी संगठनेवर पाणी सोडणें समाज हिताच्या दृष्टीने अधिक पुण्यकारक असते.** खऱ्या साधकाची ही हिंमत तुम्हांला दाखवितां आली पाहिजे. ज्या दिवशी तुम्हांला असें दिसून येईल की, तुमचें संगठन तुम्हीं स्वीकारलेल्या तत्वाप्रमाणे चालू शकत नाही, त्या दिवशी मोठ्या उत्साहाने व संतोषाने त्याचा आवरण समारंभ तुम्हांला करतां आला पाहिजे. **त्याचा जात–करण व नाम–करण विधि तुम्हीं जितक्या हौसेने व थाटाने करता तितक्याच हौसेने व थाटाने तिची उत्तर क्रियाहि तुम्हीं केली पाहिजे.** हा मरणाचा सोहळा आनंदाने पाहाण्याची ज्याच्या मनाची तयारी होते तोच मृत्युंजय होतो.

## महाभाग गांधींचें उदाहरण

म्हणून जर देशाच्या आजच्या परिस्थितींत अशा प्रकारच्या संगठनेची आकांक्षा उत्पन्न झाली नसेल, किंवा ती आकांक्षा उत्पन्न झाली असतांना देखील, ती भागविण्याची पात्रता तुमच्यांत नसेल तर तुमची संघटना गुंडाळूनटाकणें हेंच कर्तव्य ठरेल. गांधींचें उदाहरण मीं दिलेलेंच आहे आपल्याला हवें तसें संगठन आपण निर्माण करूं शकलो नाही, तशा प्रकारची शक्ति आपल्याला देण्याचें सामर्थ्य आपली आई जी जनता तिच्यांत नाही, असें जेव्हा त्यांनी पाहिले, तेव्हा अत्यंत संतोषपूर्वक त्यांनी साबरमतीच्या जलांत सत्याग्रहाश्रमाचें विसर्जन केलें. तसेंच पद्मेच्या पवित्र पात्रांत गांधी-

सेवा संघाचें विसर्जन केलें. पुष्कळसे संतमहंत आश्रम व मठ यांचा संसार थाटतात आणि आपल्यामागे संप्रदाय व गादी सोडून देहत्याग करतात. पण संस्थेची उपयुक्तता संपल्यानंतर तिचें विसर्जन करणाऱ्या महाभागाची पुण्याई कांही औरच असते. **क्रांतिकारक मनोवृत्तीचें हें लक्षण आहे. तुम्हीं म्हणतां की आम्हीं शस्त्रावाचून क्रांतीची भूमिका निर्माण करूं. तेव्हा तुम्हांला संस्था विसर्जनाचें धैर्य संपादन केलें पाहिजे.**

## तरुणांच्या संघटनेला पथ्यें

सांगण्याचें तात्पर्य तुमच्या संगठनेला कांही पथ्यें पाळावीं लागतील. पाहिलें पथ्य संगठन सत्तानिष्ठ व दंडनिष्ठ नको. दुसरें पथ्य तें व्यक्तिनिष्ठ नको. तिसरें पथ्य तें घटनानिष्ठहि नको. तुमचें संगठन समाजनिष्ठ हवें, हृदयानिष्ठ हवें, तत्वनिष्ठ हवें. तरच तें क्रांतिनिष्ठ राहूं शकेल. चवथें पथ्य म्हणजे वाद टाळा. पांचवें पथ्य प्रसिद्धीचा मोह आवरा. सहावें पथ्य आत्मसमर्थनाच्या भरीस पडूं नका. सातवें, आचार हेंच क्रांतिचें व प्रचाराचें साधन माना. आठवें, सर्वेषां अविरोधेन असा संकल्प कारावस्थेचा मोह सोडा.

## निवडणूकी पासून अलिप्त राहा.

आणखीहि एका बाबतींत तुम्हीं पथ्य पाळलें पाहिजे. ती बाब म्हणजे सत्तावादी राजकारण. सत्तावादी राजकारणाचें वाहन निवडणूक हें आहे. या युगांत सत्तादेवी निवडणुकीवर आरुढ झालेली आहे. निवडणूकीच्या बाजारांत आपले गुण, आपलें कर्तृत्व या सर्वांचा लिलांव बोलावा लागतो बाजार पेठेंत कौशल्याने मांडलेला नकली व दिखाऊ माल अधिक उठावदार दिसतो. खरें मोती कल्चर मोत्यां समोर फिके दिसूं लागतें. जो निवडणूकींत शिरला, तो वादांत बुडाला. त्याने आपल्या जिवाचा बाजार केला. जो सत्तावादी राजकारणांत शिरला त्याला नसतीं भांडणें विकत घ्यावीं लागतात, आणि भीति व संशय ही दोन भुतें त्याला कायमचें झपाटतात, म्हणून कबीराच्या शद्बांत माझा तुम्हांला असा आग्रहाचा सल्ला

आहे की, " तू तो रामसुमरे, जग लडवा दे." साधकाने सत्ता व सम्मान या दोन सिद्धीपासून नित्य सावध राहिलें पाहिजे.

## संगठनेचा कॉंग्रेसशी संबध

परंतु देशाची एकंदर परिस्थिती लक्षांत घेतां कॉंग्रेसशी आपला संबंध कसा असावा, हा प्रश्न पुनः पुन्हा आपल्या समोर उभा राहातो. **आपल्या संगठनेने कॉंग्रेसची शक्ति वाढली पाहिजे; निदान कमी तरी होतां कामां नये, अशी आपली दृढ प्रतिज्ञा असली पाहिजे.** आजच्या बदललेल्या परिस्थितींत कॉंग्रेसची भूमिकाहि बदललेली आहे. आतांपर्यंत कॉंग्रेस ही एक बिन सरकारी झुंझार संस्था होती. आज ती सरकार झालेली आहे. पण सरकार बदललें तरी माणसांच्या संवयीं एकाएकी बदलत नसतात. सरकारी नोकर व जनता यांच्या मनाला लागलेलें जुनें वळण अद्याप बऱ्याच प्रमाणांत कायम आहे. सरकारी नोकर हा प्रामाणिक व परिश्रमी असला तरी फक्त हुकुमाचा बंदा सांगकाम्या असतो. त्याला राष्ट्राबद्दल आपुलकी अगर जिव्हाळा मुळींच वाटत नाही. त्याचप्रमाणें सरकार बदललेलें असलें तरी या जुन्या नोकर वर्गामुळे आपलें सरकार स्थापन झालें, असा अनुभव जनतेला येत नाही म्हणून सर्वसाधारण कॉंग्रेस कार्यकर्त्याचें सरकार विरोधाचें येळकोट कांही केल्या जात नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे की कॉंग्रेसची सत्ता सुदृढ व टिकाऊ होऊ नये असा प्रयत्न सर्वच अराष्ट्रीय संस्था मोठ्या हिरीरीने करीत आहेत. कॉंग्रेस जर या संबंध देशांत दोन वर्षे पर्यंत शांतता व सुव्यवस्था राखूं शकली तर आपण ठार झालो, असें मुस्लिम–लीगला आणि शेडूलडकास्ट फेडरेशनला वाटत आहे. म्हणून कॉंग्रेसची सत्ता खिळखिळी करून उलथून पाडावी असा त्यांनी चंग बांधलेला आहे. या त्यांच्या प्रयत्न्याला आपल्या हातून कळत वा नकळत साह्य झालें तर आपण देश द्रोहाबद्दल अपराधी ठरूं. कारण इंग्रजांचें स्थान घेऊ शकणारी आपल्या देशांत कॉंग्रेस ही एकच एक संस्था आहे. आपल्या प्रतिपक्षीयांचा प्रयत्न तिची शक्ति क्षीण करण्याचा आहे. त्याच्या उलट आपला प्रयत्न असला पाहिजे.

## काँग्रेसची बदलती भूमिका

काँग्रेस जोपर्यंत फक्त लढाऊ संस्था होती, तो पर्यंत तिच्यांत स्वार्थी सत्तावादाला व मतभेदाला वाव कमी होता. पण आता ती अधिकारारूढ झाल्यामुळे तिच्यांत सत्तावादाचा उच्छाद सुरू होईल. जेथे सत्तावाद माजता तेथें इमान कमी होतें. आणि फक्त यांत्रिक शिस्तीचें प्रस्थ माजतें. **समान निष्ठा, कार्यांची कळकळ व परस्पर विश्वास, या गुणावर आधारलेली एकजूट म्हणजेच वास्तविक शिस्त. यालाच आपण इमान म्हणतो.** चार चौघांनी मिळून काम करायचें तर एकजूट करावी लागते. ही एकजूट करण्याकरिता एकमेकाशीं इमान पाळावें लागतें. हें इमान म्हणजेच संगटनेचा प्राण. तुमच्या संगठनेत घटनेला महत्व नाही, शिस्तेला स्थान नाही. तेव्हां ती इमानाच्या आधारावरच टिकणें शक्य आहे. काँग्रेसच्या पाठीशी, ती सत्तेच्या राजकारणांत गुंतली असताना अशी निष्ठावान इमानी सेवकांची संगठना आपण उभी केली पाहिजे. काँग्रेसची भूमिका बदलल्या बरोबर तिचें वजन कमी होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत. म्युनिसीपलिट्या, जिल्हा कौन्सिलें व लोकलबोर्डें यांची जी गाते झाली तीच काँग्रेस सरकारांची होणार कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. ठिकठिकाणी स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकींतून काँग्रेसचा पराजय होत आहे. हीं सगळीं विपरित लक्षणें पाहून भांबावून जाण्याचें किंवा निराश होण्याचें कारण नाहीं. जो निराश झाला तो नामोहरम झाला. ज्याला काळोखांतहि प्रकाशाची आशा दिसते, तोच 'तमसः परम' अंधाराच्या पलीकडे जातो. म्हणून जेथे निष्ठा असेल तेथे आशेचा लोप कधिच होत नाही.

## तुमची भूमिका

तुमच्या समोर तुमची ही भूमिका अगदी स्पष्ट असली पाहिजे. सत्तेची हाव व सम्मानाचा मोह सोडून तुम्ही जेव्हा जनतेच्या ठिकाणीं काँग्रेस निष्ठा कायम ठेवण्याचा प्रयत्न कराल तेव्हा निवडणुकीच्या वेळीं योग्य माणसें नेमण्याच्या बाबतींत काँग्रेसला तुमची मदत होईल, व तुमचा सल्ला तिला मोलाचा वाटेल आणि जनतेचाहि काँग्रेसकडे पाहाण्याचा दृष्टिकोण बदलेल- **कारण लोक चारित्र्य उन्नत झाल्यावाचून आपल्याला लोकशाहीचा पाया रचता येणार नाही.**